लॉकडाऊन

कथा आणि व्यथा



बबन धनावडे

लॉकडाऊन

कथा आणि व्यथा

लघू कादंबरी

लेखक: बबन धनावडे

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

लेखक- बबन धनावडे

अ-४०४ भगवा महाल

बा. ज. मार्ग सातरस्ता

मुंबई-४०००११

मोबाइल नंबर : ८८७९०९५६४७

ई मेल- aban. dhanawde1950@gmail.
com

मुखपृष्ठ: रमेश ननावरे

ले आउट: सानिका धनावडे

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : १९ फ़ेब्रुवारी २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. २२०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- बबन धनावडे - ८८७९०९५६४७

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अल्प परिचय



नाव :- बबन धनावडे

वय :- ७४ वर्षे

९०/. दिव्यांग

शिक्षण:- नववी पास

नोकरी:- टाटा प्रेस लि. मध्ये बाईंडर

१९७७ ला अपंगत्वामुळे नोकरी गेली

१९६८ पासून ललित लेखन सुरू

अनेक दिवाळी अंक आणि मटा, लोकसत्ता, नवाकाळ, नवशक्ती, सकाळ, लोकमत वगैरे अंकातून सुमारे ३०० पर्यंत कविता प्रसिद्ध.

❖ वृत्तपत्रातून ललित लेख प्रसिद्ध.

❖ काव्यसंग्रह

❖ तीन एकांकिका तयार आहेत

१) *आकाश पेलताना* (म. रा. सा. सं मंडळ) - १९९०

२) *मोगरवेल* (चारोळया संग्रह) - २००७

३) *चानकोय* (चित्रमय बाल चारोळया संग्रह) - २०१३

४) *काटेरी फुले* (डिजिटल कविता संग्रह) - २०२०

५) *वडाचा माळ* (ग्रामीण कथासंग्रह) - २०२०

६) *पूर्णविराम* (कादंबरी) - २०२२

७) *आगामी* (ललित गद्य)

८) *मना बोल ना* आठवणीतील आठवणी (ललित गद्य)

- पूढील वाटचाल...

- *गावकी आणि भावकी* (ग्रामीण कथासंग्रह)
- *रान मांडव* (ग्रामीण कथासंग्रह)

अर्पणपत्रिका

माझ्या ह्या पुस्तकातील बोलीभाषा आणि विषय ज्यांच्यामुळे मिळतात ते, मु. कुडेवाडी,भांबेड गावातील माझे शेतकरी बांधव आणि मित्र मंडळी ह्यांना समर्पित..

.. . बबन धनावडे

टीप..

ह्या पुस्तकातील पात्रे प्रसंग आणि घटनास्थळ संपूर्ण काल्पनिक असून वास्तवतेशी त्यांचा काहाही संबंध नाही,असल्यास तो योगायोग समजावा.

.. . लेखक

मनोगत

नमस्कार!

आज आपल्यासमोर एक ललित कथानक सादर करीत आहे. आतापर्यंत माझे लहानमोठे चार कविता संग्रह,एक ग्रामीण कथासंग्रह व एक कादंबरी प्रकाशित झाली.

हे नवीन पुस्तक सर्व जगात थैमान घालून गेलेला कोरोना आणि त्याने पसरवलेली भीती या विषयावर आधारित आहे. असं म्हणतात दुसऱ्या महायुद्धात जेवढे लोक मृत्युमुखी पडले नव्हते त्याच्या दहापट निरपराध लोकांनी प्राण गमावले. त्यातील जेवढे कोरोना बाधीत होऊन गेले,तेवढेच हॉस्पिटलमध्ये दाखल करताच भीतीने हृदयक्रिया बंद पडून गेले. करोनाच्या भीतीमुळे शेजारच्या घरात डोकावून बघायची हिंमत होत नव्हती.

यात अपवाद होता तो म्हणजे सरकारी कर्मचारी, महापालिका कर्मचारी आणि हॉस्पिटलचे डॉक्टर, नर्स, वार्ड बॉय, सफाई कर्मचारी, एब्युलंस कर्मचारी आणि संपूर्ण पोलीस खाते.

दिवसभर ड्यूटी करून घरी आलेला आपला माणूस संध्याकाळी कोणात्य अस्वस्थेत येईल याचा विचारही करवत नव्हता.

आम्ही स्वतः या अवस्थेतून गेलो आहोत. घरात बसून वेड लागण्याची वेळ आली होती. यातून सुटका व्हावी म्हणून गावी गेलो. गावी गेल्यावर एखाद्या कैद्याला तुरुंगात कोठडी मिळते तसं आम्हाला एका रिकाम्या खोलीत आसरा मिळाला.

त्यानंतर आम्हा मुंबईकरांकडे जवळचे लोक विचारपूस सोडा डोळ्याला डोळा भिडवून बोलायला घाबरत असत. यात त्यांना दोष दिला नाही. मुंबईसारख्या शहरातील लोक शेजारच्या घरात डोकावून बघत नव्हते तर खेड्यातील लोक वेगळे कसे असणार? भीतीने ग्रस्त झालेला माणूस प्रथम आपल्या जीवाचीच काळजी घेणार. असे चौदा दिवस एका खोलीत घालवून बाहेर पडलो तेव्हा तुरुंगातून सुटका झाल्यावर जसा आनंद होतो, तसा झाला. म्हणून हे ललित गद्य पुस्तक लिहिले आहे.

ह्या पुस्तकात कोरोना काळात घडलेले प्रसंग लिहिताना वाटलं,जर पुसतक निघालेच तर नुसत्या लॉकडाऊनच्या बातम्या ठरतील म्हणून एक काल्पनिक नायक आणि नायिका निर्माण केली.

भावनिक गुंतागुंत झाली की माणसं कशी वाहावत जातात तशी ही दोघं स्वतःला जपून,सावरुन राहत होती तरी एक दिवस हे बंधनं तुटते तरीही स्वतःला सावरुन आपापल्या वाटेने चालत राहतात…” अशी ही हळुवार प्रेमकथा सादर केली आहे.

हे पुस्तक वाचकांना आवडलेल असा विश्वास आहे.

हे पुस्तक पीडीएफ प्रकारात तयार करून आपल्याला सादर करीत आहे. ऑफिसला जाता येता मोबाईलवर मोफत वाचता येईल. आवडलं तर फोन करावा

धन्यवाद!

माझे कुटुंबीय आणि मित्रपरिवार यांच्या शुभेच्छा पाठीशी आहेत म्हणून माझ लेखन प्रपंच एक एक पाऊल टाकत चालत आहे. या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

लेखक.

लॉकडाऊन

कथा आणि व्यथा

" मी निघालो गं!" माधव बॅग उचलत म्हणाला.

" अहो निघालो काय, थांबा जरा हात धुते!" शकुंतला हात धुता धुता म्हणाली.

"सदा गाडी घेऊन आला आहे!" माधव उद्गारला.

“ येऊद्या हो जरा थांबा!”

“ हं ये पटकन!”

" आले, फोन करा पोचल्यावर, खरं तुम्ही निघायला नको होतं; करोना कं काय ते पसरतंय म्हणतात सर्व वाहातूक बंद होणार आहे म्हणे! ते काय आहे हो करोना?”

" ते नक्की सांगू शकत नाही. आणि तू उगाच घाबरत आहेस. करोना की कोरोना हा काय प्रकार आहे ते सद्या राहुदे. बरं का मला सगळे रस्ते ठाऊक आहेत, कोठून कोणती गाडी पकडायची हे सगळं माहीत आहे तीस वर्ष कोकण ते मुंबई प्रवास करत आहे आणि अशाच एका रातराणी बसमधून प्रवास करताना तुझी भेट झाली, सीटवर बसताना माझा धक्का तुला बसला आणि आपण प्रेमात पडलो!”

“ गप्प बसा, कुठे काय बोलायचं कळत नाही!” शकु कृतक्रोपाने उद्गारली.

“ का गप्प बसू?आपण प्रेमात पडलो म्हणून आपलं लग्न झालं. बरं प्रेमातून ठरलेलं लग्न साधायला हवं. तुलाही यायला हवं होतं पण .. जाऊदे चल सदा!"

"अरे माधव शकुंतला गाडीचं म्हणाली ते खरं आहे कां?. गाड्या बंद झाल्या तर काय?"

" बघु नंतर आणि एवढं गंभीरपणे घ्यायला नको. असे किती आजार आले आणि गेले. आपलं आरोग्य खाते खूप चांगले काम करते!”

" बरं चल आत बहुतेक गाडी प्लॅटफॉर्मवर लागली असेल!"असं म्हणत सदाने बाईक सुरु केली. दहा मिनिटात ते मुंबई सेंट्रल बस डेपोत हजर झाले. इतक्यात उद्घोषणा झाली,

"खर्र खर्र खुट् २७१५ मुंबई- राजापूर ३ नंबर वर उभी आहे. प्रवाशानी गाडीत बसून घ्यावे. ज्यांच्याकडे तिकीट नाही त्यांनीही बसून घ्यावे.

" बघ लागली गाडी. येतो!"

" मी निघतो फोन कर नायतर करतो म्हणतोस आणि गावी गेल्यावर विसरून जातोस!”

“ माझ्या गावी एकदा येऊन बघ तू स्वतःला विसरून जाशील!माधव गाडीत चढता चढता म्हणाला.

" हो हो नक्कीच आणि आता नीघ!सदाने घाई करत म्हटलं.

एका मित्राच्या मुलीचा लग्ना समारंभ पाली गावात होता त्यासाठी चार दिवसांची रजा काढून माधव गावी निघाला होता; पण मध्येच चीन मध्ये कोरोना या आजाराने थैमान घातले आणि दररोज शेकडो बळी जात आहेत ही बातमी सगळीकडे पसरली. आपल्या भारतीय लोकांना यापासून काही धोका नाही म्हणताना आपल्याकडेही हा योग येऊ शकतो असं लक्षात आलं आणि देशभर चिंता वाढू लागली. कोरोना हा नक्की काय प्रकार आहे हेच अनेकांना ठाऊक नव्हतं. तो राजापूर गाडीत चढून बसला तर अर्धी गाडी रिकामी,त्यानं कंडक्टर ला म्हटलं,

"मास्तर गाडी एकदम रिकामी रिकामी??"यावर चिंतातुर होत कंडक्टर म्हणाला,

" तो करोना का काय तो पसरतोय ना? लोक घाबरतात!”

" करोना नव्हे कोरोना आणि तो तिकडे चीन मध्ये आहे आपल्याकडे नाही!"

" आपल्याकडे यायला किती टायम लागनार हाय ;सगळ्या वस्तुआपन चायनाच्या वापरतो!" कंडक्टर खेदाने म्हणाला.

" हो,हे पण खरंच आहे!आपण इतके चायनावर अवलंबून आहोत की तो कोरोना सहज भारतात प्रवेश करू शकतो.!” माधवला कंडक्टरचं म्हणणं पटल.

" हे पाहा पासिंजर लोक मधे चापानी करायला उतरवल्यावर लय टायम लाव नका पटपट उरकून या!"

" कंडक्टर तुम्ही आधीच भीती दाखवू नका नाहीतर.. . एक प्रवासी घाबरून म्हणाला.

" हे बघा भाऊ, आम्हाला ज्या सूचना दिल्या आहेत त्याप्रमाणे आम्हाला वागायला हवं!" कंडक्टरने सांगितलं व आपल्या जागेवर जाऊन बसला. व तो बहुतेक आपल्या घरी फोन लावून बसला होता. ” काळजी घ्या, कारणाशिवाय बाहेर पडू नका!” अशा सूचना तो करत होता. ते ऐकून प्रवासी अधिकच घाबरत होते. त्याची लवकर आटोपून या ‘ ही सूचना लोकांनी खरोखरच मनावर घेऊन पटपट परतत होते.

“चहा प्यायची तल्लफ आली होती; पण नाही घेतला!” एक प्रवासी आपल्या शेजारी बसलेल्या माणसाला म्हणत होता.

“मी चार घेऊन आलो बिनधास्त. कसला करोना नी काय सगला डांबिसपना वाटतो!”तो असं बोलून गेला की जणू कोरोना हा आजार नसून कमाईचा धंदा आहे.

सकाळी सात वाजता गाडी पाली स्थानकावर उभी राहिली. माधव लगबगीने रिक्षासाठी बाहेर आला तर एकही रिक्षा हजर नाही व फूलवाल्याशिवाय एकही दुकान उघडे नव्हते हे पाहून आता काय करावे या विचारात असतानाच एक रिक्षा जवळ आली,

"दादा लग्न घरातील का?" त्यानं विचारलं.

" होय होय तुम्ही सोडणार का?"माधवने विनंती करत म्हटलं. तेव्हा तो म्हणाला,

"दादा तुमच्यासाठीच आलोय मी!"

" हो का? बरं झालं बाबा!" असं म्हणत तो रिक्षात बसला. मित्र त्याची वाट पाहत होताच. माधवला भेटून मित्र सखाराम ला खूप आनंद झाला. दुपारी साडेबाराच्या मुहुर्तावर लग्नाचा मुहूर्त होता त्यामुळे माधवनं पटपट अंघोळ करून नाष्टा केला, तोपर्यंत मांडवात लग्नविधी सुरू झाले. ००

विवाह समारंभ पार पडला आणि शेजारच्या घरात भोजनाच्या पंगती बसल्या. पत्रावळी लावून प्रथम पत्रावळीच्या उजव्या कोपऱ्यात वाढप्याने चिमूटभर मीठ ठेवलं. त्यानंतर भात,भाजी, लोणचं,पापड लावलं. वाढप्यामध्ये एक जाणकार नेहमी लक्ष ठेवून असतो तसा इथेही होता,व सूचना देत होता,

“ हां तिकडे पत्रावळ लाव,भात नीट वाढ,सांडू नकोस, भाजी लावली? ए.. वरणवाला पाठवा रे भात वाढून किती वेळ झाला आणा लवकर.. पाहुण्यांना आधी बसुद्या…” सूचना ऐकून पाहुण्यांच्या सोबतीला गाववाले बसले.

“ कुणाला पंगतिचे श्लोक पाठ असतील तर बोला. हल्ली लोक श्लोक बोलत नाहीत, आमच्यावेळी काय मजा होती..!” कुणाला श्लोक बोलता येत नाही असं एका ज्येष्ठ गृहस्थाने म्हटल्यावर एका पाहुणा आलेला पेटला आणि सुरूवात केली,

“ वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे.. , सुरू केलं आणि श्लोक बोलण्याची जणू जुगलबंदी सुरू झाली. माधव पहिल्या पंगतीला बसला नव्हता; आपण नंतर बसू असं म्हणत तो खळयाच्या बांधावर बसला होता. पहिली पंगत उठायची वेळ आली तसं गावातील हरीओमने सुरुवात केली,

“ हरीच्या घरी आमटी भात लाडू,.. हरी बोलतो लोकहो काय वाढू…,सर्व मंडळींनी जेवुनी तृप्त व्हावे.. विडा पान घेऊनीया मानवाने. ” सीताकांत स्मरण जयजय राम!” हा श्लोक ऐकून पाहुणे एकमेकांकडे चकीत होऊन पाहत राहिले. हा कोणता श्लोक? खरा श्लोक असा नव्हता असं कुजबुज करत होते. माधवलाही नवल वाटलं. तो म्हणाला,

“ भाऊ मूळ श्लोक असा नाही, तुम्ही शब्द बदलले आहेत. असे शब्द बदलण्याचा आपल्याला अधिकार नाही!” माधवचं म्हणणं सगळयांना पटलं. ‘हो हो हे बरोबर’ असे उद्गार निघाले. ते ऐकून हरींओम म्हणाला,

“ पावन्यानु आम्ही शेतकरी मानसं, आमच्या घरी कुठलं तूप शेवया आनि शिरीखंड. बरं पंगतीला एकपन बामन नाय हायत सगले शेतकरी. शेतकरी काय खानार?आणि बामनाला दक्षना द्यावी लागते,हितं शेतकऱ्यांना वरनभात,भाजी,वडे खायला घालून वर पानसुपारी दिली की झालं म्हनून आपल्याला पटल तंच बोलावं!”

“ व्हय व्हय हे बाकी बराबर. आता उठायचं का?” लोकानि रीतीरिवाजाप्रमाणे विचारले तेव्हा यजमान म्हणाले,

“ हो उठा!” म्हणताच मंडळी उठली.

लग्न समारंभ आटोपून नववधूची घरापासून भाड्याने मागवलेल्या लक्झरी बसपर्यंत मिरवणूक काढली. नेहमीप्रमाणे दोन्हीकडील ताशेवाल्यांनी कारण नसताना एकमेकांना सलामी देऊन आपापली ताकद दाखवली. नंतर भरलेल्या डोळ्यांनी वधुवरांची पाठवणी केली. वधुमायने लेकीच्या गळयात

मिठी घालून रडण्याचा कार्यक्रम पार पडला. ती रडतेय म्हणून बहिणींचे डोळे भरून आले. वरात निघून गेली व वधु बरोबर पाठराखण म्हणून पंधरा वीस व-हाड्यांनी आयत्या आलेल्या टेंपोत बसून नवरदेवाच्या बरोबर निघाले. तिथून घरी आले तेव्हा वधुच्या रिकामी मांडवात मुहूर्त मेढा व तिच्या सोबतीला मिणमिणता लामण दिवा तेवत होता. सगळा विवाह समारंभ पार पडला. वधुमाय डोळे पुसत आपलं काम करीत होती.

रात्री भोजन चालू असताना टीव्ही वर बातमी झळकली,

" दिल्लीत कोरोनाचे रुग्ण आढळले असून हा आजार संसर्गजन्य असल्यामुळे वेगाने पसरतो म्हणून देशात संपूर्ण लॉक डाऊन होण्याची शक्यता आहे. लॉकडाऊन म्हणजे सर्व वाहातूक बंद राहिल, आणि हळूहळू सर्व कार्यालये दुकाने वगैरे बंद होणार आहेत. नियम मोडून फिरणा-यांवर कारवाई केली जाईल!"

ही बातमी ऐकून सगळ्यांना धक्का बसला. माधवचे तर धाबे दणाणले,

" सखाराम माझी वाट लागली आता. अरे खरोखरच गाड्या बंद झाल्या तर? मी मुंबईत जाणार कसा?”

" भिऊ नको रे माझ्या घरातच आहेस ना तू ; आणि वाहतूक बंद होण्याची शक्यता आहे, झाली नाही तेव्हा तू दोन दिवस रहावं अशी इच्छा होती पण; तू सकाळीच नीघ बाबा,अडकलास तर तुझ्या घरचे आणि आम्हीही टेंशन मध्ये येऊ!"

" बरोबर आहे मी सकाळी चहा घेऊन निघतो!"

असं म्हणत त्याने लगेच मुंबईत फोन करून बायकोला म्हटलं मी निघालो आहे, काळजी करू नकोस व तुम्ही घाबरून जाऊ नका. काही दिवस सगळं बंद करून कोरोनाला आवर घातला येईल का बघू, असं शासनाला वाटत असावं. मी आल्यावर नक्की काय आहे ते कळेल.!"

संपूर्ण लॉक डाऊन म्हणजे काय? कित्येकांना ठाऊक नव्हतं. पुष्कळ लोकांना वाटलं मुंबई बंद भारत बंद असा काही तरी प्रकार असावा. भारत पाकिस्तान युद्धासाठी देशभर रात्री प्रकाश बंदी लागू केली होती. मुंबई बंदच्या दिवशी कडकडीत बंद असला तरी संध्याकाळी सहा वाजता बंद मागे घेतला जातो आणि वाहतूक वगैरे पुन्हा चालू होते तसा काही तरी प्रकार असावा. त्यामुळे शिमग्याच्या सणाला आलेले लोकही बेसावध राहीले होते आणि रात्री बारा वाजता देशात संपूर्ण लॉक डाऊन घोषित करण्यात आले,ही बातमी ऐकून माधवची पाचावर धारण बसली सखारामने त्याला खूप समजावले" थांब रे दोन दिवस काय प्रकार आहे ते पाहून मग तू जा!" अशी विनंती केली तरी त्याने मुंबईत जाण्याचा निर्णय घेतला व सकाळी उठून रस्त्यावर काही तरी वाहन मिळेल या आशेने वाडीतून मेनरोडवर आला तिथून एखादी एसटी बस किंवा सरकारी वाहन मिळेल या आशेने आला होता तर सर्वत्र शुकशुकाट होता. नंतर पाहातो तर अनेक लोक सॅक पाठीला लाऊन पळत आहेत . माहिती काढल्यावर कळलं ते मुंबईकडे चालत निघाले आहेत हे दृष्य त्याच्या अंगाला घाम फुटला.

थोड्या वेळानं सर्वांना कळलं की पोलिस नाके अडवून उभे आहेत आणि त्यांना पाहून तरूण मंडळी आडरानातून पळू लागलेत,पन्नाशितल्या माधवला

त्यांच्या वेगाने पळता येईना. अखेर अनोळखी रानातून धोका पत्करण्यापेक्षा रोडच्या जवळून वाट चालू लागला. आपण मित्राचं घर सोडून चुकीचा निर्णय घेतला याची जाणीव झाली व आता येईल त्या संकटाला सामोरे जाण्याची तयारी केली.

सकाळी सात वाजता बाहेर पडून कातळगावच्या टेंबावरील एका वस्तीजवळ आला. सुमारे पंधरा सोळा कि. मी. चालून आल्यावर त्याच्या पायात गोळे येऊ लागले, तो मटकन खालीच बसला. सोबतच्या बाटलीतील पाणी प्याल्यावर त्याला बरं वाटलं. नंतर आडरानातून पळण्याची आपल्यात आता शक्ति नाही हे ओळखून काय व्हायचे ते होऊ दे, असा विचार सरळ रस्त्याने चालू लागला व एका तिठ्यावर पोलिसांनी अडवलं,

" कुठे चालले? देशभर संचारबंदी लागू करण्यात आली आहे ठाऊक नाही का?"

" हो.. पण रत्नागिरीला.. . "माधवरावांनी बोलण्याचा प्रयत्न केला.

" सगळेजण हेच सांगत आहेत त्यांना गावातील शाळेत कॉरनटाईन केले आहे यांना पण तिकडे सोडा रे!"फौजदार साहेब हवालदाराला म्हणाले.

" फौजदार साहेब जरा माझं ऐकता का?"

" नाय ऐकायला वेळ नाही चला. रात्री बारा वाजल्यापासून इथे उभे आहोत,साधा चहा सुद्धा मिळत नाही!" एक हवालदार त्रासिकपणे म्हणाला.

" अहो साहेब मी सरकारी कर्मचारी आहे.. . मला मुंबईत जायचे आहे.!"

" तुम्ही सरकारी नोकर मग आम्ही डेलीवेजेस कर्मचारी आहोत का ?" फौजदार चिडून म्हणाला.

" माफ करा साहेब मला तसं म्हणायचं नव्हतं आणि सौजन्याने बोलतोय. माझ्याशी नीट बोला नाहीतर गडचिरोलीत पाठवणी करेन!" माधव ही चिडला.

" आमचं ऐकता की गडचिरोलीत पाठवता?काय ते ठरवा!" फौजदारही पोचलेला हटायला तयार नाही. हे पाहून माधवने शांतपणे पाकीटातून आपलं आय कार्ड काढून फौजदार साहेबांच्या पुढे धरलं. साहेब चार पावलं मागे सरकत म्हणाला,.

“ लांब उभे रहा. सहा फूट अंतरावर उभे राहून बोलावं अशी ऑर्डर आहे!”

“ बरं हे कार्ड बघा!” असं म्हणत कार्ड साहेबाच्या दिशेने फेकलं. त्याने ते उचलून पाहिलं आणि दिलगिरी व्यक्त करत म्हटलं,

“ सर माफ करा. अहो वरून ऑर्डर आली आहे की कोणालाही फिरू देऊ नका. आम्ही नियमानुसार वागत आहोत. लोकांना तरी किती अडवणार? प्रत्येक जण आपल्या घराकडे, नोकरीवर रूप होण्यासाठी धावत आहेत. तरी किती तरी जण निसटून गेले, थोडेफार हाती सापडले त्यांना मराठी शाळेत ठेवले आहेत. कोरोंटाईन असा काही तरी प्रकार आहे...” साहेब बोलत असतानाच त्यांच्या मोबाईल वाजला. त्याने फोन उचलला,व एस सर, एस सर! असं बराच वेळ बोलून फोन कट केला व माधवला म्हटलं,

“ बघा सर आता वरुन ऑर्डर आली आहे,हयगय करू नका नाहीतर.. ”

“मला नंबर द्या मी दोन मिनिटे बोलतो!” माधवने विनंती केली तेव्हा फौजदार साहेबांनी आपल्याच मोबाईल वर कॉल केला,व सांगितले की एक शासकीय अधिकारी बोलत आहेत त्यांच्याशी बोला!” असं म्हणत मोबाईल माधवकडे दिला.

“ सर मी माधव डोंगरे महसूल…असं म्हणत बराच वेळ बोलून झाल्यावर मोबाईल परत करत म्हटलं,

“ साहेब तुम्ही योग्य काम करत आहात. आज एका दिवसात एक हजार रुग्ण बाधीत झाले आहेत आणि यावर सगळ्यानी अलग रहावे. याला म्हणतात. इंग्रजीत कॉरंटाईन म्हणजे अलगीकरण आहे. ठीक आहे आता मलाही कुठेतरी रहावं लागेल. मी एका मित्राला फोन लावून बघतो!” असं म्हणत माधवने आपल्या मित्राला फोन लावला व चार पाच मिनिटे बोलून म्हटलं,

“ साहेब इथे टेंबे वाडी नावाची वाडी कुठं आहे विचारा. तिथे मित्राच्या घरात एक शाळा मास्तरीण भाड्याने राहते,तिथे एक खोली आहे!”

“ असं? थांबा. पोलीसपाटील इकडे या!” समोर चार पाच जण हातात कागदपत्रे घेऊन बसले होते त्यातील एक जण आला व लांबूनच म्हणाला,

“साहेब बोला!”

“ इथे टेंबे वाडी नावाची वाडी कुठे आहे?”

“ इथून वरती पाच मिनीटावर आहे!”

“ तिथे कोणी शिक्षिका राहतात का,?

“ होय साहेब पण कशाला?”

“ त्या घरचा मालक ह्या साहेबांचा मित्र आहे व त्याच्या घरात एक अलग खोली आहे तिथे ह्यांना राहण्याची परवानगी दिली आहे!”

“ साहेब तरी पण आम्हाला तसं करता येणार नाही. घरमालकाने आमच्याशी बोलायला हवं तरच परवानगी देता येईल. कालच पंचायतीने तसा निर्णय घेतला आहे व बाई एकट्या राहतात तेव्हा त्या काय म्हणतात हे पाहायला हवं नाहीतर आमच्यावर ठपका येऊ शकतो!” पो. पाटील म्हणाला. त्याचं म्हणणं माधवला व फौजदार साहेबांनाही पटल.

यानंतर पो. पाटलांनी बाईंना फोन केला व बोलणं झालं.

“ काय म्हणतात त्या?” साहेबानी विचारले.

“ त्या म्हणतात मी घर मालकांशी बोलून सांगते!”पो. पाटील म्हणाला. ते ऐकून माधव म्हणाला,

“ बरोबर आहे. परवानगीशिवाय त्या घरात येऊ देणार नाहीत. एक तर हा करोना काय प्रकार आहे,त्याची लक्षणं काय आहेत तेच कुणाला कळत नाही!”

“ मग मी काय करू?”पो. पाटील म्हणाला. इकडे माधवने आपल्या मित्राला फोन केला,

" हो, हॅलो हॅलो.. . विन्या, मी माधव बोलतोय.. .. .

“ बोल माधव . आज का आठवण झाली?” विनायकने हसत म्हटलं.

" साहेब माझ्या मित्राचं घर या वाडीतच कुठे तरी आहे, तुम्ही मला त्या घरात पाठवा!"

" कोण आहे तो? आम्हाला बोलूद्या त्याच्याशी!"

" हो बोला , हॅलो हा नक्की तुमचा माणूस आहे ना? हं हं बरं बरं!"पोलीस पाटील म्हणाला.

" ठीक आहे गावचा सरपंच आला की तुमची व्यवस्था करण्यात येईल!"

अशा त-हेने माधवची रवानगी त्या घरात होत असताना घराच्या एका पडवीत वाडीतील एक मास्तरीण बाई भाड्याने राहत होती ती घाबरून गेली,

" सरपंच अण्णा इथे कसे ठेवता ह्यांना मी एकटीच राहते आहे!"

"काळजी करू नका,घरवाल्याने परवानगी दिली आहे आणि हे काका सरकारी खात्यात मोठ्या पदावर नोकरी करतात त्यांना विरोध केला तर आम्हालाही भारी पडेल. शिवाय त्यांच्या जेवणाची व्यवस्था आम्ही करू आणि तुम्हाला काही त्रास होऊ लागला तर सांगा मग ते सरकारी असोत किंवा.. ’’सरपंच अण्णा म्हणाले.

" हे पहा सरपंच भाऊ मी स्वत:च टेन्शन मध्ये आहे . उगाच संशय घेऊ नका आणि मला कुठली ती पडवी उघडून द्या आणि घरातील एक चटई आणि एखादी उशी द्या. मी विनायकी परवानगी घेतली आहे!’’

“बरं राहा तुम्ही ;पण माझ्या घरी यायचं नाही!’’ बाईंनी बजावलं. ते माधव म्हणाला,

“ चालेल मला इथे काही दिवस राहुदे, लॉकडाऊन उठल्यावर मी निघून जाईन!’’

अशाप्रकारे माधवची व्यवस्था झाली. ते. कुटुंब नुकतंच शिमग्याला गावी येऊन गेले. त्यांच्याबरोबर त्या घरात राहणारे विनायक चे आई वडील गेले.

आईवडील शिमघ्याला गावी येणार होते. ते अडकून पडलै त्यामुळे पडवी रिकामी व स्वच्छ होती.

माधवने बाईंची भीती निघून जावी म्हणून त्याने ही पडवी निवडली होती. त्यानंतर पंचायतीमार्फत जेवण मिळू लागलं होतं तरी ज्या मावशीकडून डबा येत होता तिला आपल्याकडील अधिक पैसे देऊन विश्र्वास वाढवला.

" एका सकाळी न्याहारी आली तेव्हा दारात उभ्या असलेल्या बाईना म्हटलं,

"मॅडम मी पडवीच्या बाहेर बसलो तर चालेल का?"

" अं.. बसा!"

" धन्यवाद!"माधव बाईंचे आभार मानले.

माधवची न्याहारीसाठी भाकरी आली होती त्यातील अर्धी भाकरी मोडून तुकडे हातात घेतले व कावळ्यांना साद घातली. चार पाच कावळे फडफडत हजर झाले.

" अरे तुम्ही आहात का या गावी? आमच्या गावात दर्शनही नाही!" माधव जवळच्या कावळ्याला म्हणाला तेव्हा मास्तरीण बाई चमकली,हा कोण लागून गेला कावळ्यांशी बोलणारा?या विचाराने इकडे तिकडे बघत राहिली. माधवची नजर तिच्याकडे होतीच त्याने पटकन भाकरीचे दोन तुकडे जवळच्या बांधावर ठेवून म्हटलं,

" सावकाश खा, अधाशासारखं चोचित कोंबू नका!"असं म्हटलं तेव्हा बाईनी

" मोठा दानशूर लागून गेला आहे!" अशा अर्थाने मनातल्या मनात बोलत नाकाचा शेंडा उडवून पुन्हा मागे वळून रेंगाळली. इतक्यात

" तुम्ही पण आलात? या या तुम्हीही दोन घास खाऊन घ्या!" असं म्हणत भाकरीचे तुकडे मोडून त्यांच्याकडे टाकले,बाईंच्या रागाचा पारा चढला," वेड लागले का ह्याला? उगाच भाव खातोय. आपण मोठे उदार आहोत असं भासवत असावा. तसं असेल तर या माणसाला इथून हटवायला हवं असा विचार करू लागली.

दुपारी त्याची हजेरी घ्यायला सरपंच आला तेव्हा बाईंनी माधवच्या या विक्षिप्तपणाबद्दल तक्रार केली, तेव्हा सरपंच त्यांच्यापासून सुरक्षीत अंतरावर उभे राहिले व विचारलं.

" काहो माधव साहेब तब्येत ठीक आहे ना?"

" हो. काहो?"असं का विचारता?"

" नाय या अंजलीबाई म्हणतात तुम्ही पाखरांशी बोलत होता!"

"अण्णा मी मुंबईत सकाळी कावळ्यांना काही ना काही खायला घालतो. सकाळी घरातून खाली उतरलो की कंपाऊंडमध्ये कावळे माझी वाट पाहत असतात तेव्हा मी काही तरी खायला घालून सहज आपला त्यांच्याशी बोलतो. ती सवय जात नाही म्हणून इथे त्यांना काही खायला घालण्याचा प्रयत्न करत आहे. अहो अण्णा इथे मी एकटाच पडलोय, पुढे किती दिवस लागतील हे सांगता येत नाही. अशा रोगराईच्या दिवसात माणसं माझ्यापासून दूर पळतात

आणि पाखरं हाक मारताच जवळ येतात म्हणून पाखरांशी बोलतो, तोंड मिटून किती राहाणार!"

" बरं ठीक आहे. तुम्ही मोठे अधिकारी आहात असं कळलंय तर आम्ही काय बोलणार?”सरपंच अण्णांनी समजून घेतलं.

“ बरं अण्णा पाखरं काय लळा लावला की वाघ सिंह वगैरे प्राणी आपल्याशी मैत्री करतात. तुम्हाला चांगदेव महाराज आठवतात ना? ते म्हणे वाघाच्या पाठीवर बसून ज्ञानेश्वर माऊलींना भेटायला आले होते.

“ खरं आहे साहेब!” अण्णा भारावून म्हणाले. माधव म्हणाला,

“ अहो माऊलींनी रेड्यामुखी वेद वदवले!”

“ साहेब त्या काळी हे शक्य झाले असेल काय?” अण्णानी म्हटलं. ते ऐकून माधव म्हणाला,

“ अण्णा सर्व संत महात्मा ईश्वरी दूत होऊन जगाच्या कल्याणासाठी अवतार घेऊन पृथ्वीवर उतरले होते. माऊलींचा वेदाभ्यास विठ्ठल पंतांनी करून घेतला होता. तुकोबाराय म्हणतात तिसरी चौथी पर्यंत शिकलै होते, नामदेव महाराज ही शिकलेले असावेत ;पण संत चोखोबा संत सोयराबाई,संत जनाबाई, संत गोरा कुंभार,संत सावतामाळी ही मंडळींचं शिक्षण झालं होतं की नाही,कोण जाणे पण; त्यांच्या अभंगांचा अर्थ लावण्यात अभ्यासकांचे आयुष्य खर्ची जातंय तरी म्हणतात काही शब्दांचे अर्थ लागत नाहीत तेव्हा आपण काय बोलणार?”

माधवचे बोल ऐकून अण्णा थक्क झालेच शिवाय बाईंनी ओळखलं हा माणूस विद्वान आहे.

माधवची जेवणाची व्यवस्था झाली होती. जे जेवण मिळत होतं ते थोडं तिखट असल्यामुळे तो आवडीने खात होता. सकाळी पाखरांना घास घालून नंतर तो अंगणाच्या बांधावर बसून भाकरी खात असे. अंगणावर मांडव नव्हता त्यामुळे दुपारी ऊन पडतं असे आणि संध्याकाळी झकास मोकळे मोकळे वाटत असे. जसा जसा गरमा वाढत चालला तसं रात्री तरी पंखा हवा असं वाटू लागलं. एकदा तो अण्णाना म्हणाला,

".. . आणि अण्णा पडवीत पंखा नाही म्हणून रात्री अंगणात झोपलो तर चालेल?"

" अं.. .. बाई तुम्हाला चालेल का?तसा हा वाईट माणूस वाटत नाही!" सरपंच अण्णा बाईंना म्हणाले. तेव्हा बाई म्हणाल्या,

“ घरात सिलींग पंखा आहे तिकडे ओटीवर झोपा!”

“ नको. पडवीत उजेड चांगला येतो शिवाय मित्राचं घर राहायला मिळालं म्हणून जास्त फायदा घेऊ नये,नायतर भटाला दिली ओसरी आणि भट हातपाय पसरी ‘ तसं होऊ नये. मी एक शासकीय अधिकारी आहे मीच नियम मोडले तर तुम्ही सगळे मला हसाल!” मावळने म्हटलं तेव्हा बाई म्हणाल्या,

“ माझ्याकडे टेबल फॅन देते!”

बाईंच्या या होकाराने माधवला आनंद झाला. आपण सभ्य गृहस्थ आहोतच ;पण, परकी माणसं कशी विश्र्वास ठेवणार? आणि एकटी तरूण महिला तर नक्कीच ठेवणार नाही याची जाणीव त्याला होतीच.

रात्री जेवणानंतर माधवने अंगणातील कोपऱ्यात पंखा लावला व आपली चटई पसरली. त्याचं बालपण गावी गेलेले त्यात नेहमी गावी येणं जाणं असल्याने त्याला भुताखेतांची भीती वाटत नव्हती किंवा रानटी प्राण्यांचीही भीती वाटत नव्हती. शिकारीचा नाद होता म्हणून न भीता उशीवर डोकं टेकवून चादर उचलून अंगावर घेतली व देवाला हात जोडून म्हटल,

"देवा तूच आता माझा पाठीराखा. असो…आलिया भोगाशी असावे सादर फाटकी चादर.. .. अंगावरी "

त्याने अशी म्हणीची वाट लावताच बाई खुदकन गालात हसली. मुद्दाम नाटक करतोय आणि स्वतःला संत महात्मा समजतोय. असा विचार तिच्या मनात येत होता. तर इकडे माधव मोबाईल फोनला रेंज नाही म्हणून घरच्या माणसांशी कसा संपर्क साधावा या विचाराने हैराण झाला होता.

दुसऱ्या दिवशी गावातील देवाची पालखी घरोघरी फिरायला निघाली होती, ग्रामस्थांनी ढोल, ताशे,वाजंत्रीच्या सुरात पालखी बाहेर पडली. गावच्या रीतीरिवाज आणि परंपरा सांभाळून पालखी फिरू लागली खरं म्हणजे देव पावखित बसून ग्रामस्थांच्या घरी कृपाप्रसाद देण्यासाठी निघाली . कोरौनाची भीती एव्हाना लोकांनी मनावर घेतली नव्हती. केंर सरासरने देशभर लॉकडाऊन लावले होतेच ; पण लोकांनी ते गांभीर्याने घेतले नव्हते. अचानक जिल्हा

प्रशासनाने पालखी बरोबर चार सहा माणसं असावीत आणि पालखी घरोघरी न फिरवता वाडीतील ठराविक ठिकाणी पालखी बसवून लोकांनी देवाचं दर्शन घ्यावं किंवा ओटी भरावी असा आदेश काढला होता. यावरून पालखी नक्की कुठे बसवावी यावरून गावात खल सुरू झाला. ह्या बातम्या पसरल्या. शेवटी पालखी फिरविणेच जिल्हा प्रशासनाने बंद केले यावरून काही दिवस एकमेकांत जुंपली. शेवटी शहाणे सुरते लोकांनी विचार करून पालखी मंदिरातून बाहेर काढायची नाही हे ठरवलं. तत्पूर्वी मुंबईतून आलेले चाकरमानी आपापल्या घरी अडकून पडले. सगळ्याच्या उत्साहावर पाणी पडलं. ००

बघता बघता आठवडा उलटून गेला

एके माधव सकाळी उठला तेव्हा त्याला चहाची तल्लफ आली ; पण मागणार तरी कुणाकडे खायला चार घास मिळताहेत हेच नशीब म्हणत उठला व आपली चटई उचलून आत गेला व पाठीमागील पाण्याच्या टाकीजवळ आंघोळीला गेला. नशीब मित्राच्या घरी नळपाणी योजना सुरू होती मास्तरीणबाईंसाठी पाणी चालू ठेवलं होतं.

नेहमी प्रमाणे सरपंच आणि पोलिस पाटील,एक नर्स,एक महिला डॉक्टर असा ताफा हजेरी घ्यायला आले तेव्हा माधवनं चहाची समस्या बोलून दाखवली आणि शंभर रुपये पोलिस पाटलांच्या हाती देऊन साखर,चहा पावडर आणि दूध पावडर आणि माचिस वगैरे मागवून घेतले व परसावात पडलेली

लाकडे गोळा करून चहाची व्यवस्था केली. अंजली बाई लांबून त्याच्यावर लक्ष ठेवून होतीच.

चैत्र महिन्याच्या पहिल्या दिवशी घरोघरी गुढ्या उभ्या राहिल्या. माधवच्या जेवणात गोड पदार्थ खीर होती. बरं वाटलं लोकांनी थोडक्यात गोड मानून घेतलेलं दिसून येत होतं. ह्या महिन्यात ग्रामिण वातावरणात सुखद गारवा पसरला होता. सकाळी संध्याकाळी पाखरांची मधूर किलबिल मन मोहीत करत होती. चाफा,पळस,पांगारा,सावर गुलमोहर,कुडा,करवंदी आणि अनेक फुले फुलली होती,त्यांच्या प्रेमात पडलेले पक्षी आणि भ्रुंग गुणगुण करत घिरट्या घालत होते.

ह्या प्राण्यांना साथीचे आजार कळत असतात का? कळलं तर कसे काळजी घेत असतील. रानात एखादा वाघ दिसला तर सातभाई व माकडे धोका आहे असं वेगवेगळ्या आवाजात इतर प्राण्यांना इशारा देत असतात;पण रोगराईचं काय? कसं कळत असेल?” तो मनात विचार करत राहिला.

ही टेंबे वाडी गावातील मध्यम अशा टेंबावर म्हणजे टेकडीवर होती त्यामुळे वारे वेगाने वाहत होते. घराघराच्या दारात चाफा, गुलमोहर आणि अनोळखी फुले उमलून निसर्गाची रंगपंचमी उधळत होती. माधवला आठवलं,वीसेक वर्षांपूर्वी इथे एकही घर नव्हतं ;या निसर्गरम्य परिसरात वस्ती का नाही?असा प्रश्न त्याला एस टी बसमधून आपल्या गावी जातायेता पडे.

नंतर या भागात पाण्याची सोय होण्यासारखी नाही हे लक्षात आलं. नंतर कुणी एकानं हुशारीने पाण्याची व्यवस्था करून एक चहाची टपरी टाकली. टपरी बरी चालते हे पाहून नंतर छोटंसं घर बांधलं आणि बघता बघता प्रवास करायला हमरस्ता जवळ आहे हे बघून वीसेक घरांची वस्ती झाली. तिथे या मित्राने बांधलं तेव्हापासून तो मित्र "चार दिवसांसाठी ये म्हणायचा" ;पण योग येत नव्हता आणि सुदैवाने की दुर्दैवाने म्हणा तो योग अशा परिस्थितीत आला की योगायोगाचं हंसू येऊ लागलं.

हा आवडलेला परीसर मित्राला सांगायला मोबाईल नेटवर्क नव्हतं. एका बाजूला घरची माणसं चिंतेत असतील आणि दुस-या बाजूला ज्या लग्न घरातून बाहेर पडलो त्यांनाही चिंता लागली असणार हे कळत होतं आणि मोबाईलला नेटवर्क नाही काय करावं? असा विचार त्याच्या मनात येत होता.

सकाळी हजेरी घ्यायला पोलिस पाटील एका पोलिसाला घेऊन आला तेव्हा वातावरण गंभीर होत असावं याची जाणीव झाली. तो पोलिस पाटलाला विनंती करत म्हणाला,

" भाऊ,हे ठिकाण फारच निसर्गरम्य आहे पण येथे माझ्या मोबाईलला नेटवर्क नाही त्यामुळे माझ्या घरची मंडळी चिंतेत पडली असणार म्हणून मला येथे नेटवर्कअसलेल्या कंपनीचं सीमकार्ड मिळेल का?"

" साहेब दुकानं बंद आहेत सीम कार्ड देणार कोण?"पोलीस पाटील म्हणाला.

" बरोबरच आहे; पण हल्ली तरूण मुलांकडे दोन तीन मोबाईल असतात त्यातील.. .

" बघा हो भेटला तर द्या. साहेब सरकारी नोकर आहेत कधीतरी उपयोगी पडतील तुमच्या!" जवळचा पोलीस म्हणाला तेव्हा हसला. नंतर पोलिसपाटलाने खरोखरच एक सीमकार्ड मिळवून दिलं..

मोबाईल चालू होताच . माधवने प्रथम घरी फोन करून बायकोला खबर दिली, तिला हुंदका फुटला. मुलं मोठी होती त्याने सुरू समजून घेतलं. नंतर मित्राला फोन करून थाप मारली की मी शासनाच्या गाडीने मुंबईत पोहोचलो.

_

- ६-

सखाराम लग्नसमारंभाच्या आवराआवरीत होता त्याला खरं वाटलं. तरी वेळ काढून त्याने माधवला आलेल्या नंबरवर फोन केला,

“ अरे मुंबईत काय परिस्थिती आहे? इकडे जाम हालत झाली आहे. कुठे जाता येत नाही, कुणाला भेटावसं वाटलं तर भेटता येत नाही!” सखाराम बोलत होता आणि माधव हो हो करत होता.

“ तुझं ऑफिस चालू आहे का घरातून काम करतात तसं चाललंय?”

“ ऑफिसला दोन ती दिवसांनी जावं लागतं. आमच्यासाठी खास बस लावली आहे!” माधवं म्हटलं.

“ काय योगायोग आहे बघ. पोरीचं लग्न पार पडलं आणि संचारबंदी लावली, आधी लावली असती तर मोठा बिकट प्रसंग ओढवला असता आणि तुला सांगतो आमचे दोन पाहुण्यांना एका गावातील शाळेत अडकून ठेवलं आहे. कॉरंटाईन म्हणतात त्याला. काय असतं ते ?” अनभिज्ञ सखारामने विचारलं तेव्हा आता ह्याला कसं सांगू असं वाटतं असताना पुढे म्हटलं,सुरक्षीत निवारा म्हणजे कॉरनटाईन असतं. तिथे दररोज अशा लोकांची वैद्यकीय तपासणी केली जाते. भिण्मासारखं काही नसतं ; पण हा आजार वेगळाच संसर्गजन्य आहे.

यानंतर सखाराम ने एक घटना सांगितली. ती अशी की . दोन दिवसांपूर्वी

हाप पॅटवर टी शर्ट घालून एका हातात एक कापडी पिशवी आणि दुसऱ्या हातात काठी घेऊन तोंडावर मास्क लावलेला एक इसम रस्त्यावरून इकडे तिकडे नजर टाकत येत होता. टेंबे वाडी नाक्यावर रस्ता अडवून धरलेल्या पोलीसांनी त्याला अडवलं.

" ओ भाऊ कुठे चाललात?"

" ह्यं तिकडे.. .. " त्याने समोरच्या दिशेने हात दाखवला म्हटलं.

" ह्या दिशेला लांजा राजापूर पासून गोव्यापर्यंत कुठल्या गावात? पोलीस म्हणाले.

" अहो तं काय झालं,काल सकाली बैल सोडला व्हता. म्हटलं जरा पाय मोकले करून यैल ता अजून परत आलाच नाय!"

इसम म्हणाला,

" बरं इकडे शोधायला आलाय?"

" व्हय व्हय!"

" नाव काय सांगा!"

" सर्जा! "

" बैलाचं नाही तुमचं नाव सांगा!"

" सदू मजे सदाशिव पाटोले!"

" बरं हवालदार ह्याला पोलीस पाटलाने दोन बैल वरच्या वाडीत बांधून ठेवले आहेत ते दाखवा!"

"मजे भैटला व्हय. लय म्हेरवानी झाली सायब!"

" बरं बरं चला!" असं हवालदार बोलत असताना दुसरा एक जण आला. पोलीसानी त्याला अडवलं.

" ओ भाऊ थांबा . कुठे चाललात?"

" पालीला चाललोय सासरा लय शिक हाय असा फोन आला व्हता तं म्हटलं एकदा भेटुन यावं म्हातारं मानूस त्यात हा करोना असं म्हणत त्याने सदूला पाहून म्हटलं,

"अरं सदू तू इकडं काय करतोस?”त्यामुळे लोक घाबरतात.

सखारामने सांगितलेली ही घटना ऐकून मुंबईसारख्या गजबजलेल्या शहारातून लोक भीतीने बाहेर पडत आहेत याची जाणीव झाली.

रोज सकाळी भाजी भाकरी व दुपारी व संध्याकाळी जेवण येत होतं. गावात किंवा वाडीत सर्वत्र शांतता असायची. शेतीची कामे खोळंबली होती. भाजावळ झाली होती पुढच्या कामासाठी बाहेर पडावं का नाही या विचाराने लोक चिंतेत पडले होते.

वैशाख महिना सुरू झाला आणि तापमान वाढायला सुरुवात झाली. रात्री माधव कधी घरातील खोलीत तर कधी पडवीत झोपत असे. हे पाहून बाई म्हणाल्या,

“ तुम्ही बाहेर नका झोपू एक बिबट्या फेरी मारताना लोकांनी बघितलं आहे!” त्यांच्या सुरात काळजी दिसून आली. हे पाहून म्हणाला,

“ ठीक आहे. लाईट चालू आहे आणि कुणीतरी जागतो आहे हे पाहून बिबट्या किंवा डुक्कर जवळ येत नाहीत!*

“ कशावरून?”.

“ अहो मी शिकारी माणूस आहे. माझ्या गावातील सगळ्या रानवाटा,गुरवाटा, शेतीवाडी फिरलो आहे अजूनही सुट्टीत आल्यावर शिकारीला जातो.!”

“ तुम्ही एवढे मोठे शासकीय असताना निरपराध जीव बळी जाताना वाईट वाटत नाही?” बाईंनी त्रासून विचारले. ते ऐकून माधव क्षणभर हसला.

“ का हसलात?” त्यानी विचारले. तेव्हा माधव म्हणाला,

‘ जीवो जीवस्य जीवनम्’ हा सिद्धांत तुम्हाला ठाऊक असायला हवा होता!”

“ आहे चा्ंगलं ठाउक आहे तरी थोडं वाईट वाटतंच!”

“ मॅडम भातशेती पिकाला आली की डुक्कर शेतात घुसून नासधूस करतात हे कधी ऐकलं नाही?” माधवने परिस्थितीची जाणीव करून दिली.

बाईंनी ओळखलं की माधव शासकीय अधिकारी असून विद्वान आणि संयमी व्यक्ती आहे. याच्याशी आपण संयमाने वागायला हवं, पुढे कधीतरी यांच्या ओळखिचा फायदा घेऊन बदलीसाठी उपयोग करता येईल. ००

.

चैत्र सरला होता वैशाख महिना सुरू झाला. उष्मा वाढला होता. माधवला थंड पाणी हवं होतं आणि बाईंच्या घरी फ्रीज आहे;पण पाणी मागितले तर देतील का? असा प्रश्न पडला होता. अखेर त्याने दाराबाहेर उभं राहून बाईंना म्हटलं,

“ मॅडम थोडं थंड पाणी देता का?” त्याचा प्रश्न ऐकून बाईंनी दार उघडले व फ्रीज मधील थंड पाण्याची बाटली बाहेर आणली. माधवने म्हटलं,

“ ह्या बाबतीत पाणी ओतून द्या!”

बाईंनी पाणी ओतून दिले ते घेऊन झाल्यावर माधव म्हणाला,

“ बस झालं आता दरवाजा बंद करा!”

थंड गार पाणी प्यायला नंतर त्याला खूप बरं वाटलं. तहान भागली म्हणून तो उडणार तोच मोबाईल वाजला, शकुंतला फोन वर होती.

“ जेवलात का?”

“ आता बसतोय. कसे आहेत सगळे? हं.. जेवण आठवतंय.. दुसरा पर्याय नाही.. झोप काय लागणार? कधी सुटका होईल कोण जाणे. विक्रांत अभ्यास करतो का? वगैरे चोकशी करून झाली. रडू नकोस मी ठीक आहे.. मधु काय करतेय? स्वयंपाक? व्वा!” शिकू दे .. बरं ठेवतो!” माधवने मोबाईल खाली ठेवला तोच बाई बाहेर आल्या व विचारले,

“ तुम्ही कोणत्या विभागात राहता?”

“ वडाळयात राहतो. चांगली वस्ती आहे!”

“ तिकडे खूप पेशंट भेटले आहेत का?”

“ अहो सगळीकडे कोरोना पसरला आहे व नक्की कुठे किती आहेत हे कळायला कठीण असतं. सगळी आकडेवारी अंदाजित असते. तुम्ही मुंबई पाहिली आहे?”

“ कधीतरी लग्न वगैरे साठी जातो आम्ही. आमच्या घरचे सगळे गावी असतात!”

“मग तुम्हाला काही अंदाज लावणे कठीण आहे. मुंबई अफाट शहर आहे आणि दाटीवाटीने वस्ती असल्यामुळे कोणताही आजार लगेच फैलावतो. वस्ती अफाट असल्याने बेशिस्त आणि बेफिकीरपणा जास्त आहे. शिस्त लावण्यासाठी शासनाकडून सतत प्रयत्न केले जातात तरी कमी पडतात.

हा आजार परदेशी लोक जास्त शिस्तप्रिय आहेत, वस्ती विरळ आहे तरी कोरोनाने तिकडेही हाहाकार माजवला आहे.

“ह्यावर उपाय काहीच नाही का?” बाईंनी विचारलं. तेव्हा माधव म्हणाला,

“ अजून तरी काही खात्रीचा उपाय सापडला नाही. आपल्या आरोग्य खात्याच्या प्रयत्न चालू आहे बघू!” माधव म्हणाला. तो म्हणत असला तरी एखादा नवीन आजार येतो तेव्हा उपाय सापडेपर्यंत अनेक निष्पाप जीव बळी जातात हे अनुभवले असल्याने पुष्कळ वेळ तो तसाच विचार करत राहिला. बाई उठून घरात गेल्या.

-७-

माधव न्याहारीसाठी आलेली भाकरी भाजी आल्यावर तो दररोज पाखरांना आधी घास घालणं नित्याचं झालं होतं. तो पाखरांना बोलावत असे व त्याची साद ऐकून की भूक लागली म्हणून की काय पाखरं जमा होत.

" घे बाळा तू एक तुकडा घे.. . हळूहळू खा सावकाश खा.. एक घास बत्तीस वेळा चावून खा हे तुम्हाला कोणी शिकवलं नाही का रे?" असं एकदा म्हणाला तेव्हा अर्धे दार उघडून त्याचं हे पाखरांना घास घालू बघणं चालू असायचं. एक घास बत्तीस वेळा.. हे वाक्य ऐकून हा आपल्याला टोमणा मारत असवा ' असं बाईंना वाटलं.

बाईंना आधी वाटलं होतं दररोज पाखरे कुठली येणार? नंतर कमी होतील; पण झालं उलटं नवनवीन पाखरे हजरी लावू लागलो. ह्या पाखरांत बुलबुलची संख्या वाढत चालली. काही पाखरे चिमणी, मैना, वगैरे दाणे खाणारी पाखरे भाकरीच्या बारीक तुकड्यावर चोच मारत होते. उरलेल्या शिळया भातावर बुलबुल ताव मारताना दिसलें. हे कसे काय शक्य आहे? बाईंना विचारायला हवे म्हणून त्याने मागे वळून पाहिले तर बाई दरवाज्यात उभ्या. माधव हसला. आपल्यावर बाईंची बारीक नजर आहे हे ओळखलं तरी विचारले,

" मॅडम बुलबुल पक्षी भात खातो का,?"

प्रश्न अचानक विचारल्यावर बाई गोंधळल्या. कारण कावळा भात भाकरी,मटण मासे सगळं खातो हे सगळे बघतात;पण बुलबुल भात खातो की नाही हे कुणी पाहिलंय? तेव्हा विचारलेल्या प्रश्नाचे काय उत्तर द्यावे हे सुचेना. बरं पुस्तकात पक्षी किंवा इतर प्राणी काय खातात हे वाचून माहिती असते ;पण प्रत्यक्षात काय खातात हे कोणी पाहिले नसते,या खेरीज वेगळं काही खात असू शकते. आपल्याला उत्तर माहीत नाही अस झाल तर आपल्या शिक्षकी पदवीचं काय?असा विचार करून म्हटलं,

"सर आमच्याकडे जेवणात भात कमी असतो शिवाय मोठमोठे वृक्ष नाहीत, शेतात दाणे भरपूर प्रमाणात असतात त्यामुळे बुलबुल भात खातो का? हे निश्चितपणे सांगता येणार नाही!"

"उत्तर जवळ जवळ बरोबर आहे.

माधवचे हे उद्गार ऐकून बाई मंद हसल्या. हळुहळू दोघांमधील संकोचपणा कमी होत होता.

चैत्र पौर्णिमा जवळ आली होती, दिवसेंदिवस चांदणे बहरत चालले होते, रात्री अंगणातील लाईट बंद केले की कोवळे चांदणे अंगणभर पसरू लागले होते. माधवला चांदणे म्हणजे उत्सव वाटत असे. जेवणापूर्वी तो अंगणात चटई व उशी टाकून लवंडून मोबाईलवर बातम्या व शासनाने काढलेले आदेश वाचत असे. बातम्या पाहिल्यानंतर माधवच्या कळलं की सरकारी कर्मचारी घरी बसून काम करत होते आणि महापालिका कर्मचारी कामावर जात होते. विशेषता दूर राहणारे कर्मचारी वाहतूक बंद असल्याने घरी अडकून पडलेले त्यामुळे पालिकेची सेवा व्यवस्था कोलमडून पडली होती. अखेर शासनाने दूरच्या कर्मचाऱ्यांना मुंबईत येण्यासाठी एसटी बसची व्यवस्था केली. सुरक्षीततेचे सर्व नियम पाळून कर्मचारी आपली सेवा बजावत होते, त्यांना पार्सलने भरपूर खाणे पिणे मिळत होते. माणसांचा वावर कमी, कंपन्या बंद,दुकाने बंद,सगळी सरकारी हॉस्पिटलमध्ये कोरोनाणे पेशंट त्यामुळे बाकीचे किरकोळ आजारासाठी लोकांनी हॉस्पिटलकडे पाठ फिरवलेली.

पाण्याचा मर्यादित वापर असल्याने पाईट फुटणे वगैरे दुरूस्तीची कामे तरी महापालिका व शासकीय सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने हजर राहणे भाग होते. जेव्हा घरात सुरक्षित असलेले लोक भीतीने ग्रस्त झाले होते तेव्हा महापालिका कर्मचारी, पोलिस खाते आणि रुग्णसेवा कर्मचारी जीवाची पर्वा न

करता आपली सेवा बजावत होते. हे सगळं पाहून माधवच्या अंतःकरणात कळवळा दाटून येत होता. ००

माधवचे दिवस बरे चालले होते. एके दिवशी त्यांचा जेवणाचा डबा घेऊन येणारा मुलगा म्हणाला,

“ साहेब माझ्या आईची तब्येत बिघडली आहे तेव्हा तुम्ही तुमच्या जेवणाची व्यवस्था कुठेतरी करा!” हे ऐकून माधव थंड पडला. त्या कुटुंबाला दोश देण्यात काही अर्थ नव्हता. त्याची आई आजारी पडली की घाबरून डबा बंद केला?असो. आता हेच परत झाले तर? त्याने स्वतः वरणभात करायचं ठरवलं. व पोलीस पाटलाला फोन करून बोलावून घेतलं व आवश्यक तेवढे डाळ तांदूळ, भाजी पाला वगैरे मागवून घेतलं व लगेच घरातल्या मित्रला फोन केला

“ विनायक जरा एक समस्या उभी राहिली आहे! “ असं म्हणत सर्व वृत्तांत सांगितला तेव्हा त्याने घर उघडून आवश्यक भांडी काढून घेतली. व पडवीत चूल मांडली. मित्राने घर उघडून दिलं होतं तरी त्याचं कीचनचा वापर करायचा विचार केला नाही. कीचनची मालकी त्या घरच्या गृहणीची असते याची जाणीव ठेवून कीचनला हात लावला नाही.

पोलीस पाटलांच्या घरून मसाला वाटून आल्यावर त्याने विनायकच्या खोपीतील लाकडे काढून तीन दगडांची चूल बनवली. त्याची ही गडबड पाहून बाईना जेवण बंद झाले होते हे कळलं होतं त्यांनी विचारले,

" तुम्हाला जेवण बनवता येते?" ह्या प्रश्नावर ' उदरभरण नोहे जाणीजे यज्ञकर्म ' एवढा तरी स्वयंपाक मला करता येईल.!

"आजच्या दिवस मी देते,उद्यापासून तुम्ही बनवा!" बाई म्हणाल्या.

"बरं तुमचा मान ठेवतो द्या. दररोज न्याहारीसाठी दोन भाकऱ्या देवू शकत का? मी पैसे देईन!"

" देईन. पैस्याचं बोलू नका! सर मला तुमची भीती वाटत होती;पण आता नाही वाटत. तुमची सोबत होते आहे हेच खुप!" बाईंनी कबुली देत म्हटलं तेव्हा माधव म्हणाला,

" तुम्ही बरोबर होता. कणत्याही परपुरूषावर लगेच विश्वास ठेवू नये. मॅढम मला इथून कधी सुटका होईल याची चिंता लागून राहिली आहे. मुंबईत मुलं आणि बायको आणि मी इकडे. ते माझी काळजी करताहेत व मी इकडे त्यांची काळजी करत आहे. जेवण कसं गोड लागेल. तरी शांत आहे. आपली मनःशांती गेली की आपलं नुकसान होतं हे मी ओळखून आहे!"

यानंतर दुपारी बाईंनी माधवला घरात बसवून जेवायला वाढलं. बाईनी विचारले,

" कसं झालं आहे जेवण?"

“ माझ्यापेक्षा चांगलं!” माधव उत्तरला. तेव्हा बाई खळखळून हसल्या. माधवही हसण्यात सामील झाला. ००

एकदा सकाळी मुंबईहून एक चाकरमानी आला असून त्याला त्याच्याच घरात एका वेगळ्या खोलीत कॉरोंटाईन केले आहे याची बातमी गावभर पसरली. दुसऱ्या क्षणी जवळच्या शेजारच्या लोकांनी आपापले दरवाजे बंद केले हे पाहून माधवला वाटलं आता बाई नक्कीच घाबरतील म्हणून दुसऱ्या सकाळी चूल पेटवली व प्रथम चहा करून घेतला.

आपल्याला आता थोडीफार लाकडे फोडून ठेवायला हवीत. पक्षसावात चार पाच लाकडांचे ओंडके पडलेले आहेत, बहुतेक ते फोडायला कोणी भेटला नसावा. विनायकला विचारले तर ??? फोन लावून बघतो..

“ हॅलो विनायक…”

“ बोल माधव अरे कसं चाललंय तुझं?” विनायकने विचारले.

“ अगदी मस्तच चाललंय. माझ्याच घरी असल्यासारखं वाटतंय!”

“ मित्रा तुझंच घर आहे असं समजा!”

“ बरोबर तेच बोलतोय. काल तीन दगडांची चूल बनवून ठेवली आहे. चहा करून घेतला. बरं ते खोपीजवळ लाकडानचे ओंडके आहेत ते फोडून घेऊ का?”

“ अरे घे ना.... पण खोप भरलेली आहे त्यातील घे!”

“ नको नको. तुझ्या संपत्तीवर दरोडा घातला तर बरोबर नाही. हल्ली लाकडे फोडून देणारे कमी झाले आहेत. उद्या येतो म्हणून सांगतात आणि येतच नाहीत शिवाय मला वेळ घालविण्यासाठी आयती संधी चालून आली आहे. बरं खोपीत कु-हाड आहे ती घेतो!” माधवला वाटत होतं आपण मैत्रीचा जास्त फायदा घेणं बरं नाही. असं म्हणत त्याने अंगावरील ट शर्ट काढून बनियन घातली. व एक ओंडका आडवा ठेवून दुसरा ओंडका सरळ ठेवला व ‘ पुंडलिक वरदा हरी विठ्ठल.!” असा घोष करीत ओंडक्यावर कु-हाडीचा घाव घातला. तो वेगळा आवाज ऐकून ‘आता हे काय नवीन? असं म्हणत बाई बाहेर येऊन पाठच्या बाजूला गेल्या. बघतात तर आपला शेजारी माधव लाकडे फोडत आहे. त्या हसल्या व जवळच्या बांधावर बसून ह्याची कामगिरी बघू लागल्या.

“ हसताय ना? तुम्हाला वाटत असेल मला लाकडे कशी फोडता येतात?” हे उद्गार ऐकून बाईंनी म्हटलं,

“ मी काहीही बोलले नाही, तुम्हालाच तसं वाटतंय!”

“ ठीक आहे. शेतकरी माणसाला सगळी कामे करता आली पाहिजेत!”

“ किती शेतीवाडी आहे तुमची?”

“ पोटा पुरती आहे!”

“ इकडे कोणाला विचारावे तर हेच म्हणतात पोटापुरती आहे,याचा अर्थ मला अजून लागत नाही!”

“ साधा अर्थ आहे. पोटापुरतं म्हणजे त्या घरातील माणसांना वर्षभर पुरेल इतकं पीक येणे. विकण्याइतकं पिक येत नाही. तुमच्याकडे केळी इतकी असतात की तुम्ही विक्री करता. इकडे केळ पिकली की आम्ही खाऊन टाकतो.!”

“ असं होय. आता कळलं. बरं झालं तुम्ही शेजारी राहायला आलात!” म्हणत बाई हसल्या ते पाहून माधव हातातील उचललेली कु-हाड परत खाली ठेवत म्हणाला,

“ मॅडम मी इथे कायमचा राहायला आलो नाही, लॉकडाऊन उठल्यावर जाणारच मआहे!” माधव उत्तरला तेव्हा बाई चिंतातुर झाल्या.

“ काय झालं? चेहरा का पडला तुमचा?” माधवने विचारले. तेव्हा त्या म्हणाल्या,

“ मी एकटी पडलें तर काय करू?”

“अहो लॉकडाऊन उठणार तेव्हा ह्या घरचे काका काकू पुन्हा इकडेच येणार ना?” माधवने समजावले ते ऐकून कपाळावर हात मारत बाई म्हणाल्या,

“ अरे हो! हे माझ्या लक्षातच आलं नाही. छे कोरोनाने मती गुंग झाली आहे!”

“आता जरा शांत व्हा आणि एक कप चहा द्या!”. हे ऐकून बाई हसत घरात निघून गेल्या. ००

चहा घेऊन बाई बाहेर आल्या व एक कप माधव पुढे धरला. चहाचा पहिला घोट घेतला व म्हटलं,

" मला तल्लफ आली की अर्धा कप चहासुद्धा चालतो!"

" दिवसभर चहा पिणारे असेच असतात!"

बाईंच्या वाक्यावर माधव म्हणाला,

" तसं नाहीय ते. पूर्वी मुंबईत इराणी हॉटेलमध्ये पानी कम चहा मिळत असे. तो चहा घट्ट बहुतेक मस्का मारलेला असे,त्याची चव वेगळीच होती. तो चहा पिऊन अर्धा कप चहा हे माझ्या तोंडातून येते!"

" हे मी ऐकले होते. आमच्या खेड्यात इराणी हॉटेल नाहीत म्हणून अनुभव नाही!' ००

माधवने स्वतःसाठी वरणभात करून भाकरीसाठी झुणका केला. पैकी स्वयंपाक भात केला कच्चा झा५ला,वरण केलं पातळ झालं..." असं झालं होतं. सगळी तयारी करून जेवायला थाळी घेऊन बसणार इतक्यात बाई भाकरी घेऊन आल्या. त्यानी पाहिलं टोपात झुणका आहे, म्हटलं,

" तुम्हाला झुणका बनवता येतो वाटतं!"

" नुसता बनवता नाही तर चांगला बनवता येतो. बघा चव तरी बघा देऊ? चालेल का?"

“ न चालायला काय झालं. द्या!” माधवने भाकरी काढून घेतली व त्याच थाळीत चमचाभर झुणका दिला. पुरुषांनी बनविलेल्या अन्नपदार्थाचं स्त्रीयांना फार कौतुक नसतं तरी बाईंनी बोटावर झुणका घेऊन चाखला व चव पाहून म्हटलं,

“ खरंच छान झुणका अगदी चवदार बनवता तुम्ही!”

आपल्या झुणक्याची केलेली ही स्तुती ऐकून माधव दिलदारपणाचा आव आणत म्हणता,

“ मी पुन्हा झुणका बनवीन तेव्हा चमचाभर देईन तुम्हाला!” हे वाक्य ऐकून बाई हसत म्हणाल्या.

“ मी वाट पाहीन!” म्हणताना खळखळ हसल्या. ०○

दुपारच्या बातम्या टीव्हीवर चालू होत्या. त्यात एक बातमी झळकली की,दारू बंद झाल्याने एका व्यक्तीने किरकोळ कारणावरून आपल्या बायकोला मारहाण केली. बाईंना किंवा माधवला ह्या बातमीचं विशेष असं कौतुक वाटलं नाही. इतक्यात पुढची बातमी होती की दारूची दुकाने -

उघडा म्हणून लोकांची मागणी वाढली आहे. बाईंनी म्हटलं, “ सर हे सगळं विचित्र वाटत नाही का? ‘दारू पिणे आरोग्यास धोकादायक आहे ‘ असे संदेश देत असतात त्याचं काय?” यावर माधव म्हणाला,

“ विचित्र आहे खरं ;पण त्यातही एक गोम आहे. मी दारू पिणाऱ्यांचं समर्थन करीत नाही. बघा श्रमजीवी कामगार संध्याकाळी ‘थोडीशी ‘ लावून घरी गेल्यावर जेवण करून लगेच झोपतात. ती त्यांची सवय मोडता मोडत नाही. फार कमी लोक निश्चयाने दारू सोडतात. ज्यांची सुटत नाही त्यांना घेतल्याशिवाय चैन पडत नाही तेव्हा घरात बसून चिडचिडेपणा वाढतो तो राग बायको किंवा मुलांवर काढतात.

“ हे पटलं बायको आणि त्यांच्या मुलांना नाहक भोगावं लागतं. दारू पिणे धोकादायक आहे ‘ हे सगळं सांगून सांगून विचारवंत आणि डॉक्टर थकले . तेव्हा पिऊन घरातील धिंगाणा कमी होतो म्हणून म्हणतात “ घे बाबा पण गप्प बस’’’ अशी परिस्थिती निर्माण झाली आहे म्हणून शिवाय या कठीण परिस्थितीत दारु मुळे प्रचंड महसूल वाढतो ह्या कारणाने दारुची दुकाने उघडण्याची गरज आहे असं मला वाटतं. आणि एवढं बोलून माझे दोन शब्द संपवतो धन्यवाद!”

माधवचा खुलासा सदृश्य भाषण ऐकून बाई खो खो हसत सुटल्या. त्यांना हसताना पाहून बाई किती छान हस्ते. तिचं हसणं काळजात साठवून ठेवावं असे विचार त्याच्या मनात चमकून गेले व तो तिच्याकडे बघतांना देहभान हरपून गेला.

बाईंनी माधवची अवस्था पाहून बाईंनी लाजून म्हटलं,

“ सर असं नका ना बघू!”

“सॉरी सॉरी. अहो फुलांचं फुलणं आणि तरुणींचं लाजणं हे निखळ सौंदर्याचं लक्षण असतं. शिवाय आता तुम्ही माझ्याशी मोकळेपणाने वागता हे पाहून आज माझा तोल जरासा गेला खरा!”

यानंतर बाईंच्या मनात काहूर उठलं . गोड बोलणारा हा माणूस आपल्या प्रेमात पडला आहे का?’ असं असेल तर सावध रहायला हवं!”.   ००

माधवची न्याहारीसाठी आलेली भाकरीचा घास आधी पाखरांना घास घालणं नित्याचं झालं होतं. तो पाखरांना बोलावत असे व त्याची साद ऐकून की भूक लागली म्हणून की काय पाखरं जमा होत.

" घे बाळा तू एक तुकडा घे.. . हळूहळू खा सावकाश खा.. एक घास बत्तीस वेळा चावून खा हे तुम्हाला कोणी शिकवलं नाही का रे?" असं एकदा म्हणाला तेव्हा अर्धे दार उघडून त्याचं हे पाखरांना घास घालू बघणं चालू असायचं. एक घास बत्तीस वेळा.. हे वाक्य ऐकून हा आपल्याला टोमणा मारत असवा ' असं बाईंना वाटलं.

बाईंना आधी वाटलं होतं दररोज पाखरे कुठली येणार? नंतर कमी होतील; पण झालं उलटं नवनवीन पाखरे हजरी लावू लागलो. ह्या पाखरांत बुलबुलची संख्या वाढत चालली. काही पाखरे चिमणी, मैना, वगैरे दाणे खाणारी पाखरे भाकरीच्या बारीक तुकड्यावर चोच मारत होते. उरलेल्या

शिळया भातावर बुलबुल ताव मारताना दिसलें. हे कसे काय शक्य आहे? बाईंना विचारायला हवे म्हणून त्याने मागे वळून पाहिले तर बाई दरवाज्यात उभ्या. माधव हसला. आपल्यावर बाईंची बारीक नजर आहे हे ओळखलं तरी विचारले,

" मॅडम बुलबुल पक्षी भात खातो का,?"

प्रश्न अचानक विचारल्यावर बाई गोंधळल्या. कारण कावळा भात भाकरी,मटण मासे सगळं खातो हे सगळे बघतात;पण बुलबुल भात खातो की नाही हे कुणी पाहिलंय? तेव्हा विचारलेल्या प्रश्नाचे काय उत्तर द्यावे हे सुचेना. बरं पुस्तकात पक्षी किंवा इतर प्राणी काय खातात हे वाचून माहिती असते ;पण प्रत्यक्षात काय खातात हे कोणी पाहिले नसते,या खेरीज वेगळं काही खात असू शकते. आपल्याला उत्तर माहीत नाही अस झाल तर आपल्या शिक्षकी पदवीचं काय?असा विचार करून म्हटलं,

"सर आमच्याकडे जेवणात भात कमी असतो शिवाय मोठमोठे वृक्ष नाहीत, शेतात दाणे भरपूर प्रमाणात असतात त्यामुळे बुलबुल भात खातो का? हे निश्चितपणे सांगता येणार नाही!"

"उत्तर जवळ जवळ बरोबर आहे.

माधवचे हे उद्गार ऐकून बाई मंद हसल्या. हळुहळू दोघांमधील संकोचपणा कमी होत होता.

चैत्र पौर्णिमा जवळ आली होती, दिवसेंदिवस चांदणे बहरत चालले होते, रात्री अंगणातील लाईट बंद केले की कोवळे चांदणे अंगणभर पसरू लागले

होते. माधवला चांदणे म्हणजे उत्सव वाटत असे. जेवणापूर्वी तो अंगणात चटई व उशी टाकून लवंडून मोबाईलवर बातम्या व शासनाने काढलेले आदेश वाचत असे. बातम्या पाहिल्यानंतर माधवच्या कळलं की सरकारी कर्मचारी घरी बसून काम करत होते आणि महापालिका कर्मचारी कामावर जात होते. विशेषता दूर राहणारे कर्मचारी वाहतूक बंद असल्याने घरी अडकून पडलेले त्यामुळे पालिकेची सेवा व्यवस्था कोलमडून पडली होती. अखेर शासनाने दूरच्या कर्मचाऱ्यांना मुंबईत येण्यासाठी एसटी बसची व्यवस्था केली. सुरक्षीततेचे सर्व नियम पाळून कर्मचारी आपली सेवा बजावत होते, त्यांना पार्सलने भरपूर खाणे पिणे मिळत होते. माणसांचा वावर कमी, कंपन्या बंद,दुकाने बंद,सगळी सरकारी हॉस्पिटलमध्ये कोरोनाणे पेशंट त्यामुळे बाकीचे किरकोळ आजारासाठी लोकांनी हॉस्पिटलकडे पाठ फिरवलेली. लोक म्हणायचे,सतत रुग्णालयात कायमची गर्दी, सगळ्या खाटा भरलेल्या ते सगळे गेले कुठे? यांचे आजार एकाएकी बरे कसे झाले? याचं आश्चर्य वाटू लागलं होतं.

पाण्याचा मर्यादित वापर असल्याने पाईट फुटणे वगैरे दुरूस्तीची कामे तरी महापालिका व शासकीय सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने हजर राहणे भाग होते. जेव्हा घरात सुरक्षित असलेले लोक भीतीने ग्रस्त झाले होते तेव्हा महापालिका कर्मचारी, पोलिस खाते आणि रुग्णसेवा कर्मचारी जीवाची पर्वा न करता आपली सेवा बजावत होते. हे सगळं पाहून माधवच्या अंतःकरणात कळवळा दाटून येत होता. ००

दररोज मुंबईतून फोन येत असे. त्याना ‘मी अगदी मजेत आहे असे खोटं नाटं सांगून तो मुलांच्या मनातील भीती घालवत असे.

एकदा शकुंतलाने म्हटलं,

“ अहो,तुमची जेवणाची आबाळ होत असेल स्वतः जेवण बनवा!”

“ हो,मी चूल मांडून ठेवली आहे. इकडे काय घडतंय ते विचारू नका!”

“ का? मला कसं कळणार? तिकडे काय चाललंय ते? आणि मला इकडे या मॅडमघ्या टिव्हीवर सगळया बातम्या बघायला मिळतात!”

“अहो बघून काळजी वाढेल!”

“ फरक पडत नाही, हळूहळू मन कोडगं होतं माणसाचं!’”

दोघं फोनवर बोलत असताना जवळ मॅडम उभ्या होत्या. त्यानी म्हटलं,

“ काहो एवढी भीषण परिस्थिती मुंबईत आहे?”

“ केवळ भीषण नाही भयंकर आहे!” माधवचे बोल ऐकून मॉडम म्हणाल्या,

“ बघा एवढं भयंकर वातावरण आहे तरी आपल्याला आपल्या घरच्या माणसांशिवाय कोणी चौकशी करत नाही!”

“ मॅडम ह्याला कारण हेच आहे की एखाद्याच्या घरी फोन करावा तर आपल्या काळजाचा ठोका चुकावा असं काही ऐकायला मिळेल म्हणून कोणी फोन करत नाही!”

“ हे पण बरोबर आहे!”

“ अहो तरी एक घटना सांगतो. , काही घरात कोरोनाची लागण झालेल्या पेशंटला कोरोना सेंटरला बळे बळे पाठवलं आणि ते खडखडीत बरे होऊन घरी परतले आहेत कारण त्यांनी जीवावर उदार होवून जे अन्न मिळाले ते खाऊन दिवस घालवले!”

“ खरंच अजून काय काय ऐकायला मिळेल कोण जाणे!”

(९)

यानंतर माधवने चूल पेटवली. नंतर आणलेल्या किराणा सामानातून पेला भर तांदूळ धुवून एका टोपात शिजायला ठेवले व दोन लहानसे बटाटे कापून ठेवले व पेलाभर तांदूळ निवडावा घेतले. एखाद्या सराईत गृहिणी सारखं न कंटाळा करता काम सुरू केलं. बाईनी विचारले,

“ आता डाळ कधी शिजवणार?”

“ बघा जे आधी करायला हवं ते मागे ठेवलं. बर ते जाऊदे मॅडम मला फक्त भातात पाणी किती ठेयवायचं ते दाखवा!”

“ बरं तुमचा भात झाला की हाक मारा!” असं सांगून बाई आपल्या घरी गेल्या.

“ आपण पुष्कळ दिवसांत काहीच बनवलं नाही म्हणून चुकायला होतंय. जमेल हळूहळू. एकेकाळी दुकान सांभाळून आपण चपातीसह सगळा स्वयंपाक करत होतो,आता जमखयलाच हवं. कोरोनाच्या भीतीने आपल्याला कोणीही जेवण देणार नाही. चला माधवराव पुन्हा एकदा प्रशिक्षण सुरू झालं!” असं स्वतःशीच पुटपुटत राहिला. ००

रात्री जेवण करून माधव अंगणात चटई टाकून पडला होता. बाई टीव्हीवर मालिका बघत होत्या, त्यांना फोन निनावी आला. कोण आहे फोनवर? म्हणत त्यांनी फोन घेतला,

“ हॅलो पप्पा जवळ आहेत का?”

“ कोणाचे पप्पा आणि तू कोण?”बाईंना काही संदर्भ लागेना.

“ अहो तिथे पप्पा आहेत त्यांचा मी मुलगा!”

“म्हणजे माधव सरांचा का?”

“ होय मी सुयश जरा पापांचा फोन बिझी आहे ना? म्हणून!’ सॉरी हं!”त्याना देता का?”

“ देते. तू कितवीला आहेस?”

“ बारावीला!”

“ अभ्यास करतो ना?”

“ करतो प्लीज द्या ना… “

“ थांब देते!” असं म्हणत त्या आपला मोबाईल घेऊन बाहेर आल्या व माधवला फोन दिला.

“ हं बोल बेटा काय झालं?”

“ पप्पा इकडे संध्याकाळी जाम राडा झाला!” त्याने बातमी दिली.

“ हौ का? म्हणजे काय झालं?”

“ एक भाजीची गाडी गेटवर लागली होती. ती इथे लावू नको,तिथे लाव!” यावरून आपल्या व शेजारच्या पोरोंशी जाम भांडण झालं…” वगैरे त्याच्या वयाला शोभेल अशा भाषेत बातमी देत होता आणि बाई मनोमन हसत होत्या. शेवटी माधवने म्हटलं,

“ ते राहूदे तू लगेच अभ्यास करायला बस!”

“ काय सारखा अभ्यास कर, अभ्यास कर, मम्मी म्हणते अभ्यास कर,ताई म्हणते अभ्यास कर, तुमच्या मॅडम म्हणाल्या अभ्यास कर. आरे मला काही स्वातंत्र्य आहे का नाही?” सुयश चिडून उद्गारला तेव्हा बाई हसल्या. त्यांचं बोलणं झाल्यावर बाईंनी विचारलं,

“ कितवीला आहे मुलगा?”

“ बारावीला आहे, अहो अभ्यास करायला बस म्हणून सांगावं लागतं!”

“माझ्या मुलीला अभ्यास कर म्हणून सांगावं लागत नाही!”

“ बरोबर. त्याच्या उलट मुलगे आसतात. तुमचा मुलगा काय शिकतोय?” माधवने विचारले. ह्या प्रश्नावर बाईंचा चेहरा पडला. पापण्यांचे काठ ओलावले.

मान खाली घालून हळूच डोळे पुसले. माधवच्या लक्षात आलं. तो ओशाळून म्हणाला,

“ सॉरी सॉरी. हे तुम्ही बोलला नाहीस कधी!”

“ काय बोलणार? पुन्हा त्या आठवणी पुन्हा ते टोमणे, घटस्फोटाच्या धमक्या…!” बघता बघता बाईंचे डोळे घळाघळा वाहू लागले.

हे पाहून माधवची अवस्था वाचा बसल्यासारखी. तो शांतपणे बघत राहिला. व कधी नव्हे ते उठून बाईंच्या पाठीवर हात ठेवून म्हणाला,

“ मॅडम दुःख आवरा तुम्हाला मुलगा नाही म्हणून तुमचा छळ होत आहे हे आज मला कळलं. यापुढे मी विचारणार नाही!”

माधव म्हणतना बाईंच्या पाठीवर हात ठेवला तेव्हा बाईंचं अंग क्षणभर शहारलं. कुठल्याही परपुरुषाने स्त्रीच्या पाठीवर हात ठेवलेला तिला आवडत नाही;पण माधवच्या हाताचा स्पर्श निर्मळ आहे व हेतू स्वच्छ आहे हे ओळखून बाईंनी मानवाच्या पायाला हात लावून नमस्कार केला. माधव गोंधळात पडला,

“ अहो हे काय?”

“ असुदे. माझ्या सासरी सगळे तिरस्कार करतात अशा वेळी आपल्या पाठीवर कुणीतरी मायेने हात फिरवला तर धीर येतो.!”. (१०)

यानंतर बाई उठून घरात गेल्या व माधव तिथेच शांतपणे बसून राहिला. थोड्या वेळाने पोलीस पाटील, नर्स,एक डॉक्टर वगैरे नेहमीचा ताफा आला,

“ सर काही प्रॉब्लेम? “ डॉ ने विचारले. माधव हसत म्हणाला,

“ काही नाही. अगदी मस्त मजेत आहे मी.!”

“ नक्की? हो. हवं तर मॅडमना विचारा. त्याचवेळी बाई बाहेर आल्या होत्या.

“ बरं ठीक आहे. सर तुम्हाला कॉरोंटाईन करून आता एकवीस दिवस उलटले. आजपासून तुम्ही मोकळे झालात,आता अंगणाच्या बाहेर फिरायला हरकत नाही!” पोलीस पाटील म्हणाला ते ऐकून माधव आनंदित होऊन म्हणाला,

“ मी आता माझ्या घरी मुंबईत जाऊ शकतो?”

“ हो जाऊ शकता. पण जिल्हा बंदी उठली ना.. ही!”

हे ऐकून माधव थंड झाला. बाई लाजून हसल्या. नंतर म्हणाल्या,

“आता काय करणार? तेव्हा लॉकडाऊन उठल्याशावाय काहीच करू शकत नाही तुम्ही!”

“काहीच नाही असं नाही,मी पळून जायचा विचार करतो आहे!”

“ बरं मी पण येते तुमच्याबरोबर!” बाईंनी गंमतीने म्हटलं. ते ऐकून माधव उडालाच.

“ अहो काय बोलताय काय? लोकात बदनामी होईल आपली!” माधव घाबरून म्हणाला तेव्हा बाईंच्या ध्यानात आलं की आपण भलतंच बोलून गेलो. त्यानी लाजून डोळे मिटून घेतले.

“ सर मी तुमची गंमत करता करता चुकीचे बोलले हो!”

“ आलं लक्षात. सद्या माझी अवस्था ना घरका ना घाटका अशी झाली आहे. चला मी माझ्या कामाला लागतो. असं म्हणत त्याने बाईंनी दिलेला लॅपटॉप उघडला. ००

माधव मोकळेपणाने घराबाहेर फेरी मारून येत असताना ग्रामस्थ लोक त्याला पाहून वाट वाकडी करून पुढे जात असतात हे पाहून मुंबईतून आलेल्या लोकांच्बद्दल भीतीचं सावट कसं पसरून राहिलं आहे याचा अंदाज येऊ लागला.

हे असंच चालू राहिलं तर आपण करावं तरी काय असा प्रश्न मनात येऊ लागला होता.

फेरी मारून आल्यावर त्याने ही घटना बाईंना सांगितली. त्यांच्या मनाला हे पटलं नाही ;पण त्या ही हतबल झालेल्या.

माधवची स्वयंपाक करतानाची धांदल पाहून बाई म्हणाल्या,

“ सर राहुदे तुमचं स्वयंपाक पाणी. मीच देईन बनवून, नाही तरी एकट्या माणसाचा स्वयंपाक करताना दोघांचं पोट भरेल एवढे पदार्थ होतातच. हे ऐकून माधवने सुटका झाली म्हणून चुलीला नमस्कार केला. हे पाहून बाईंनी म्हटलं,

“ सर मी जेवण देणार आणि नमस्कार चुलीला हे कसं काय?”

“ हा नमस्कार चुलीला म्हणजे अग्नीदेवतेला केला. अग्नीदेवता प्रसन्न झाली म्हणून. आता तुम्हालाही न.. ”

“ थांबा. नको इतकं पण नाही हां!”

“ बरं आता माझ्याकडे साहित्य आहे ते तुमच्याकडे देतो. तरीही खानावळीचे पैसे तुम्हाला घ्यावे लागतील!”

“ तसं असेल तर नको,तुमचे तुम्ही आमचे आम्ही!” बाई म्हणाल्या.

“चालेल मी माझा प्रस्ताव मागे घेतला!”

“ हां आता बरोबर झालं!”

“ तरी मी बाजारहाट करून आणिन, तेवढं तरी तुम्ही ऐकायला हवं कारण सद्या तुम्ही बाजारात जाऊ नये!”

“ चालेल!” बाईंनी कबुली दिली. ००

रविवारी सकाळी न्याहारी झाल्यावर माधव कपडे करून बाहेर पडला.

“ मॅडम मी बाजारात जाऊन भाजीपाला घेऊन येतो!” त्याने अंगणात उभे राहून म्हटलं तेव्हा बाई आतून म्हणाल्या,

“ थांबा थांबा मी ही येते!” तिचं उत्तर ऐकून माधव मनातल्या मनात म्हणाला ‘ आता ही कशाला येतेय? मी जरा भटकंती केली असती. हे म्हणत असताना बाई तयार होऊन आल्याच.

“ मी आणलं असतं सगळं!”

“ माझ्या गरजेच्या वस्तू तुम्हाला कशा कळणार? शिवाय बाजार कुठे भरतो ते तुम्हाला ठाऊक आहे? बाईंनी म्हटलं तेव्हा माधवचा नाईलाज झाला व दोघं निघाली.

दोघं बाहेर मुख्य रस्त्यावर आले तेव्हा

किरकोळ माणसं वाटेवर चालत होती. माधवला पाहून काही माणसं वाट वाकडी करून चालताना पाहिलं तेव्हा लोकांच्या मनात बाहेरून आलेल्या माणसांबद्दल किती भीती भरून राहिली आहे याचा अंदाज आला. बाईंनी ते जाणून म्हटलं,

बघा तुम्हाला पाहून लोक घाबरून दुरून जात आहेत!”

“ माझ्या लक्षात आलं. मी बाहेर पडायला नको होतं, एखाद्याला साधा ताप आला तरी माझ्यावर ठटका येईल असं वाटू लागलंय!”

“आता चला बाजारहाट करून लगेच परतून येऊ!” दोघं घाई करू लागले. इतक्यात पाठून वाडीतील मालू वहिनी आली तिने ह्या दोघांना एकत्र पाहून म्हटलं,

“ बाईनू बाजारात चाललाव क काय?”

“ होय. घरात बसून बसून पाय आखडून गेले, आणि ह्या साहेबांना बाजारातून त्यांच्या प्रेशरच्या गोळया घ्यायच्या आहेत!”

बाईंनी हुशारी दाखवत म्हटलं.

“ व्हे काय? या सवकास!” असं म्हणत ती पुढे निघून गेली. जाताना पाठी ओझरता कटाक्ष टाकून संशयास्पद हसल्यासारखं वाटलं. बाईनी ते बरोबर टिपलं.

“ सर पाहिलं का,?”

“ पाहिलं. मला वाटतं मी तरी आता पाठी वळून जावं!” माधवला परिस्थितीची जाणीव झाली. तेव्हा बाई म्हणाल्या,

“ आता दोन मिनिटात बाजारात पोचू चला!”

“ चला . नाही तरी माझ्याकडे सगळेच संशयित नजरेने बघणार हे नक्कीच!”

“सर त्या ही पेक्षा ती बाई एक नंबरची कळलावी आहे, संध्याकाळपर्यंत ती आपण दोघे बाजारात गेलो होतो याची बातमी गावभर करील!” हे ऐकून माधव घाबरला. म्हणाला,

“ अरे देवा. ही बाई अशी आहे?”

“बायकांचा स्वभावाच संवयी असतो!”

“ बरोबर आणि हे बोलतंय कोण? तर एक बाई,वर एक सुशिक्षित सुस्वभावी शिक्षिका!” माधवच्या सुस्वभावी शब्दावर बाई लाजून हसल्या.

“ पुरे झालं कौतुक आता चला. मी माझी खरेदी करून येते तुम्हाला काय घ्यायचं ते घेऊन बाहेरच्या आंब्याखाली थांबा!” असं म्हणत त्या पुढे गेल्यावर माधव बाजारात हवं ते दुकान शोधत असताना पोलीस पाटील हजर झाला म्हणाला,

“ साहेब तुम्ही इकडे? मला सांगायचं ना,मी आणून दिलं असतं!”

“खरं आहे ;पण घरात बसून कंटाळा आला होता आणि मला वाटलं लोक माझ्याकडे असं वेगळ्या नजरेने पाहणार नाहीत. बघा एक महिना उलटला तरी लोक मला बघून वाट वाकडी करून जातातच!” माधवला लोकांचा राग येऊं लागला होता.

“ साहेब इथेच थांबा मी आणून देतो. तुम्हाला पाहून तो पळून जाईल!”

“ ठीक आहे हे पैसे घ्या . मी थांबतो!”

माधव जवळच्या दुकानाजवळ उभा राहिला. बाजारात नेहमीसारखी वर्दळ नव्हती व होते ते लोक माधवला ओळखून त्याच्या नजरेला नजर न देता वाट वाकडी करून चालत होते. हे दृष्य पाहून माधवला आश्चर्य वाटलं नाही. मुंबईत कोरोनाने दहशत अशी बसवली आहे की स्वतःचा जीव वाचवण्यासाठी काळजी घेणे ह्यात काहीच चूक नाही.

इकडे बाईंना ओळखिच्या बायका प्रश्न विचारत होत्या,

“ बाईनु तो मानुस चांगला हाय का हो?”

“ हो. चांगले गृहस्थ आहेत ते!”

“ न्हवं लोक म्हंतात त्याला बाधा झाली हाय म्हनून पोलीसांनी अडकून ठेवलाय!”

“ हे चुकीचं आहे. आता मुंबईतून लोक आहेत त्यांना कोरोना झाला आहे का?”

“ काय ठावं? झालाय का नाय कसं कलनार!”

“ मग असंच समजा. हा रोग झाला आहे का नाही हे डॉक्टर ठरवणार!”

“ तं पन खरं हाय!”

“ मग झाला असता तर त्यांना हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले नसते का?”

प्रश्नावर प्रश्न त्यांची उत्तरे देत देत बाईंनी स्वतःची सुटका करून घेतली व बाहेर आंब्याखाली आल्यावर हाश्यहुश्य करत घाम पुसला.

“ काय झालं इतका घाम फुटायला?”

“ बायकांच्या प्रश्नांची उत्तरे देता देता मला घाम फुटला!”

“ असं? बरं तर पुढच्या वेळी पुन्हा येऊन त्यांना अधिक घाबरून टाकायला मजा येईल!” माधव हसत म्हणाला तेव्हा,

“ नको उत्तर देताना माझे हाल होतील कारण तुमच्या आसपासही कोणी उभा राहणार नाही चला!”

दोघांनी आपापली खरेदी करून झाल्यावर ठरलेल्या आंब्याच्या झाडाखाली एकत्र आले व पुन्हा घराकडे निघाले. माधव क्षणभर थांबून म्हणाला,

“ थांबा मी एक प्रयोग करून बघतो!”

“ प्रयोग? वाटेवर कसला प्रयोग करताय?”

“ प्रयोग कुठेही करता येतो . आता बघाच तुम्ही थोडं दूर उभ्या राहा!” असं म्हणत तो पुन्हा पाठी वळून जवळच्या रिक्षावाल्याला म्हणाला,

" टेंबे वाडी सोडणार का?" असं विचारताच तो खाली उतरून म्हणाला,

" साहेब रिक्षातील गॅस संपला आहे!"

"बरं!" असं म्हणत दुसऱ्या रिक्षाला म्हटलं,

" टेंबेवाडी सोडणार?"

" साहेब रिक्षा एंगेज आहे!"

माधवला बघुनच रिक्षावाले यायचं सोडा लांब उभे राहून बोलत होते. एक जण तेवढ्यात कुठुनतरी आला त्याला विचारले. त्याने लगेच हातात एक पाना घेऊन म्हटलं,

" साहेब जरा रिक्षा बिघडली हाय, काय झालंय ते खोलून बघतो!

" बघ बघ तोपर्यंत मी इथेच थांबतो!" माधवने त्याची लबाडी ओळखली होती. त्यामुळे तो आता नक्की काय करतो हे बघण्यासाठी उभा राहिला. रिक्षावाल्याला वाटलं होतं हा साहेब थांबेल थांबेल व कंटाळून निघून जाईल; पण झालं उलटंच. रिक्षावाल्याने नको तिकडचे स्क्रू ढिले करून परत फीट केले. गॅसचा पाईप कारण नसताना काढून परत बसवला. तरी साहेब ठामपणे उभ्याने सगळं बघतो आहे याचा त्याला राग येत होता. परत त्याने ब्रेक वायरची तपासणी केली,हे करता करता घाम फुटला. आता आपली लबाडी उघडी पडणार हे ओळखलं. आता करावं तरी काय? या विचारात असतानाच त्याचा मोबदल्याची रिंग वाजली, फोन घेत म्हणाला,

" हां बोलतोय? काय झालं? पडली ? कोन माझी बायको? अरे बापरे!" असं म्हणत तो पळत पळत एका बाईकला हात दाखवून बाईकवर बसला आणि

निघून गेला. त्यांनतर दुसरा आला तो ही माधवला पाहून रिक्षा बिघडली आहे म्हणून सांगताच माधव चिडून म्हणाला,

“ आताच तू कुठुनतरी आलास तेव्हा नीट चालत होती आणि मला पाहून बिघडली का? चल लायसन दाखव!” माधवच्यातील अधिकारी जागा झाला. त्याने दरडावून म्हटलं तेव्हा.

“ नाय साहेब खरंच.. ”

“ मला ओळखता का रे तुम्ही? असं पुन्हा दरडावले तेव्हा जवळचे रिक्षावाले जागच्या जागी पण लांब थांबून राहिले.

“ कोण आहे मी ? बोल पटपट!”

“ तं. टेंबे वाडीत राहता ते.. ”

“इतकंच माहिती आहे? शासकीय अधिकारी माधव डोंगरे. मला इथे येऊन एक महिना झाला असून डॉक्टर व पोलीस पाटलांनी मला कॉरोंटाईन फ्री केले आहे,मला कोरोना झालेला नाही तरी तुम्ही आमच्यासारख्या मुंबईकरांची अडवणूक करता हे मला कळलं आहे. तुम्हाला मुंबईतील लोकांना रिक्षात घ्यायचं नसेल तर रिक्षा इथे उभ्या करू नका. ए चला पटापट लायसन्स दाखवा,एक मिनिटात सरकारचे नियम तोडले म्हणून लायसन्स रद्द करायला लावतो!” माधवने आपला इंगा दाखवताच सगळ्यांची फे फे उडाली

. इतक्यात पुन्हा तिथे पोलिस पाटील हजर झाला.

“ काय झालं साहेब?” त्याने विचारले तेव्हा माधवने सगळं सांगितलं. ते ऐकून पोलीस पाटीलही गांगरला. रिक्षावाले आपलेच आहेत हे कळत होतं तोच माधवने पुन्हा एकदा दरडावले,

“ लायसन्स दाखवा म्हटलं ना?”

यानंतर त्यां रिक्षावाल्यानी पोलिस पाटलाकडे याचनेच्या दृष्टीने पाहिलं तेव्हा पोलीस पाटील काय ते समजून म्हणाला,

“ साहेब जाऊद्या मी सांगतो त्यांना.!” असं म्हणत रिक्षावाल्याला म्हटलं,

“ ए साहेबांना सोडून ये!” त्याने सांगताच एकजण रिक्षा बिघडली आहे म्हणून सांगणारा तयार झाला म्हणाला,

“चला साहेब बसा.!” तो नरमाईवर आला तसं माधव म्हणाला,

“ जा. राहुदे. मी महिनाभरानंतर पाय मोकळे करायला बाहेर पडलो आहे, रिक्षात बसून फिरायला नाही. कळलं? तुम्ही मुंबईतून आलेल्या लोकांना मास्क लावून आले असले तरी रिक्षात बसू देत नाही या बातम्या मला कळत होत्या. अरे लोकांत कोणी ज्येष्ठ व्यक्ती असेल कोणी दिव्यांग असतील त्यांनी दूरच्या घरी कसं जायचं? हेरवी तुम्हाला मुंबईकर हवे असतात, त्यांना आग्रहाने विवाह समारंभाला बोलावता,त्यांच्या देणगीवर तुमचे कार्यक्रम होतात त्यांच्याकडून पार्ट्या वसूल करून घेता तरी आपल्याच घर सुरक्षित ठिकाण

म्हणून आपल्या गावी येतात त्यांना रिक्षात बसू देत नाही? काय तर म्हणे रिक्षा एंगेज आहे, गॅस संपला आहे,बिघडला आहे. काहीही सांगता काय?यापुढे

खबरदार कोणा मुंबईकरांची अडवणूक कराल तर,एक फोन करून तुम्हाला घरी बसवेन!''

अशी दमदाटी करताना पंधरा वीस लोक लांबून सगळं ऐकत होते; पण माधवला उलट बोलायची हिंमत कोण करत नव्हते.

रिक्षावाले तर भीतीने गपचूप उभे होते. हे पाहून तो बाईंना म्हणाला,

" अहो मॅडम चला जरा पाय मोकळे करण्यासाठी आलो होतो आता चालत घरी जाऊ!''असं म्हणत चालायला सुरुवात केली. सगळे लोक त्यांच्याकडे आवाका होऊन बघत राहिले तेव्हा बाई मनातल्या मनात हसत होत्या. थोडं दूर आल्यावर म्हणाल्या,

" सर आज चांगला इंगा दाखवला या लोकांना. अहो हे लोक दिवसभर चकाट्या पिटत बसतील ;पण जवळचं भाडं घेणार नाहीत!'' यावर माधव गडगडाटी हसत म्हणाला,

" अधुनमधून आपण मुद्दाम इकडे यायला हवं!''

" हंहंहंहं!'' बाई खळखळून हसल्या व चालता चालता म्हणाल्या,

" आज तुम्ही अधिकारी म्हणजे काय असतो हे दाखवून दिलं!''

" खरं म्हणजे मी हे आधीच दाखवून दिलं असतं;पण इकडेच नाही तर सगळ्या जगात कोरोना थैमान घालत आहे अशा वेळी गाव पातळीवर थोडीशी भीती घालवण्याची गरज आहे. इथून माझं डोंगरवडी गाव फार दूर नाही. मी पोलीसांना विनंती केली असती तर मला गावी जाता आलं असतं;पण मी विचार

केला ही वाडी मुंबई गोवा हायवेवर आहे व गावही निसर्गरम्य आहे लवकरच लॉकडाऊन उठेल पण नाही त्यात तुम्ही इथे एकट्या…?"

" ऑ?? मी म्हणजे?"

" सरकारी कर्मचारी म्हणून तुम्हाला सोबत करण्याची जरूरी मला वाटली. " माधव हसत म्हणाला.

" उगाच स्वतःचं कौतुक करून घेऊ नका!"

" असं? मग आताच रिक्षात बसून माझ्या गावी जाऊ शकतो जाऊ?'

" आता नाटक पुरे!"

" बरं तर सांगायचा मुद्दा असा की म्हणून थांबलो. बरं हा कोरोना काही दिवसात जाईल आठवड्याभरात तोवर घेऊ विश्रांती;पण झालं भलतंच!"

"बरोबर आहे मी सुद्धा माझं गाव खूप लांब देशावर आहे. एवढ्या लांब जा आणि निर्बंध उठल्यावर परत या अशी धावपळ होऊ नये म्हणून आहे इथेच थांबले!"बाईंनी म्हटलं.

" चला त्या निमित्ताने आपली ओळख झाली..!"

" .. मला एक चांगला सोबती मिळाला.. सॉरी मिळाले!"

" मला एवढ्यात चांगला माणूस ठरवू नका. कोणत्याही परपुरुषांवर लगेच विश्वास ठेवू नये!"

" लगेच कुठे? एक महिना झाला की!"

बाईंनी हसत म्हटलं तेव्हा माधवही हसत म्हणाला,

“ आज तुम्ही देशावरील भाषेतील शेवटचा शब्द झोकदार ‘की’ वापरलात!”

“ अरे हो खरंच की?”

“ पुन्हा की’ हंहंहंहं. काही शब्दांवरून त्या त्या प्रांताची ओळख होते बरोबर?”

“ बरोबर. चला आपलं घर आलं!”

“ तुमचं घर माझ्यासाठी तुरुग!” म्हणताना माधवचा चेहरा पडला.

“ फार विचार करू नका,मी सरबत बनवून आणते ते प्या आणि फ्रेश व्हा!” असं म्हणत दोघं दोन खोलीत गेले.

संध्याकाळी बाईंनी माधवला विचारलं आज संध्याकाळी काय करू?”

“ आज अंगाकढी करा मस्त एन्जॉय करू!”

“ कशाबद्दल एवढे खूष झाला आहात!”

“ दररोजचे चूल फुंकणे बंद झाले आणि खानावळ सुरू झाली. मॅडम महिना पैसे किती घेणार?थोडी सवलत असावी. मी एक गरीब माणूस आहे! गालातल्या गालात हसत माधव म्हणाला तेव्हा बाईंनी म्हटलं,

“ मी गरीबांकडून पैसे घेणार नाही!” हे ऐकून माधव तळहातावर मूठ आपटून आवेशाने उद्गारला “डॅम इट!”

“ हे काय आज महेश कोठारे अंगात शिरला वाटतं!”

“ मग काय एवढे पैसे माझ्याकडे आहेत आणि खर्च एक रुपयाही नाही हां हां हां हां!”. ००

माधवने रोजच्याप्रमाणे पाखरांना भाकरी खाऊ घालून शांतपणे बसला होता,बाई दुपारच्या जेवणासाठी भाजी निवडत बसल्या होत्या. त्यांना म्हणाला,

" मी पाखरांना भाकरी खाऊ घालतो ह्यांचं पुण्य कोणाला भेटायला हवं!"

" अर्थात तुम्हालाच!" बाईंनी म्हटलं

" नाही हे पुण्य काम असेल तर ते तुमच्या खात्यावर जमा व्हायला हवं!"

"छे!पाखरांना घास घालण्याचा विचार माझ्या मनात नव्हताच मग माझ्या वाट्याला कसं येईल?" बाई म्हणाल्या. वरवर पाहता बाईंचे विचार बरोबर होते,हे ओळखून माधव म्हणाला,

" तुमच्या मनात खाऊ घालण्याचे विचार नव्हते, माझ्या मनात आणि तो माझ्या नेहमीच्या कृतीतील तो भाग होता; पण भाकरी तुमच्या हातची होती!"

" असं आहे तर पुण्या दोघांत समान मिळायला हवं!"

" सर एक आठवलं,खरा दानी कर्ण होता असं म्हणतात, लोक आजही कर्णाला दानशूर म्हणून ओळखतात तर मग इतर राजे दान करत नव्हते का?"

" मॅडम दानी लोक दान करत होते असं एकूण माझ्या वाचनाच्या अनुभवावरून सांगतो; पण त्यांचं दान गुप्त होतं, एका हाताने दान दिले तर दुसऱ्या हाताला कळू नये ' या प्रकारातील होतं व हेतू शुद्ध होता म्हणून जगाला ते कळलं नसावं. असं म्हणतात, एकदा अर्जुनाने भगवान श्रीकृष्णाला म्हटलं,

" केशवा,' दानी असावा तर कर्णासारखा' असं लोक म्हणतात; पण माझा धर्म दादा दान करतोच त्याचं नाव का घेत नाहीत!"

“ खरं आहे पण दानी असावा तर कर्णासारखाच!” श्रीकृष्णाने अर्जूनला चिडवत म्हटलं,,

“ काय रे केशवा तू आमच्या घरचं खाऊन दुसऱ्याचं कसं कौतुक करतोस?”

“ तरी पण खरंच आहे दानी असावा तर कर्णासारखाच. तुला खोटं वाटतंय? तीन दिवसांनी तुला पटवून देतो!” कृष्ण म्हणाला. व त्याने पुढचे तीन दिवस आपल्या मायावी शक्तीने राज्यात मुसळधार पाऊस पाडला. सर्व धरणी झाडे माडे वाळलेली लाकडे ओलीचिंब करून टाकली व अर्जुनाला म्हटलं,

“ चल आपण आज परीक्षा घेऊ खरा दानी कोण?” असं म्हणत दोघांनी वेष पालटून अर्थात साधुच्या वेशात धर्म राजाच्या महालासमोर आले,

“ भिक्षांदेही..!” ही विनंती ऐकुन धर्म राजा बाहेर येऊन साधूना हात जोडून म्हणाला,

“ बोला महाराज काय सेवा करू आपली?” साधू वेशातील कृष्ण म्हणला,

“ राजा मी माझ्या हजारो शिष्य घेऊन तीर्थ यात्रा करत आहे मला भोजन बनविण्यासाठी सुकी लाकडे हवी आहेत ती द्यावी! धर्म म्हणाला

“ गुरुवर्य मी सगळंयांच्या भोजनाची व्यवस्था करतो!”

“ नको महाराज आम्ही साधू दुसऱ्याच्या हातचं भोजन घेत नाही. त्यापेक्षा तू फक्त लाकडे दे!”

ही विनंती ऐकुन धर्म राजाने सेवकांना सुकी लाकडे आणायला सांगितलं. सेवक गेले व काही क्षणात सेवक रिकामी हाताने येऊन म्हणाले,

“ महाराज सगळी लाकडे भिजून चिंब झालो आहेत!” हे उत्तर ऐकून धर्म राजा खजील झाला. माफी मागितली. नंतर दोघे कर्णाच्या महाला बाहेर येऊन याचना केली,

“ भिक्षांदेही.. ” याचना ऐकून कर्ण धावत आला व साधूना नमस्कार करून म्हणाला,

“ आज्ञा महाराज काय सेवा करू मी आपली?” तेव्हा कृष्णाने तेच सांगितलं. कर्णाने आपल्या सेवकांना सुकी लाकडे आणायला फर्मावले. सेवक गेले व सुकी लाकडे शिल्लक नाहीत म्हणून सांगताच, कर्णाने आपल्या चंदनाच्या लाकडाच्या पलंगावरील वस्त्रे दूर करून तलवारीने पलंगाचे तुकडे केले मोळी बांधला व साधू बनलैल्या कृष्णापढे धरली. कृष्णाने मोळी अर्जुनाच्या खांद्यावर ठेवली व पुढे गेल्यावर अर्जुनाला म्हटलं,

“आता बोल खरा दानी कोण आहे?”

अर्जुन खजील झाला तरी म्हणाला,माझा दादा पण दानी आहेच!” हे अर्जुनाचं बंधू प्रेम पाहून भगवान श्रीकृष्ण खूष झाला.

कथा ऐकून बाई म्हणाल्या म्हणजे कर्ण खरा दानी होताच!”

“ कर्ण दानशूर होता हे सत्य आहे पण पूर्ण सत्य नाही..

“ मग पूर्ण सत्य काय आहे? बाईंनी उत्सुकतेने विचारले. ’”

“ पूर्ण सत्य हे आहे. कर्णाचा दुर्योधन मित्र होता त्यामुळे त्याने कौरवांच्या सैन्यात गेला. दुर्योधन दुष्ट प्रवृत्तीचा होता, द्रौपदी वस्त्रहरण उघड्या डोळयांनी बघत राहिला,कारण नसताना पांडवांच्या विरोधात युद्धात उतरला. आपण करत आहोत ही आपली चूक आहे म्हणजे आपण पाप करत आहोत या पापातून मुक्त होण्यासाठी तो दान करत होता. उलट धर्म राजा हा न्यायाने वागणारा होता. द्रौपदी पणाला लावून हरल्यानंतर जर त्याने शस्त्र उचलले असते तर ते अन्यायी ठरले असते म्हणून जे जे झाले ते सहन केले त्यामुळे दुर्योधन, दुःशासन कर्ण वगैरे मातले आणि पुढे महाभारत घडले. तात्पर्य काय तर धर्मराजाला निरपेक्ष वृत्तीने दान करत होता. म्हणून खरा दानी धर्म होता.

दुसरी एक घटना सांगतो. पांडवांच्या राजसूय यज्ञात यज्ञ पार पाडल्यानंतर घरी परतणाऱ्या उपस्थितांना दान देण्याचं काम कर्णाकडे सोपवलं होतं व कर्ण दान देण्याच्या रीतीच्या दुप्पट दान देत होता ही घटना अर्जुनाने कृष्णला सांगितली तेव्हा कृष्ण म्हणाला,

“ धर्म राजाची संपत्ती हा लुटून देत आहे हे वरवर हे दिसायला चांगलं वाटतं पण कर्णाचा हेतू वाईट आहे. कारण धर्म कंगाल व्हावा असं कर्णाला वाटतंय; पण घाबरू नका. धर्म राजाचा हेतू चांगला आहे म्हणून कितीही दान दिलं तरी त्याच्या दुप्पट संपत्ती परत येईल. तात्पर्य काय तर चांगल्या हेतूने केलेल्या कामाचं फळ चांगलं मिळतं!”

“ सर ह्या कथा कीर्तनात ऐकलेल्या आहेत का?”

“ हो मी सुद्धा कधी कधी यूट्यूबवर कीर्तन बघतो. दुसरी एक घटना. सुपरस्टार मराठी अभिनेते निळू फुले आपल्या कमाईतून दोन तृतीयांश रक्कम सेवा संस्थाना दान करत होते. पडद्यावरच्या खलनायकाच्या मनात किती दानशूरता होती पहा. असे अनेक लोक दान करतात;पण ते प्रसिद्धीच्या झोतात येत नाहीत म्हणून ते खरे दानशूर म्हणाला हवं!”

“ तुम्हाला कसं ठाऊक?”

“ मी सरकारी कर्मचारी आहे मला सर्व काही समजते!”

“बरं कीर्तनात कीर्तनात अशा गोष्टी सांगितल्या तर लोकांना ऐकायला छान वाटतं व पाप पुण्याचा अर्थ कळायला किंवा काय चांगलं व काय वाईट एवढं तरी कळायला सोपं होतं!”

“ पण पाप आणि पुण्य यांच्या नक्की व्याख्या काय आहेत?व पाप आणि पुण्य ह्या संकल्पना खऱ्या आहेत का” बाईंचा हा प्रश्न ऐकून माधव हसला व हार पत्करून म्हटलं,

“ यासाठी मला थोडं पाप आणि थोडं पुण्य करावं लागेल तेव्हा माझं कोणतं कृत्य पाप समजावं व कोणतं कृत्य पुण्या समजावं हे कळायला तुम्हाला सोपं पडेल खरं म्हणजे आपल्या पूर्वजांनी वाईट कृत्याला पाप ठरवलं असावं.!” हे उत्तर ऐकून बाईंनी कपाळाला हात टेकवले.

तोच माधवच्या मोबाईलची रिंग वाजली,

“ पप्पा कसे आहात?”

“ मी ठीक आहे! आई काय करतेय?”

“ ती भाजी दरवाजाच्या बाहेर ठेवते आहे!”

“ भाजी दरवाजाच्या बाहेरून आणली तरी पुन्हा दरवाजाच्या बाहेर कशाला?”

“ तसं लोक करतात म्हणून.. अर्धा तास भाजीपाला वगैरे वस्तू दाराच्या बाहेर ठेवून नंतर त्यांच्यावर पाणी मारून घरात आणावं!”

“ लोक करतात म्हणून आपण करायचं.. ”

“ते सोडा पप्पा टीव्ही लावा पटकन बघा एक गंमत!”

“ माझ्या घरी टीव्ही नाही बेटा!” माधव बाईंना डोळे मिचकावत म्हणाला,

“ आता बोलत आहात मॅडम बरोबर त्यांच्याकडे टीव्ही आहे!”

“ बरं बघतो!”हे ऐकून माधवने मोबाईल ठेवून टीव्हीकडे नजर टाकली. बाईही बघत राहिल्या.

कॅमेऱ्याच्या समोर दिसतभर दमून भागून आलेला पोलीस हवालदार इमारतीच्या आवारात खुर्चीवर बसून आहे,आपल्या बॅगेतून पाण्याची बाटली काढून पाणी पीत आहे. पाणी पिऊन झाल्यावर त्याने आपले बूट काढले,मोजे काढले दोघांवर हातातील बाटलीतील सॅनिटायझरचे फवारे मारले,मोजे पुन्हा बुटात घुसवून आपल्या कपड्यावर सॅनिटायझर करून गलीतगात्र झालेल्या हवालदाराचे स्वागत भरल्या डोळयांनी त्याची मुलगी करत होती. त्याने आपल्या लेकीकडे हसत पाहिलं ती रडवेली झालेली होती तरी गोड हसली. तिचं हसणं पाहून त्याच्या उरात दाटून आलं. तिच्याकडे एक नजर टाकून तो तडक आपल्या बाथरूम कडे निघाला होता.!” बघता बघता बाईंचे डोळे

पाणावले. माधवच्या ओठांवर शब्द आले..., ‘ स्त्री जन्मा ही तुझी कहाणी हृदयी अमृत नयनी पाणी.... ”.

मुंबईपासून दूर असल्यामुळे प्रत्येक बातमी ऐकायला किंवा बघायला मिळत नव्हती; पण एखादी अशी बातमी कळायची की जरा शांत झालेलं मन पुन्हा निराशेच्या भोवऱ्यात गरगरत रहात होतं तेव्हा दोघं मूकपणे शून्य नजरेने एकमेकांकडे बघत राहत. ००

एक दिवस टीव्हीवर बातमी झळकली की कोरोनाने जगभर थैमान घातले असून दररोज हजारो लोक मृत्युमुखी पडत आहेत तरी त्यांच्यावर उपचार करणारे डॉक्टर, नर्स, वार्ड बॉय,एम्बुलन्स कर्मचारी वगैरे प्राणाची पर्वा न करता आपली सेवा बजावत आहेत. यांचा सन्मान आणि त्याच्या धैर्याचा सलामी देण्यासाठी आकाशातून पुष्पवृष्टी करण्यात येईल”.

पंतप्रधान यांचे हे बोल ऐकून संपूर्ण भारतातील लोक आश्चर्यचकित झाले. लोक म्हणू लागले,

“ पुष्पवृष्टी म्हणजे नेमकं काय करणार?”

“ कोणा कोणावर करणार?”

“ फुले उधळली म्हणजे कोरोना जाईल अशी समजूत झाली असावी!” हे बोल अर्थात विरोधकांचेच.

माधव आणि बाई एकमेकांकडे बघत राहिले.

“ सर सेवाकर्मीवर पुष्पवृष्टी करणार हे चांगले आहे ;पण कसं करणार?”

“विमानातून करणार असं म्हणाले ते!”

“आपण आतापर्यंत पुराणकाळात आकाशातून देव पुष्पवृष्टी करत होते असं ऐकलं होतं!”

“ हो. पण ते देवांनी काही पराक्रम केला तर देव देवावरची पुष्पवृष्टी करत होते. सामान्य माणसांवर करत नव्हते आणि माझ्या माहितीप्रमाणे दानवांवर करत नव्हते. इथे सामान्य सेवाकार्य करणारे कर्मचारी सन्मानित होणार आहेत. अशी घटना आजतागायत कधी घडली नाही. खरं म्हणजे पंतप्रधानांचं कौतुक करायला हवं!”

“ व्वा! सरकारी अधिकारी शोभून दिसतात!” बाईंनी चेष्टा केली.

“ म्हणजे मी पंतप्रधानानची भलावण करतोय असं वाटतं का?”

“ ते राहूदे ;पण ही कृतज्ञता खरोखरच विचार करण्यासारखी आहे. आपल्या आसपास कृतघ्नता बेसुमार वाढली आहे अशावेळी हे काम खरोखरच वाखाणण्याजोगे आहे!”

दोघांनाही हा अभिनव प्रयोग आवडला होता. या प्रयोगातून काय साध्य होणार हे कळत नसुनही लोक कौतुक करत होते. कोणी विरोधात बोलत होते; त्यांना दुसरा विषय सापडत नव्हता त्याला ते तरी काय करणार?

दोन दिवसांनी पुन्हा बातमी झळकली उद्या सकाळी नवू वाजता मुंबईतील हॉस्पिटल परिसरात विमानातून पुष्पवृष्टी होईल. हे ऐकून पुन्हा चर्चा झडू लागल्या.

“ लालबागच्या राजावर दोरीवर बांधलेल्या टोपलीतून पुष्पवृष्टी होते,इथे विमानातून करणार म्हणजे विमान आकाशात कसं थांबवणार?”

ना ना प्रश्न आणि शंका कुशंका. तरी लोक सकाळची वाट बघत राहिले. बाईनी लवकर उठून न्याहारी करून ठेवली. कोरोनाच्या भीतीने नीलम यायची बंद झाली होती, पुन्हा सगळं काम एकटीवर पडत होतं. माधवने खुर्ची उघडली बाई खाली बसल्या. टीव्हीवर निवेदन सुरू झालं आणि कॅमेऱ्याने आपले डोळे आकाशाकडे लावले.

थोड्या वेळाने दूर आकाशात एक ठिपका पुढे पुढे येताना दिसला,तो पुढे येत असताना घरघरघरर आवाज येत होता. अगदी जवळ आला तेव्हा त्याच्या आवाजाने मुंबईतील लोकांच्या कानठळया बसतील की काय असं वाटू लागलं. माधवने पाहून म्हटलं “अरे हे जेट विमान आहे. बघ बघ थांबून खाली पुष्पवृष्टी होते आहे,मला वाटतं हे सातरस्ता तेथील कस्तुरबा हॉस्पिटल आहे. तोच ते विमान पुढे निघून गेलं हे केईएम हॉस्पिटल आहे व दोन मिनिटात परत येऊन पुष्पवर्शाव सुरू झाला. कस्तुरबा हॉस्पिटल मध्ये कोरोनासाठी खास व्यवस्था केली आहे. अंजली बघ ते ते बघ सगळे कर्मचारी कंपाऊंड मध्ये उभे असून आपल्या अंगावर होणारा पुष्पवर्शाव पाहून कृतज्ञतेने त्यांचे डोळे भरून येत आहेत कोणी डोळे पुसत आहे,कोणी हात जोडून आहे.. विमान पुढे जाताच कॅमेरा पुढे गेला,

एका पत्रकाराने सिस्टरला विचारलं,

“ सिस्टर याक्षणी काय भावना आहेत तुमच्या मनात?” या प्रश्नावर आपल्या अंगावरील कीट जरा उघडा करून डबडबलेले डोळे पुसत म्हटलं,

“वैद्यकीय सेवा काळात आमच्यासारख्या सामान्य कर्मचाऱ्यांचा इतका सन्मान कधी झाला असेल असं वाटत नाही. आमचे बरेच सोबती दररोज मृत्युमुखी पडत आहेत तरी आज याक्षणी वाटतं आम्ही धन्य झालो आहोत,आमची सेवा ईश्वर चरणी पावन होत आहे आता आम्ही मरणाला भीत नाहीत. प्राणांची बाजी लावून आम्ही दिवसरात्र रूग्णांची सेवा करत राहू!” त्यांचे हे उद्गार ऐकून माववचे डोळे पाणावले. बाई आपल्या पदराने डोळे पुसत राहिल्या.

इतक्यात दुसरी बातमी झळकली. एक डॉक्टर अंगावर कीट घालून उभा असलेला तो कर्मचारी कीट उघडून म्हणाला,

“ माझे दोन सहकारी गेले. आम्ही रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा मानत आहोत. आमची मरणाची भीती कधीच केली नाही. स्वर्ग कुठे असतो की नाही हे आम्हाला माहीत नाही पण आज आम्ही स्वर्गात आहोत असं वाटतंय!”

वरून पुष्पवृष्टी आणि खाली वेगवेगळ्या ठिकाणी पत्रकार मुलाखत घेत होते. एक पोलीस अधिकारी म्हणाला,

“ यापेक्षा आनंद आणि अभिमानाचा क्षण आमच्या वाट्याला कधीच आला नाही. आम्हाला बढती मिळते कौतुक होतं पण आमच्यावर पुष्पवृष्टी होते आहे हे म्हणजे…!” त्यांला बोलतांना गहिवरून आलं होतं

आकाशात विमाने घिरट्या घालत होती आणि खाली धन्य धन्य झालेले कर्मचारी कधी नव्हे इतक्या झालेल्या आनंदाने कृतकृत्य झाले होते.

हे सगळं पाहून माधव सुन्न होऊन डोळे मिटून बसला होता. बाईंनी घरात जाऊन चहाचा कप भरून आणला व टेबलवर ठेवून म्हटलं,

" सर चहा घ्या. जास्त विचार नका करू!"

"हो अंजली आज मला याक्षणी आपण इथे खाऊन पिऊन मजेत आहोत याचं मला दुःख होतं!"माधव खिन्नपणे म्हणाला.

" दुःख वाटतं हा तुमच्या मनाचा मोठेपणा आहे, नाहीतर गावात आलेले मुंबईकर बघा निवांत आहेत!" बाई म्हणाल्या.

" त्यांचा काहीच दोष नाही. जेवढी त्यांची क्षमता तेवढंच ते वागणार!"

" हे पण बरोबर आहे. माझे विचार कमी पडतात!"बाईनी आपल्या मतांबद्दल कबुली देत पुढे विचारले,

"सर हे जेट विमान म्हणजे युद्धात वापरतात तेच का?"

" होय बरोबर ; त्यातही वेगवेगळ्या क्लृप्त्या असतात असं म्हणतात. युद्धकाळात काही विमानातून शत्रूवर बॉंब टाकतात!"

" तुम्ही कधी विमानातून प्रवास केला आहे?"

" हो, नागपूर अधिवेशनात गेलो आहे बरेच वेळा!"

" आम्हाला ती संधी कधी सापडणार कोण जाणे!"

“ विमान प्रवासाचं कौतुक कधीच विमानात बसले नाहीत त्यांना असतं. एकदा प्रवास केला किंवा सतत केला की त्याचं अप्रूप वाटत नाही तरीही संधी मिळेल,तशी स्वप्न बघत रहा. स्वप्न बघायला कंजुषी करायची नाही. आपण जेव्हा स्वप्नात स्वतःला हरवून जातो ते चांगल्या तब्येतीचं लक्षण असतं!”

“ असं कोण म्हणतं?” बाईंनी विचारलं.

“ अभ्यासक म्हणतात. राहू दे . तुला आता काम जास्त पडतंय त्याचं काय? म्हणून मी

आजपासून मी माझ्या पडवीची साफसफाई करून घेईन!”

दोघं बोलत असतानाच नीलम हजर झाली.

तिला पाहून माधव विचारलं

“ तू कशाला आलीस? सगळे लोक भिवून घरात बसले आहेत!” हा प्रश्न ऐकून नीलम बाईंना घाबरत घाबरत म्हणाली,

“ बाई आम्हाला पैशांची गरज आहे म्हणून आले!”

तिची अगतिकता पाहून माधव बघतच राहिला. म्हणाला,

“ बघ अंजली परिस्थिती माणसाला किती अगतिक बनवते!” ह्या वाक्यावर बाईंनी तिला विचारलं,

“नीलम आता तुला पैसे हवेत का?” या प्रश्नावर नीलम उत्तर द्यायला कुचमली. बाई समजल्या त्यानी घरात जाऊन दोन हजार रुपये आणून नीलमच्या हाती दिले.

“ अंजली मॅडम हे पैसे माझ्याकडे उधार राहिले असं समज,कारण माझं काम तुझ्या अंगावर पडतंय!” माधवने आठवण करून दिली. तेव्हापासून नीलम पुन्हा येऊ लागली.

त्यांचं रात्री झणझणीत कोंबडी वडे खाताना माधवचे डोळे जरासे लालसर दिसत होते व बोलताना शब्द अडखळत होते हे पाहून पुन्हा बाईंना संशय येऊ लागला ह्याला काय झालंय?दारू प्यायला असेल तर तसा वास येत नाही. घरच्या माणसांची आठवण येत असेल का?” बाईंना रहावेना,

“ अहो आज असे काय वेगळेच दिसत आहात घरच्यांची आठवण येतेय का”…

“ अं…हो हो.. मला माझ्या लेकीची आठवण येतेय फार हळवी आहे ती. रोज मला मेसेज करते.!”

“ आणि बायकोची आठवण नाही येत ?”

“ येते तर . ती समजदार आहे. माझा मुलगा एकदम बेडर आहे, कधी कधी तो मलाही घाबरत नाही. अर्थात वरवर असं दाखवत असतो!”

“ आता जेवा पटकन नंतर घरी फोन लावा!”

“ आधी तुमचं जेवण होऊदे तोपर्यंत मी उठणार नाही!”

“ का? तुम्ही पिऊन आलाय का?’बाईंनी विचारलं.

“पिऊन आल्यावरच घरची आठवण येते का? समजा आज मला तसं वाटलं म्हणून!”

“ बरं ठीक आहे!” म्हणत बाई जेवण आटोपून उठल्या. नंतर माधवने अंगणात तंद्रीत असल्यासारखी शतपावली केली, थोडावेळ बांधावर बसून स्वतःशीच काही तरी बडबड केली. परत उठला घरात जाऊन चटई व उशी बाहेर आणून अंगणात पसरली. आतून टेबल फॅन ठेवून चालू करून चटईवर पसरला.

वैशाख पौर्णिमा जवळ आली होती, बहुतेक अष्टमी नवमी असावी. अंगणभर मंद चांदणे पसरले होते. क्षणभर चांदणे बघता बघता मित्राला फोन केला,

“ हॅलो विन्या कसा आहेस? मी …एकदम मस्त मजेत आहे. कशासाठी फोन केला? …कशासाठी बरं???? हां आठवलं. तुझे हे अंगण उघडे ठेवल्याबद्दल. अंगणावर चांदणे अडवून ठेवणारा तो निर्जीव अरसिक पत्रा न घातल्याबद्दल तुझे मन: पूर्वक आभार.. नाही नाही.. मला वेड नाही लागले. अरे अंगण उघडे असल्यामुळे लख्ख चांदणे मला भेटायला खाली येऊन माझ्या शेजारी बसले आहे…चंद्रीका? कोण चंद्रीका? हां हां चंद्राची राणी चंद्रीका…हो हो.. जराशीच घेतली. बरं झोपतो.. ठेव फोन गुड नाईट.

“ चंद्रीका…ही जणू……चंद्रीका….

माधवची ही बडबड ऐकून बाई भांडी आवरून पडवीत बसल्या होत्या व त्याचं बोलणं ऐकत होत्या. त्यांना प्रश्न पडला की ह्या माणसाला झालंय तरी काय? आज ओठांवर रसवंती खेळत आहे. नेहमीसारखं आज बोलत नाही. दारू पिऊन आला असेल काय? 'कधीतरी घेतो ' असं एकदा म्हणाला होता. पिऊन आला असेल तर तोंडाचा वास कसा येत नाही? आपला नवरा पिऊन आला की जवळ बसवत नाही वर अर्वाच्य शिव्या घालत असतो. कात आपलं दुर्देव भररपूर हुंडा देऊनही असला माणूस पदरात पडला;पण हा असा काय करतोय? असा विचार करत त्या थोडं जवळ येऊन बसल्या.

माधव बहुदा डोळे मिटून काहीतरी बडबडत असताना मध्येच गाणं सुरू केलं.

" तू छुपी है कहां…मैं.. तडपता यहाँ.. तू .. अंजली अंजू अंजू…. ओ दूर ..

जानेवाले.. वादा न भूल जाना…राते हुई अंधेरी…. अंधेरी? हा शब्द नको…चंदेरी…राणे हुई चंदेरी…तुम चांद चांद. चांदणी बनके…आ.. ssss,

माधवची ही बडबड ऐकून बाईंच्या काळजाचा ठोका चुकला. गोड गोड बोलून हा माणूस आपल्या प्रेमात पडला आहे अशी शंका मनात निर्माण झाली. त्यांना घाम फुटला. अरे देवा आता काय करायचं? बहुतेक हा दारूच्या नशेत आहे म्हणून मनातलं बोलत आहे. त्या घाबरून उठून उभ्या राहिल्या. इकडे माधवला अचानक आपल्या शेजारी कोणीतरी आहे हे जाणवलं. वळून पाहिलं तर तेअंजली मॅडम. तो म्हणाला,

“ मॅडम आत जाऊन झोपा आणि दार बंद करून घ्या. मी थोडावेळ असाच लवंडून राहणार आ...हे. बाय गुड नाईट!”त्याचे उद्गार ऐकून बाईंना पुन्हा धक्का बसला. इतकं होऊनही माणूस भानावर असून आपलाला जाऊन झोपा म्हणतोय. छे! आपण त्यांच्याबद्दल चुकीचे विचार करत होतो. चुकलंच आपलं खरोखरच हा भला माणूस आहे!”

असा विचार करत घरात गेल्या. तरी त्यांना काळजी लागून राहिली होती,वेळेत उठला नाही तर सकाळपर्यंत असाच राहील?”

माधव कधीतरी रात्री उठून घरात जाऊन झोपला तो सकाळी आठ वाजता उठला. फ्रेश होऊन बाईंच्या घरात येऊन म्हटलं,

“ चहा मिळेल का अर्धा कप?”

बाई स्वयंपाक घरातून बाहेर आल्या व पाहातच राहिल्या. माधव खाली फरशीवर पाय पसरून बसला होता. त्यांनी चहाचा दोन कप आणून खाली ठेवला व स्वतः खाली बसल्या. माधवने चहाचा कप उचलला तोंडाला लावला तोच बाईंनी विचारलं,

“ ही अंजली कोण आहे?” यावर माधवने तालवटलेल्या डोळयांनी बाईंकडे बघत म्हटलं,

“ अंजली...इथे अंजली एकच आहे आणि त्या अंजली मॅडम म्हणजे तुम्ही!” हे उत्तर ऐकून बाईंना रडू येऊ लागलं . म्हणाल्या,

“ सर तुमच्याकडून ही अपेक्षा नव्हती. आता काही बोलू नका. किती विश्वास ठेवला होता तुमच्यावर!”

“ ऑं? रडू येईल? विश्वास ?म्हणजे माझं काही चुकलं का?” माधवने चहाचा कप खाली ठेवून म्हटलं,

“ तुमचं नाही माझंच चुकलं. तुमच्यावर विश्वास ठेवून इथे राहा म्हटलं तर तुम्ही…”

“ बापरे! म्हणजे मी रात्री काही चुकीचं…”

“ खरं सांगा ही अंजली कोण? नाही तर .. ”

“अंजली तूच आहेस.. म्हणजे मी काही बोललो का? काय झालं सांगा.. सॉरी सांगा!”

“ माझ्या नावाने गाणी म्हणत होता. तू छुपी है कहां.. वगैरे आणि सारखं अंजू अंजू…आळवणी करत होता तुम्ही..!” बाईंनी खुलासा केला तेव्हा माधव कपाळावर हात मारत म्हणाला,

“ अरे देवा. अंजू म्हणालो ना? मग हरकत नाही. म्हणजे ती माझ्या आयुष्यात आलेली एक अंजली होती. तर माझी एक मैत्रीण होती!”

“ खोटं बोलून सारवासारव करून काही उपयोग होणार नाही. तुम्ही खोटं बोलत आहात!”बाई चिडून म्हणाल्या .. यावर माधवने एक दीर्घ श्वास घेतला व म्हणाला,

“ खरं सांगतो. कॉलेजमध्ये ज्युनिअर क्लासला एक अंजली नावाची मुलगी होती ती खूप सुंदर अशी नव्हती;पण जरा निमगोरी होती व लाजाळू होती. तिचं बोलणं गुणगुमणं वाटायचं. मला ती जास्त आवडली होती ती यासाठी की

ती अतिशय विनम्र स्वभावानची होती. अभ्यासिकेत आम्ही जवळच असायचो. कॉलेजचे दिवस संपले आणि आम्ही कॉलेज सोडून नोकरी धरली. ती सुद्धा नोकरी करू लागली . एकदा पुन्हा एकत्र भेटलो तेव्हा तिला मी लग्नाची मागणी घातली तेव्हा ती खूप रडली. म्हणाली,

“मलाही तू आवडतोस ;पण माझ्या पत्रिकेत मंगळ ठाण मांडून बसला आहे त्यामुळे मला तुझं आयुष्य बरबाद करायचं नाही!”

“झालं. एका क्षणात माझ्या स्वप्नांचा कोळसा झाला.!”

“ तुमच्या बायकोला हे सांगितलं आहे कधी?”

हो. इतक़च काय ती एकदा भेटली ;पण होती. काही गोष्टी लपविल्या तर संशय येतो,मी काही लपवलंच नाही. मला ती कधी जरासी घेतल्यानंतर आठवते…!” असं म्हणत माधव हसला.

“ मला तुमच्या बायकोशी बोलायचं आहे. फोन लावून द्या!”

“ हो लगेच लावतो. हे बोला.!

“ नको नंतर बोलेन . म्हणजे काल तुम्ही नशेत बडबडत होता?”

“नशा केली होती हे खरं ;पण काय बडबडलो ते आठवत नाही!” हा खुलासा झाल्यावर बाईंनी विश्वास ठेवून म्हटलं,

“ म्हणजे अंजली तुमच्या हृदयात आहे आणि तुमची बायको.. ?”

“ ती तर असणारच!”

“ ह्या दोघींचे भांडत होते असेल का?”

“ त्याचा मी विचार करत नाही!”

“ अजून कोणी आहे का हृदयात लपून बसलेले,?”

“ अजून तरी आठवत नाही. पुढे कधी येऊन बसले तर हृदयाचा एक कोपरा रिकामी ठेवला आहे!”

“ हं!” बाई नुकतंच हुंकारल्या. नंतर हा प्रश्न मी का विचारला?छे चुकलंच आपलं. मला वाटतं माझं आर्त मन निर्मळ प्रेमाची अपेक्षा करत आहे का? त्यांच्या मनात विचारांचे वादळ गरगरत राहिले. नंतर उठून माधवला म्हटलं,

“ चला लगेच उठा!”

तिचं निर्वाणीचे शब्द ऐकून माधव घाबरून खरोखरच उठला व आपल्या पडवीकडे चालू लागला. सॉरी. मी पोलीस पाटलाला दुसरी जागा शोधायला सांगतो!” जाता जाता तो म्हणाला तेव्हा बाई ओरडून म्हणाल्या,

“अहो उठून आंघोळ करा म्हणजे उतरेल सगळी!” या वाक्यावर दोघंही खळखळून हसले. माधवने म्हटलं,

“ मला वाटलं माझी हकालपट्टी झाली की काय?” असं म्हणत तो आपल्या पडवीत निघून गेला. सगळे प्रातर्विधी आटोपून परत बाईंच्या घरी येऊन खाली बसून म्हणाला,

“मॅडम काही नाश्ता वगैरे असेल तर आता!” बाई लगेचच कांदा पोहे घेऊन आल्या व म्हणाल्या,

“ आता कशाला मॅडम? रात्रभर अंजली अंजू आणि तिच्यासाठी “ओ दूर जानेवाले .. ची आळवणी करून झाली,आता तेच राहुदे, म्हणा अंजली!”

“ चालेल तुला? काय आहे तुम्ही.. म्हणजेच तू एक शिक्षिका आहेस व शिक्षिकांना आदराने संबोधित करायचं असतं!” माधवचे हे उद्गार ऐकून बाई स्तिमित होऊन बघतच राहिल्या.

“ सर खरोखरच तुम्ही खूप चांगले व्यक्ती आहात,नशेतही शुद्धीवर असता!” नाश्ता करून झाल्यावर दोघे असेच बसले असताना मुंबईतून फोन आला. फोनवर मधुरा होती.

“ हां बेटा कशी आहेस?.. मस्त.. आणि तुझी आई तुझा बावळट भाऊ…रोज रोज म्हणजे रोज तेच विचारणार ना? वेगळं विचारू तूच सांग काही तरी वेगळं…ऑं? काय म्हणतेस? आणि दोघांच्या घरून परवानगी मिळाली? कमाल आहे.. बरं बरं देतो . असं म्हणत त्यांनी अंजलीकडे मोबाईल दिला तेव्हा त्या दोघी काही तरी बोलून फोन ठेवला.

“ काय म्हणते मधुरा!”

“ ती म्हणाली दुधाच्या रांगेत दररोज उभं राहून तिची मैत्रीण एका तरुणाच्या प्रेमात पडली. ही बातमी दोघांच्या घरी कळली. बातमी दुधाच्या पिशवी बरोबर घरोघरी गेली हे ओळखून आपली अब्रू वाचवण्यासाठी दोन्ही घरच्या मंडळींनी पुढे काही झंझट होऊ नये म्हणून त्या दोघांचं लग्न ठरवून टाकलं कारण मुलगी कोल्हापूरची आहे व मुलगा कोकणातील आहे. कोकणी मुलं हुंडा घेत नाहीत म्हणून पटकन होकार दिला!”

“ बघ अंजली आजची तरुण पिढी हुंडा पद्धत बंद करण्यासाठी स्वतःच प्रयत्न करत आहेत!”

“खरोखरच कमाल आहे. असं झालं तर हुंडा पद्धत एक दिवस बंद होईल!” बाई भारावून म्हणाल्या.

“दुसरं काय बोलल होती?”

“ ती म्हणाली मी तुम्हाला जेवण द्यावं आणि तुम्ही मला त्याचे पैसे द्यावेत. वर म्हणते बाबांकडे म्हणजे तुमच्याकडे भरपूर पैसे आहेत!” बाईंनी फोन ठेवून म्हटलं,

“ बघा शेवटी तुमच्या मुलीला तुमची जास्त काळजी वाटते!”

“ वाटणारच शेवटी काय तर ते स्त्रीचं हृदय आहे. बरं खानावळीचे पैसे द्यावे लागतील!”

“ ते नंतर बघू!” बाई म्हणाल्या. इतक्यात

पुन्हा रिंग वाजली. माधवने फोन घेतला विचारले,

“आता काय झालं? तू होय बरं बोल .. कुणाशी बाईंनी? थांब देतो! असं म्हणत बाईंकडे फोन देऊन म्हटलं शकुंतलाला बोलायचं आहे

“ ह बोला बाई कशा आहात? मी ठीक आहे. साहेब लॉकडाऊन उठायची वाट बघताहेत…बरं … अच्छा…हो का? तो पराक्रम रात्री करून झाला.. हंहंहंह नाय नाय तसं काही नाही.. नंतर सकाळपर्यंत लोळत पडले होते ‘वगैरे बोलून झाल्यावर माधवने म्हटलं,

“ काय म्हणत होती? आणि मी कधी लोळत पडलो होतो?”

“ हेच की तुम्ही कधी कधी घेता तेव्हा तुमच्यातील रफी, मुकेश, किशोर जागा होतो. मी तुम्हाला सांभाळून घ्यावं . राग मानू नये!”

“ हां हां हां हां हां!”

“आता पूरे!” म्हणत बाई उठून घरात गेल्या. ००

एकदा पहाटे सहा साडेसहा वाजण्याच्या सुमारास शेजारच्या घरी मुंबईतून एक कुटुंब आलं. माधव त्याचवेळी उठून अंगणात फेऱ्या मारत होता. तो थांबला. त्या कुटुंबातील माणसं कोणालातरी फोन करत काही तरी विचारत होती. त्यानी खूप वेळ आत बाहेर फिरत कुणाकुणाला फोन केले तरी कोणी प्रतिसाद देत नाहीत हे पाहून निराश झाले होते. अखेर आशेने त्यांनी बाईंना हाक मारली,

“ अंजली बाई जरा बाहेर येता का?” माधवने ती साद ऐकली व थोडा जवळ जाऊन म्हटलं,

“बाई अजून झोपल्या आहेत उठवू का?” यावर त्यातील एक गृहस्थ म्हणाले,

“ तुम्ही तिथे राहता तेच साहेब ना?”

“ हो. तुम्ही मला ओळखता?”

“ विन्या बोलला होता म्हणून..!”

“ बरं बरं. काय हवंय तुम्हाला?” माधवने विचारलं. तेव्हा ते गृहस्थ म्हणाले,

“अहो थोडं पाणी हवं होतं पिण्यासाठी. आमच्या बाटल्या रिकाम्या झाल्या आहेत व नळ यायला अजून अर्धा तास आहे!” त्याच्या बोलण्यात आर्जवी होतं हे ओळखून माधव म्हणतना,

“ तुम्ही काही तरी भांडं घेऊन या मी पाणी आणून देतो!” असं म्हणत तो आपल्या घरात शिरला. घरात जात असताना बाई उठून बाहेर आल्या,

“ काय झालं ?”

“ तुमच्या शेजारील कुटुंब मुंबईतून आले आहे. त्यांना पिण्यासाठी पाणी हवं आहे. मी एक कळशीभर पाणी देऊन येतो!.

बाई हसत घरात जाऊन एक लहान कळशी भरून आणली व बाहेर घेऊन जात असताना माधवने ती कळशी आपल्या हातात घेवून बाहेर त्यांच्या कंपाऊंडजवळ येऊन त्या गृहस्थाला भांडं घेऊन यायला सांगितलं. तो गृहस्थ भांडं घेऊन येताच त्याच्या भांड्यात पाणी ओतून दिलं. थोड्या लांबच्या घरातून आडून आडून सगळे बघत होते. माधवने पाणी ओतून दिले तेव्हा तो गृहस्थ म्हणाला,

“ साहेब ज्या माणसाला पाणी भरून ठेवायला सांगितले होते,त्याने भांडी भरून ठेवली होती;पण तो झोपेतून उठण्याआधी आम्ही हजर झालो. आता तो आमच्या घरी यायला घाबरत आहे!” त्याचे बोल ऐकून माधव म्हणाला,

“ लोक घाबरून गेले आहेत. आता याबद्दल कोणतीही दोष देऊन उपयोग नाही, तुम्ही नळ आल्यावर पाणी भरून घ्या!”

“ होय साहेब. लय उपकार झाले हो!”

“ कसले उपकार नी काय विसरून जा ते!”

असं म्हणत तो पाठी वळून आपल्या घरी आला. बाई म्हणाल्या,

“ तुम्ही हे करू शकलात मला धीर झाला नसता!”

“ते आहेच बायका घाबरट असतातच”!”

“ तरी बरं मी तुम्हाला घरात घेतलं!”

“ याबद्दल आपले मनःपूर्वक आभार धन्यवाद!”

“मी निघूनच जाते,!” ००

संध्याकाळी वाडीत आडून आडून चर्चा होत होती,

“ सायब यवड्या जवल गेला व्हता!”

“ व्हय आनि काय झालं असतं मजे?”

“ नायतर काय; जरा वेलाने पानी यनारच व्हतं!”

“ नाय त काय,बाई लयच लाड करतायत सायबाचे!” एकानं तारे तोडले ते ऐकून बाकीचे घाबरून म्हणाले,

“ मेल्या असं काय बोलू नकोस सायबला समजलं तर आपले लय वांदे व्हतील!”

“ न्हवं पन म्हंतो यवडं करायची काय गरज व्हती?”

“ तं झालं बोलून दुसरं काय तरी बोल!” या वाक्यावर सगळे हसले.

“नाय पन बाई लय चांगल्या हायत. त्यांच्याबद्दल वाईट बोलू नका. अरं आपन आपल्या मानसात -हातोय, तेंच्यासंगं सोबतीला हाय कोन? तवं कोनतरी हवंच. सायब सरकारी मानूस हाय त्याला पन सोबत झाली; भले ता बापया मानूस असला तरी परगावात हाय अशा टायमाला सोबत आनि खान्यापिन्याची यवस्ता बाईंमुले होतेय!”

“ व्हय व्हय हे बाकी खरं हो!”. ना ना प्रकारच्या माणसांचे ना ना प्रकारचे बोल निघत होते. त्या घरातील रघू व त्यांच्या कुटुंबीयांना माधवबदल आदर वाटू लागला होता. रघू सकाळी परसावात झाडलोट करताना माधव दिसला तर आवर्जून नमस्कार करत आहे. एकदा रघुच्या बायकोने हसत नमस्कार केला. बाईंनी ते पाहून हसत म्हणाल्या,

“ सर बघा एकदाच त्यांना पाणी दिलात त्याची परतफेड दररोज नमस्कार करून होत आहे!”

“ हो मी यांची अपेक्षा केली नव्हती. कठीण प्रसंगी कुणी आपल्याला मदत केली तर त्याची जाणीव ठेवणं हे माणुसकीचं लक्षण असतं.

“ बरोबरच आहे. मलासुद्धा ह्या घरातील काका काकू खूप मदत करतात म्हणजे कधी बाजारातून भाजी पाला आणणे,दळण आणून देणे वगैरे. चक्की

वाडीत नाही त्यामुळे ते जेव्हा आपलं दळण घेऊन जातात तेव्हा माझेही दळण घेऊन जातात. विशेष म्हणजे ते मला बाई म्हणत नाहीत. तर ते पोरी महागात..”

“ हो? हे मला आजच कळलं!”

“ शिवाय मी त्यांना अधुनमधून फोन करते!”

रघुच्या घरी दररोज पोलीस पाटील व डॉ. एक नर्सबाई, अंगणवाडी सेविकांचा ताफा त्या कुटुंबातील लोकांची तपासणी करायला येऊ लागला होता ००

संध्याकाळी माधव बाबींना म्हणाला,

“ चल आपण वरच्या माळावर फेरी मारून येऊ?”

“ मी येऊ? नको नको!” बाई घाबरून म्हणाल्या.

“ अंबरोबर आहे. मीच जाऊन येतो!” असं म्हणत तोंडावर मास्क लावून तो बाहेर पडला. पाचेक मिनिटात तो माळ सुरू झाला. बघतो तर झाडांखाली काही मुलं अभ्यास करत होती. ह्याला पाहून सगळी घाबरून उठली व उभी राहिली. माधवने ओळखून म्हटलं,

“ अरे बसा. भिवू नका. तुम्ही फार चांगले काम करत आहात.!”माधवचे उद्गार ऐकून मुलं कावरीबावरी झाली. काय चांगले काम करतोय हे त्यांच्या ध्यानात आलं नव्हतं,

“ इकडे येऊन तुम्ही अभ्यास करत आहात ना?”

“ ह. होय. घरात नेटवर्क चांगले येत नाही म्हणून.... ”

“ मला तुझी ओळखता का?’ ह्या प्रश्नावर कोणी हो म्हटलं तर कोणी नकारार्थी मान हलवली.

“ मी अंजली मॅडम घ्या शेजारी राहतो. तर मी तुम्हाला अभ्यास करायला मदत केली तर चालेल? म्हणजे मी आणि अंजली मॅडम तुमच्या शंका,न सुटणारी गणिते वगैरे सोडविण्यासाठी मदत करू. पैसे घेणार नाही. आम्ही पण घरात बसून कंटाळलो आहोत. तुम्ही आपापल्या घरात विचारा त्यांनी परवानगी दिली आपण बसून अभ्यास करू!”

माधवचं म्हणणं मुलांना पटलं कारण शाळा बंद असल्याने शंका, प्रश्नोत्तरे सोडवून द्यायला कोणीच मदत करत नव्हते.

माधव तिथून घरी परतल्यावर बाईंना म्हणाला,

“ अंजली मला एक नवीन कल्पना सुचली आहे!”

“ आता काय कविसंमेलन भरवणार आहात का?” बाईंनी त्यांची चेष्टा करत म्हटलं. तेव्हा माधव म्हणाला,

“ संमेलन हा शब्द बरोबर वापरला तू, तू. म्हटलं चालतंय ना? चालतंय. तर अभ्यास संमेलन. आता मी सहज वरच्या माळावर फेरी मारताना पाहिलं अनेक मुलं झाडांखाली अभ्यास करत होती!”

“ मग ? “ बाईंनी उत्सुकतेने विचारलं.

“ हां त्यांना मार्गदर्शन करायला कोणी नाही म्हणून तू आणि मी आपण दोघांनी त्यांना मदत करून त्यांचे प्रश्न सोडवू!” बाई क्षणभर आवाक होऊन बघत राहिल्या. ह्या माणसाला हे नवीन काय सुचलं आहे,गाववाले परवानगी देतील का? आधीच सगळे घाबरलेले आहेत. अशी शंका आली.

“ सर तुमचा विचार चंगला आहे ;पण कोण पटवून घेईलसं वाटत नाही!”

“ हे बघ अंजली तू प्राथमिक शिक्षिका आहेस. हल्ली चौथीच्या मुलांनाही शुद्ध मराठी लिहिता येत नाही,तो सराव तू करून घे. मी पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करू शकतो. दहावीला मी पहिल्या दहा मध्ये होतो!” माधवने अभिमानाने म्हटलं ते ऐकून बाई खाली मान घालून हसल्या. माधव चिडला,

“ ह्यात खाली मान घालून होण्यासारखं काय आहे?”

“ तुमच्यावेळी पुस्तके वाचून पाठांतर करून विद्यार्थी पास होत होते,आता शाळा आणि ट्यूशनमध्ये भरडून गेलेले विद्यार्थी अपेक्षित प्रश्न उत्तरे वाचून पास होतात!” बाईंनी खुलासा केला. माधवला ते पटलं तरी म्हणाला,

“ बघ मी शिकवणी घेणारच!”

“ कमीत कमी पोलीस पाटलांना तरी विचारा नाहीतर आपण गोत्यात येऊ!”

“ हे बरोबर आहे. आता तूच विचार,तुला शिकवणी घेण्याचा अधिकार आहे मला नाही,मी फक्त सोबतीला असेन असं बोल!*

बाईंनी पोलीस पाटलांच्या कानावर घातले. त्यानी सरपंच अण्णांची परवानगी घ्यावी असं सुचवलं. हा सगळा प्रकार पाहून माधव म्हणाला,

“ एक गोष्ट लक्षात घे. सरकारी कार्यालयात लोकांची कामे व्हायला का वेळ लागतो? ते कळलं असेलच!” यावर बाई हसत म्हणाल्या

“ सद्या इथे एक सरकार आहेच!”

“ धन्यवाद! करा फोन!”.   ००

“ सर परवानगी मिळाली;पण पालक म्हणतात, शिकवणीची फी द्यायला आमच्याकडे पैसे नाहीत असं लोकांचं म्हणणं आहे!”

“शिकवणी मोफत आहे,उलट शिकवणीला आल्याबद्दल काही हवी ती मदत देण्यात येईल. असं कळव!”

अंध व्यक्तींने एक डोळा मागावा आणि देवाने दोन्ही द्यावेत असं झालं. पालक तयार झाले या शाळेतल्या खळयासाठी माधवने वरच्या माळयावरल्या मळणीच्या खळयाची जागा निवडली. त्या उदास खळयात मधोमध दावणीच्या आट्याने झिजलेल्या एक तिवडा उभा होता. माधवने चार माणसं लावून तो

तिवडा काढून खळयाच्या कडेला पुन्हा उभा करून ठेवला. खळयाची दुरुस्ती करणारे दोघेजण म्हणाले,

“ सायब आता मलनी व्हैत नाय. तिवडा तरी कशाला हवा?” यावर माधवने म्हटलं,

“ अरे बाबांनो तिवडा हा मळणीच्या खळयाची ओळख असतो. तिवडा मधोमध उभा असतो म्हणून त्या जागेला मळणीचं खळं म्हणतो नायतर ते खळं वाटत नाही म्हणून शिवाय इतकी वर्षं तो खळयात सतत उभा राहून खळयाची राखण करणारा राखणदार जवळ उभा असायला हवाच!”

” माधवचे विचार त्यांना पटले. म्हणाले,

“ व्है व्है सायब ह्यं बाकी खरं हो!”

“ शिवाय मी ही बालपणी मळणीचे बैल रात्रभर हाकवले आहेत.!.

“ काय म्हंता? तुम्ही शेतकरी वाटत नाय!”

“ वाटत नाही ते आता. तुमची मुलं शेतकरी आहेत हे तुम्हाला माहीत आहे? दुसऱ्या कोणाला कसं पटेल?”

“ व्है व्है हे पन खरं हाय. बरं किती शेतीवाडी हाय तुमची?”

“ वर्षभर पुरेल इतकी शेती आहे, म्हणजे होती. आता सगळी सोडली!”

“ तं काय सायळ अवो आम्ही हितं -हातो तरी शेती पिकली की जनावरं वाट लावतात,लय लुकसान व्हतं. गाव खय हो तुमचं?”

“ आमचं गाव डोंगरवाडी तिकडे लांजा पूर्व भागात आहे!”

“ तिकडं भांबेड गाव हाय तिकडं एका लग्नाच्या कारेक्रमाला गेलो व्हतो एकदा!”

“ बरोबर त्याच गावाला जोडून आमचं गाव हाय!”

“ व्है काय,लय डोंगराल भाग हाय. हे असे उच उच कडे,तं मी एकदा आमच्या पावन्याकडं गेलो व्हतो. ता म्हनाला चला पारधीला,गेलो मी तं तिकडचे कडे बघून डोचकेवर पडतात क काय असं वाटत होतं!”

माधवला घाबरून लांब राहणारे आता बोलू लागले होते. एक शेतकरी दुसऱ्या शेतकरी माणसाशी बोलताना शेती हा विषय निघणारच. ’शेतकरी म्हणजे मातीतली माणसं’,त्याच मातीत माधवचं आयुष्य गेलं होतं. त्यामुळे गप्पा गोष्टी करत खळ्याची साफसफाई करून घेतली .

काम आटोपून परत जाताना ते म्हणाले,

“ सायबाला शेतीची नी मातीची जानीव हाय हो!”

व्हय व्हय खरं हाय!”. ००

खळं तयार झाल्यावर माधव क्षणभर जुन्या आठवणींनी भावूक होऊन देहभान हरवला होता त्याला भानावर आणण्यासाठी बाईंनी म्हटलं,

“ सर बघा खळं सारवून अगदी व्यवस्थित केलं आहे. माधवने पाहिलं तर खरोखरच खळं आता चमकत होतं. खळ्याच्या पूर्वेला दोन तीन आंबे व फणसाची डौलदार झाडे उभी होती,त्यांची सावली खळ्यावर पसरलेली

असल्याने निदान अकरा वाजेपर्यंत मुलं इथे आरामात बसतील हा विचार माधवने केला होता. खळं तयार झाल्यावर माणसं निघून जाताना त्याना थांबवत माधवने खिशातून पाचशे रुपये काढून एका माणसाच्या पुढे धरले. हे पाहून ती सगळी मास्कधारी माणसं बघतच राहिली. एका बाईंनी धीर करून म्हटलं,

“ सायबानू तुम्ही आमच्या मुलांसाठी करतात तवं आम्हाला पैसे नकोत!”

“ व्है सायब,शाला बंद झाल्यापासून पोरं खेलत असतात, अभ्यास कर म्हतलं तर आम्हाला कोन शिकवनार म्हनत असतात!”

“ व्है आनि आम्ही अडानी -हायलो पोरं तरी शिकू देत. ह्या बाईपन चांगल्या सोभावाच्या हायत मुलांना लय चांगल्या शिकवतात!”

माधवला ह्या सर्वांचे विचार ऐकून बरं वाटलं. खरी माणुसकी किंवा खरी जाणीव खेड्यापाड्यातील लोकांना असते’ असं साधू संत का सांगून गेले याचा अनुभव आला. संध्याकाळी बाईंनी त्याला म्हटलं,

“ तुमचं ह्या खळयावर जास्त प्रेम आहे वाटतं!”

“ हो कारण खळयावर मळणीचे बैल हाकवत बऱ्याच रात्री जागरण केलं आहे. कोकणात पूर्वी ‘हरीक’ नावाचं तृणधान्य होतं. ते झोडणी करून चालत नसे,दाणा सुटायला चिवट होता त्यामुळे बैलांच्या मळणीने दाणे गळून पडायचे. बरं खळी घरापासून थोडी लांब काही खळी रानात सपाट जागेवर जमीन सारखी करून बनवलेली असायची...”

“ सर खळं काय असतं ते माहीतच आहे पुढे बोला!” बाईनी म्हटलं, तेव्हा माधव पुढे म्हणाला,

“ .. तर खळयावर एक गॅसची बत्ती असे तिचा उजेड किती पुरणार? म्हणून अशा मळण्या पौर्णिमेच्या आधी किंवा लगेच नंतर घेतल्या जात होत्या. हे काम ऐकायला रसदार वाटत नाही; पण त्या चांदणरात्री चांदण्यात बैल हाकण्याची व त्या खाज नसलेल्या गवतावर कोलांट्या उड्या मारण्याची जी मौज होती ती मला अजून आठवते. असं समजा की मी त्या चांदण्या रात्री ही. हृदयात जपून ठेवल्या आहेत!”. ००

दुसऱ्या दिवसांपासून खळयावरील शाळा सुरू झाली. खळयात तीन अंतर राखून आखलेल्या चौकोनात दहा बारा मुले बसून अभ्यास करू लागली, त्यांना मार्गदर्शन हे दोघं करू लागली. ह्या शाळेत धडे शिकवणी नव्हती. फक्त मुलांना अडलेले प्रश्न,नसुटणारी गणिते, निबंध आणि दहा ओळी शुद्ध लेखन; जे हल्लीच्या मुलांना अवघड झाले आहे तेवढाच अभ्यास घेणे सोपे झाले. अभ्यासातील नेमक्या अडचणी समजावून सांगितल्या तर मुले लवकर आत्मसात करतात याचा अनुभव माधवला होता म्हणून हा प्रयोग यशस्वी ठरू लागला. आधी माधवला भिवून असलेली मुलं मोकळेपणाने आपल्या शंका ह्या दोघांना विचारत अभ्यासात रममाण होत होती. खळयात साडेअकरा वाजले व ऊन पसरू लागलं की शाळा बंद.

हे पाहून मुलांची लहान भावंडे वही पेन्सिल घेऊन येऊ लागली,यांची शिकवणी हसत माधवने बाईंवर टाकली. अर्थात लहान मुलं शिकणं कमी बागड्यासाठी येत आहेत हे दोघांनी ओळखलं होतं;पण असू देत एका बाजूला खेळत बसतील म्हणून त्यांनाही अभ्यास कमी खेळ जास्त असं होत होतं.

एकूण घरात अडकून पडलेली मुलगा जणू काही स्वातंत्र्य मिळाल्याचा आनंद होत होता.

“अंजली आपण या निमित्ताने मुलांना घराबाहेर काढल्यमुळे त्यांच्या मनातील भीती कमी होईल हे निश्चित!” माधव म्हणाला. अंजली मॅडमनी हसत त्यांच्या विचारांना दुजोरा दिला. ००

बघता बघता खळ्यावरील शाळेची बातमी गावभर पसरली. वाडीवाडीतून सरपंच अण्णांना फोन येऊ लागले. अण्णा माधवला सांगू लागले,

“ साहेब तुमचा प्रयोग लोकांना आवडतो आहे व आमच्या वाडीतील मुलांसाठी तुम्ही प्रयोग करणार का ? विचारत आहेत.

“ अण्णा लोकांना प्रयोग आवडत आहे याचा आनंद होतोय ;पण त्यांना म्हणावं,मी आखणी करून देईन तुमच्याकडे चाकरमानी आले असतील त्यांना सांगा ते आवडीने करतील. मला येथून बाहेर पडलो तर तिकडची माणसं

घाबरण्याची शक्यता आहे!” वगैरे समजावले. प्रत्येक घटनेला विरोधक विरोधक विरोध करतातच तशी कुजबुज सुरु झाली.

“ नाय साहेब चांगलं काम करतोय;पन पोरांना लागन झाली तर जबाबदार कोन?”

“आनि शिक्षनखातं परवानगी देईल का?

“ न्हवं मी म्हंतो उद्या साहेब गेला मुंबैला त मग फुड काय?”

“ व्है तर ह्या सायब लोकांचा भरवसा नसतो,आज हिकडं उद्या तिकडं!”

अशाप्रकारे अण्णांना गोत्यात आणायचा प्रयत्न केला. अण्णा माधव आणि अंजली बाईच्या या प्रयोगावर खूष होते.

अचानक एके दिवशी दुपारी पाच सहा लोकल पत्रकार आपापले कॅमेरे घेऊन हजर झाले. बाई घाबरल्या माधव शांत होता,

“ आपलं नाव काय सर?”

“ माधव डोंगरे शासकीय अधिकारी!”

“ आपण शिक्षक नाही?तरी आपण …”

“ मुलांचा अभ्यास अशा कठीण परिस्थितीत घ्यायला केवळ शिक्षकच हवा असं नाही. तुम्ही तुमच्या मुलांचा अभ्यास घेता की नाही?” माधवने उलट विचारलं तेव्हा तो थंड झाला!”

“ सर मुलांना दुर्देवाने बाधा झाली तर?” दुसऱ्याने तारे तोडले.

“ या आजाराची लक्षणे श्वास लागण्याने सुरू होतात असं शास्त्रज्ञ म्हणतात. शिवाय जरासं अंग तापलं तर मुलं ह्या शाळेत येणारच नाहीत!”

“ बरं ठीक आहे तरीही तुम्हाला पोलिसांनी जमावबंदीचा आदेश मोडला म्हणून विरोध केला तर ?”

“ तर आम्ही ही शाळा बंद करू. मुळात ही शाळा शाळा नाही. तुम्ही बघू शकता. आम्ही दोन मुलांमध्ये तीन फूट अंतर ठेवून बसवले आहे, ही सगळी मुलं ह्याच वाडीतील आहेत शिवाय पालकांनी परवानगी दिली आहे तेव्हा वेळ पडली तर हा अभ्यास वर्ग बंद करू!”

“ सर आतापर्यंत मळणीच्या खळयात बैल फिरताना दिसत असायचे. आज आपण याबद्दल काय म्हणाल?”या प्रश्नावर माधव हसत म्हणाला,

“ आम्हाला बैल आणि ह्या मुलांना आमची वासरं समजा!”

“ हां हां हां हां” पत्रकार मंडळींनी खो खो हसन माधवला दाद दिली.

पत्रकारांची यापुढे बोलण्याची हिंमत झाली नाही,आपण अधिक दोष काढत बसलो तर अभ्यास करण्यासाठी आलेल्या मुलांचं नुकसान होईल म्हणून ते लोक निघून गेले.

दोन दिवसांनी पोलीसांचा ताफा आला,

त्यांनी थेट बाईंना विचारले.

“ बाई तुम्ही हे नियमबाह्य काम करत आहात असं वाटत नाही?” फौजदार म्हणाला,

“ काम नियमबाह्य आहे हे खरं आहे ;पम मुलांच्या अभ्यासात मदत करणे गरजेचे आहे म्हणून आम्ही हा प्रयोग करत आहोत.!”. त्यानंतर फौजदार माधव कडे वळला,

“ सर तुम्ही शिक्षक आहात?”

“ नाही. मी शासकीय अधिकारी आहे. मी एका विवाह समारंभासाठी आलो होतो आणि ला◌ॅकडाउनमुळे ह्या गावात कॉरोंटाईन झालो होतो. आता एकवीस दिवसांनंतर माझी मुक्तता झाली आहे. एकदा माझ्या नजरेला पडलं की काही मुलं वरच्या माळावर झाडांच्या सावलीत बसून अभ्यास करत आहेत. मी त्यांना काही प्रश्न विचारले तेव्हा लक्षात आलं की ह्या मुलांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे म्हणून आम्ही मुलांना अभ्यासात मार्गदर्शन करत आहोत!” असं म्हणत त्याने आपलं आयडी कार्ड पुढे केलं. फौजदार साहेबांनी ते पाहून हसत म्हटलं,

“ सॉरी सर तुम्ही चांगले काम करत आहात. ते चालू ठेवा . तरी सर मुलांची काळजी घ्या. सद्या थोडे थोडे लोक मुंबईतून गावी येत आहेत!”

“ हो फौजदार साहेब त्याची काळजी आम्ही घेऊ धन्यवाद साहेब!”

माधवचं आयडी कार्ड बघितलं की सगळ्यांची वाचा बसत होती तसं झालं. बाईंनी सुटकेचा निःश्वास घेतला.

००

शाळा नीट चालत असताना गावातील व मुंबईतून आलेले चार पाच तरुण खळ्यावर येऊन माधवला भीत भीत म्हणाले,

“ सर तुमची शाळा सुटल्यानंतर आम्ही इथे बसलो तर चालेल का?” ह्या प्रश्नावर माधव व बाई सुद्धा थक्क झाल्या. आनंदही वाटला. नंतर मनात विचार आला की ही मुलं मोठी आहेत, अभ्यासाच्या नावाखाली मोबाईलवर गेम खेळत बसले तर? गाववाले आपल्याला दोष देतील.

माधवला त्यांच्या मनातील हेतू स्वच्छ वाटला. तो म्हणाला,

“ ही खळ्यावरील शाळा आमची नाही, तुमचीच आहे. तुम्ही इथे बसणार असाल तर चांगले आहे;पण दुपारनंतर ऊन येईल तेव्हा काय करणार?”

“ ते आम्ही प्लास्टिकचा कागद बांधून घेवू. येथे नेटवर्क चांगले येते!” एक मुलगा मुलगा म्हणाला. माधव म्हणाला,

“बसा हरकत नाही त्यापूर्वी पोलीस पाटलांच्या कानावर घाला नाहीतर आम्ही स्वतःच्या मनाने सगळं करतो असं होऊ नये!”

“ हो सर आम्ही विचारतो!”. ००

एक लहानसा प्रयोग इतका यशस्वी होईल असं माधव व बाईंना वाटत नव्हतं पण तो झाला याचा दोघांनाही आनंद झाला.

“ अंजली आता पंधरा दिवस झाले. आपली शाळा चांगली चालत आहे. पावसाळा जवळ येत आहे. लोकांचा शेतावर वावर वाढतोय. अजून आपली सुटका होण्याची शक्यता दिसत नाही!”

“ आपली सुटका सद्या विसरा . उलट एक एक करत चाकरमानी गावी येऊन आपापल्या घरात अलग राहात आहेत!”

“ बरं असो! उद्या रविवार आहे व आपल्या शाळेला सुट्टी आहे तेव्हा सकाळी मी बाजारात जाऊन काही भाजीपाला घेऊन येतो.!” माधवने म्हटलं तेव्हा बाई घाबरून म्हणाल्या,

“ नको तुम्ही मुळीच नको,मी जाणार आहे!”

“ मी का नको? तिकडे मी काही गडबड करेन असं वाटतं का?”

“तिकडे नाही. घरी आल्यावर रात्री इकडेच कराल!” म्हणताना बाई हसत होत्या. ते ओळखून माधव म्हणाला,

“ ठीक आहे तू जा मी इकडे लाकडे फोडून ठेवतो आणि परत येताना रिक्षानेच ये . कोणी नकार दिला की मला लगेच फोन कर!”

“ करते पण तुम्ही येऊ नये!”

“ ओके!”. ००

साधारण दहा वाजण्याच्या सुमारास बाहेर रिक्षा थांबली. माधवने हातातील काम थांबवले व अंगणात आला . बाई रिक्षातून उतरून रिक्षाचे भाडे

देत होत्या व तो नको नको राहुदे म्हणत होता हे पाहून माधवला मनोमन हंसू आलं. त्याने रिक्षावाल्याला जरा चढ्या आवाजात म्हटलं,

“ ए भाडे घे!” तो घाबरला आणि भाडे घेऊन निघून गेला.

यानंतर दोघांनी न्याहारी केली. माधव गालात हसत होता, बाईना शंका येऊ लागली. हा माणूस गालात हसतोय यांचा अर्थ त्याने काही तरी लबाडी केली असावी हे नक्कीच; धीर करून म्म्हटलं,

“ आजचं हसणं जरासं वेगळं वाटतंय!”

“ वेगळं? हसणं हसण्यात कसला आहे वेगळेपणा?” हसणं ते हसणंच असत!”

“ असतं. मोहक हास्य, साळसूद हास्य,निर्मळ हास्य,छद्मी हास्य, क्रूर हास्य वगैरे सगळं तुम्हाला ठाऊक आहे,मला शिकवू नका,मी शिक्षीका आहे हे विसरून गेलात का?”

“ बापरे हास्याचे इतके प्रकार असतात हे मला आजच कळलं!”

“ पुरे सगळं कळतंय मला!”

“हो मॅडम खरं आहे आणि तुम्ही शिक्षीका आहात हे मी कसा विसरेन? मला त्या रिक्षावाल्याचं हंसू आल़. कसा घाबरला होता मला बघून!”

“ मी नाही घाबरत तुम्हाला!”

“ नकाच घाबरू. नाहीतर चहात मीठ आणि वरणात साखर टाकाल!”

“ मी कधी टाकली हो?”

“ तुम्ही नाही, माझ्या खानावळवाल्या बायोने!”

“ म्हणजे मी नाही मजले!”

“ एकदा काय झालं…”

“ गोष्ट सांगू नका सरळपणे सांगा!”

“ एकदा काय झालं अशी सुरूवात झाल्याशिवाय वाक्य पुढे कसं चालवणार? हे काय कोर्ट आह? हो की नाही? म्हणाला?.. म् तर खरी घटना सांगतो. एक प्रख्यात भजनातील पखवाज वादक आमच्या खानावळ बंधूंना.”

“ खानावळ बंधू? हा काय प्रकार आहे!” बाईंना माधवने बरोबर गुंतलेलं होतं…’ तर खानावळ बंधू म्हणजे आम्ही एकाच ताटात जेवणाचे खानावळी म्हणून आम्ही एकमेकांना बंधू म्हणतो!”

“बरं ठीक आहे पुढे?

“ ते अचानक भेटायला आले. त्यांना बघून आमची बायो गोंधळून गेली. एवढा मोठा सुप्रसिद्ध बुवा आपल्या घरी बसला आहे तर त्याला चहा देण्यासाठी चुलीवर आंदण ठेवले. जवळच्या स्टोव्हवर डाळ फोडणीला दिली होती,त्या डाळीत साखर व चहात मीठ टाकलं. तो भला गृहस्थ किती मोठ्र्या मनाचा बघा,त्याने तो चहा पिताना चहा खारट आहे हे अजिबात कळू दिलं नाही. चहा पिऊन त्याने आमचा निरोप घेतल्यानंतर आम्ही अर्धा अर्धा कोप चहाचा एक घोट घेतला तोच तोंड वाकडं झालं. अशी ती गंमत!”

“ बरं गोष्ट खरी वाटते!”म्हणत बाईंनी माघार घेतली. त्याना माधवबदल आपुलकीची भावना होती तरी त्याच्याअपरोक्ष त्याचा उल्लेख ‘हा माणूस ‘असंच करत असत. परपुरषाशी जास्त नातेसंबंध जूळू नयेत म्हणून त्या

प्रयत्नशील होत्या. एकदा का मुंबईला जाण्यासाठी वाहतूक सुरू झाली की हा निघून जाईल. तोपर्यंत चांगली सोबत होतेय हे महत्त्वाचे. असे विचार त्याच्या मनात येत असत. इतक्या माधवने म्हटलं,

“ अंजली मला वाटतं तुझी धावपळ होतेय तेव्हा एखादी बाई मदतनीस म्हणून ठेव!”

“खरंच. मला एक मुलगी विचारत होती. गरीब घरातील आहे, तिला मदतीची गरज आहे!”

“ आताच बोलावून घे!” माधवने सांगितलं त्याबरोबर तिला फोन करून घरी बोलावले. अकरा एकोणीस वर्षांची देखणी मुलगी भीत भीत आली.

“ नाव काय तुझं मुली?”

“नीलम!” मुलगी उत्तरली. नंतर ती बारावी पास असून पुढील शिक्षणाची परिस्थिती नसल्याने नोकरी करण्याचा विचार करत आहे हे पाहून माधव म्हणाला,

“ हे बघ नीलम तू मला मुलीसारखी आहेस. तेव्हा सद्या मॅडमना मदत कर आणि मुंबईत गेल्यानंतर मी तुला पुढील शिक्षणासाठी मुंबईत नेऊन शिक्षण पूर्ण करून नोकरीवर लावू शकतो फक्त तुझ्या आईवडिलांना माझ्यावर विश्वास ठेवून पाठवलं तर!’

नीलम त्याच दिवसापासून काम करू लागली. दोन्ही खोलीतील केरकचरा काढणे,लादी पुसणे व माधवचे कपडे धुणे आणि बाईंची कामे करणे. ही कामं व्यवस्थित करू लागली.

संध्याकाळी माधव फोन वरून कुणालातरी झापत होता. नंतर कुठे कुठे फोन करून नंतर बातम्या सुरु झाल्या. तो बातम्या बघत असताना बाईंच्या घरचा फोन आला. माधवने त्यांना फोन दिला.

“ हं बोला…मी ठीक आहे प्राजक्ता कशी आहे? बोलतेय? द्या. हं बेटा रडते कशाला? मी येणार आहे लवकरच…आता लॉकडाऊन उठणार आहे…म्हणता म्हणता त्यांचे डोळे भरून आले. डोळे पुसत म्हटलं.

नको रडू हं आणि अभ्यास कर.. मी फोन करते निघाल्यावर. बरं दे त्यांच्याकडे…काय झालं.. तो माणूस? अहो जरा नीट बोला? तो माणूस म्हणजे? मोठे अधिकारी आहेत ते. त्यांच्यामुळे मला चांगली सोबत होते आहे. गप्प बसा हे कोकण आहे इथे शिक्षकांना मान देतात.. कळलं ठेवा फोन!” असं दरडावून फोन कट केला. बाईना रडू आवरता आलं नाही, त्यांना हुंदका दाटून आला. माधव शांतपणे बघत होता. बाईनी स्वतःला सावरलं तेव्हा माधव म्हणाला,

“अंजली तू खूप सहन करते आहेस असा अंदाज येतो. तुझा नवरा संशयी झाला आहे कारण तू तरूण असून एकटी आहेस व माझ्यासारख्या अपरिचीत इसम घरात आहे. तेव्हा तुझी सुटका व्हावी असं वाटत असेल तर मी दुसऱ्या ठिकाणी राहायला जातो. खरं तर मी माझा अधिकार वापरून एव्हाना मुंबईत गेलो असतो;पण तिथे गेल्यावर मला रोज ऑफिसला जावं लागेल आणि म्हणून मला संधी मिळाली आहे विश्रांती घेण्याची त्याचा फायदा घेतोय. आमच्या

खात्यात भरपूर काम आणि वरून दबाव असतो,त्याचा मला राग येतो. पैसा भरपूर मिळतो. दुसरी गोष्ट तुझ्या हातचं चांगलं जेवण मिळत आहे. मी स्वतः करायला सुरुवात केली होती. ते करून कंटाळा आला होता. मी कसाही करुन गेलो असतो;पण: तू माझ्या जेवणाची सोय केलीस आता जीवाची चैन करावी असं ठरवलंय बोल एका शब्दात उत्तर दे,मी राहू की दुसरीकडे राहायला जाऊ?"

" इथेच रहा. जायचं असेल तर मला सोबत घेऊन चला!" बाईंनी म्हटलं. ते ऐकून माधवला प्रचंड धक्का बसला,ऑ वासून तो तिच्याकडे बघतच राहिल्या. बाईनी लगेच म्हटलं,

"चुकीचा विचार करू नका, मुंबईत लोअर परेल ला माझी मावशी राहते तिच्या घरी राहीन!"तिचे उद्गार ऐकून माधव म्हणाला,

" त्यापेक्षा आपल्या गावी जा!"

" माझ्या नवऱ्याला तेच हवंय तरी मला जायचं नाही.

" पण का, ? माधव हट्टाला पेटून म्हणाला तेव्हा बाईंनी म्हटलं,

" नवऱ्याला मी जवळ हवी आहे,छळ करायला. मुलगा झाला नाही म्हणून मी काय काय सहन करते आहे.!" असं म्हणत त्यांनी पहिल्यांदाच आपली कर्मकथा सांगितली ते ऐकून माधव म्हणाला,

" तुला घटस्फोट नको आहे हे योग्य आहे. कारण घटस्फोटीत स्त्रीयांकडे बघण्याचा दृष्टीकोन लोकांचा चांगला नसतो.!"

“ त्यापेक्षा माझी मुलगी जवळ हवी म्हणून हे सगळं सहन करते आहे. सर लवकरच माझ्या बदलीची ऑर्डर येणार आहे, तुम्ही मला ह्याच भागात बदली मिळावी म्हणून प्रयत्न करू शकता का?”

त्यांनी विनंती करताच मुंबईत शिक्षण खात्याकडे फोन लावला.

“ सुधाकर मी माधव बोलतोय!”

“ बोला साहेब. काय सेवा करू आपली?”

“ मी सद्या राहतो त्याठिकाणी एक प्राथमिक शिक्षीका आहेत त्यांची बदली रत्नागिरीतच व्हावी अन्यत्र नाही!”

“ अरे व्वा! झकास!” पलिकडील अधिकारी म्हणाला तेव्हा माधव चिडून म्हणाला,

“ येड्या शुद्धीवर आहेस ना?”

“जरा चेष्टा केली रे. बरं झालं तुझं काम असं समज!”

“ मुंबईत आल्यावर भेटू!” म्हणत फोन कट केला. बाईंना इतका आनंद झाला की माधवला मिठी मारावी असं क्षणभर वाटलं होतं!पण सावरून म्हटलं,

“ थांबा शिरा करते!”. ००

अर्ध्या तासात बाईंनी शिऱ्याच्या दोन डीश भरून आणल्या. माधवने चांगला ताव मारत शिरा संपवला व उरलेले कण वेचून जीभेवर ठेवले. बाईंनी म्हटलं,

“ तुम्ही वेडे आहात!” माधव हसला .

“ वेडेपणातही एक वेगळा आनंद असतो.!”

“ रात्रीच्या जेवणात काय करू?”

“ मला काय आवडते ते!” माधव म्हणाला.

“ ते मला कसं कळणार?”

“ मला तुझ्या हातची पुरणपोळी खायला आवडेल!” माधव म्हणाला. ते ऐकून बाईनी मान खाली घातली.

“ सॉरी. काही चुकलं का?”

“ नाही. माझ्या लेकीला पुरणपोळी आवडते. तिची भेट झाल्यानंतर मी पुरणपोळी करणार असं ठरवलं होतं; पण “

“.. तेच योग्य आहे. आपल्या मुलांना, किंवा आवडत्या माणसांना हवं ते खाऊ घालण्यात जो आनंद असतो तो इतरत्र नसतो!”

“ तुमची बायको छान पुरणपोळ्या करते वाटत!”

“ नाही तिला थोड्याफार जमतात!”

“ दुसरं काही तरी सांगा. मला आज आनंद होत आहे.

“ तर मग रात्री काहीतरी झणझणीत करा बाईनू!”

“ अहो पुरे!”

“ हां हां हां हां!”. दोघं शिरा खाऊन उठणार तोच टीव्हीवर निवेदन करणारी सुंदरी म्हणाली, आता एक मन हेलावून टाकणारी बातमी. असं म्हणत ती पुढे म्हणाली,

“ परदेशात एका घरात एक श्रीमंत व्यक्ती राहत आहे. त्याच्या आसपास मृत्यूचं तांडव सुरू आहे,यात आपलीही सुटका नाही हे ओळखून त्या गृहस्थाने आपल्याकडील पैसे एका मोठ्या पिशवित भरून रात्री रस्त्यावर आणून टाकले. सकाळी सफाई कामगार येईल त्याला ती पिशवी म्हणजे पैसे मिळोत व तो त्याचे कुटुंबीय सुखी व्हावेत असे त्याचे उदात्त विचार होते.

सकाळी त्या रस्त्यावर सफाई कर्मचारी आला व त्याने ती पिशवी उघडून पाहिलं तर आता करोडो रुपये. ते पाहून त्यांच्यातील सहृदयता जागी झाली,त्यांचे डोळे पाणावले. वाटलं कोणीचीतरी अखेर जवळ आली असावी अशावेळी त्याने रस्त्यावर सोडलेले धन आपण घेणे उचित नाही म्हणून त्या कर्मचाऱ्याने पोलीसांना फोन करून बातमी दिली, पोलीस आले त्यांनी ती पैसे भरलेली पिशवी उचलून सरकार जमा केली. बघा माणुसकी आणि कर्तव्यता यांचं एक उदाहरण!” ही बातमी ऐकून दोघं सुन्न होऊन एकमेकाकडे बघतच राहिले. ००

संध्याकाळी फेरी मारून आल्यावर पुन्हा बातम्या लावल्या. निवेदिका सांगत होती.

“आता एक हृदय हेलावून टाकणारी बातमी. असं म्हणताच बातमी फ्लॅश झाली. ” आता पहा एक नर्स बाई आठवड्यानंतर घरी परतली आहे तिला इमारतीत प्रवेश द्यायला कोणी तयार नाही. आठ दिवस ती हॉस्पिटलमध्ये जीवाची पर्वा न करता कोरोना पेशंटची सेवा करून घरी परतली आहे तरी ती नर्सबाई आगतिक होऊन गेटवर घाम पुसत बसली आहे व तिचा नवरा व एक मुलगी आईला कडकडून मिठी मारायला उत्सुक आहे. नर्स बाई पर्स मधून सॅनिटायझर काढून हातापायावर मारत आहे, डोळे भरून वाहत आहेत, शेजारी बारीतून वाकून बघत आहेत. इतक्यात एका ज्येष्ठ व्यक्तीने नर्स बाईंना घरी सोडा म्हणून सांगताच तिला आत सोडताच बिल्डिंगमधील मुलं जीन्यावर सॅनिटायझर मारत आहेत.!” हे दृश्य पाहून बाईंचे डोळे पाणावले. माधव शांत होता. इक्यात दुसरी बातमी झळकली

“ रस्त्यावर अनिर्बंध फिरणाऱ्या लोकांना आवरताना कोरोना बाधीत झालेल्या एका हवालदाराचा मृत्यू “ ही बातमी बघयाच बाईंनी टीव्ही बंद केला. माधव म्हणाला,

“ आजच्या दिवशी इतकं पुरे अजून काही दिवसांसाठी थोडे अश्रू राखून ठेवायला हवेत!” असं म्हणत त्याने आपले डोळे पुसले. बाईनी मनात म्हटलं,

“आहे. वरवर कठोर वाटणाऱ्या ह्या माणसाच्या मनात सहृदयता जिवंत आहे!”. ००

रात्री जेवणात भरलेली अंडी आणि तिखट वरण दिसलं ते पाहून" व्वा झकास!"

असं म्हणत एक घास तोंडात घेतला. चांगलाच झटका बसला तरीही जरा कोरड्या चपातीचा घास खाऊन सुरुवात केली. त्यावेळी माधलचे शब्द अडखळत येऊ लागले आहेत हे ओळखून बाईंनी ओळखलं, संध्याकाळी फेरी मारताना हा प्रताप केला असावा,

" सर संध्याकाळी कोणाला भेटायला गेला होता?"

"म.. मी???...हं आठवलं मावळत्या सूर्याला भेटायला गेलो होतो...छान आहे. जरा वरच्या टेपावर गेलं की भेटतो. दररोज तो सप्तरंगी पंख पसरून घरी परतत असे. आज तो थकलेला दिसला तरीही त्याचा निरोप समारंभ रानपाखरानी गाणी गाऊन केला तो कार्यक्रम बघण्यासारखा होता. उगवत्या सूर्याला सगळेच नमस्कार करतात मी मावळत्या .. सूर्याला नमस्कार करून आलो.. पण तू जेवायला बस, मी एकटा एकटा..."

"बसते!" एकूण रागरंग पाहून बाईंनी आपलं ताट वाढून घेतलं. माधव पाणी पीत पीत जेवून उठला व हात धुवून बाहेरच्या खुर्चीवर जाऊन बसला. " आज ह्यांनी नक्कीच घेतली आहे!" बाईंनी स्वतःशी म्हटलं. थोड्या वेळाने बाई काम आटोपून बाहेर आल्या बघतात तर माधव चटईवर उशी ठेवून पसरला असून जवळ मोबाईल आहे. इतक्यात मोबाईलची रिंग वाजली. तो मोबाईल इचलून म्हणाला,

“ हो हो मी आता झोपलो.. हो जेवण छान होतं थोडं झणझणीत होतं वाटतं.. हो देतो.

असं म्हणत त्याने पडल्या पडल्या अंजलीला हाक मारली अंजली.. फोन घे...

अंजली लगेच उठून जवळ गेली मोबाईल घेतला. त्यांची मुलगी होती...मधुरा बोल.

“जेवले तुझे बाबा.. आज ना? हो.. काही तरी पिऊन आलेत; पण मला थांग लागू देत नाहीत. खूप चलाख आहेत.. मला कळू देत नाहीत. बरं . ठेवते.!” बाई तोच मोबाईल आपल्या हातात घेवून घरात. गेल्या. टीव्हीवरील बातमीत दारुसाठी दुकानावर लांब लांब रांगा लागलेल्या दिसत होत्या. हे पाहून माणसं किती चिंताग्रस्त आहेत याची जाणीव झाली. साहेब याच कारणामुळे पिऊन आला आहे, हा कितीही आव आणत असला तरी घरची आठवण येणारच.

. तो जोपर्यंत सरळपणे वागत आहे तोपर्यंत ठीक नंतर बघू. असं म्हणत त्यांनी स्वतःचं समाधान करून घेतलं.

बाहेर आडवा पसरलेला माधवला काही वेळाने गाणी आठवू लागली. “ दिवस तुझे हे फुलायचे..... झोपाळ्यावाचून .. माझ्या ह्या घराच्या पाशी थांब तू.... अंजली अंजली...झोपली वाटतं. झोपूदे. झोप निवांतपणे अं.... सो जा राजकुमारी..... सो जा.!”

त्यांचं हे अर्धवट शुद्धी तील गाणं गाता आपली आठवण आली हे पाहून बाई खुदकन हसल्या. हा माणूस.. नको सारखं नको. भला माणूस आहे. सर

म्हणायला हवं. असं बोलून पुढे ऐकत राहिली. राजकुमारी कुणाला म्हटलं? मला? म्हणजे? बापरे…

“ आssssss प्रिये पहा…रात्रीचा समय सरून…रात्र सरली असेल का? चंद्र.. तोच चंद्रमा नभात.. तीच च सांग कधी कळणार तुला.. …तू कुठे आहेस? न सांगता मला गेलीस…. जाताना.. निरोप तरी. घ्यायचा.. . निरोप माझा सांगा रे.. रे. रे नाही नाही… सांगा हो विठ्ठला….

माधवची ही बडबड ऐकून बाईंच्या मनात शंका येत होती,सर खरोखरच नशेत आहेत की नाटक करून मला काही सुचवत आहेत. नको नको असे विचार मनात यायला नकोत.. पण काय सांगावं पुरुषांच्या मनात कधी काय येईल सांगता येत नाही!” असं म्हणत त्यानी उठून दार बंद आहे का नाही याची खात्री करून घेतली व अंथरुणावर पाठ टेकवली.

रात्री कधीतरी बाहेरील संशयास्पद आवाज कानावर पडला. बाई खाडकन जाग्या झाल्या. घड्याळात पाहिलं अडीच वाजत होते, त्यांनी गडबडीत दार उघडून अंगणात नजर टाकली तर, अंगणातील दिवा पेटत होता व माधव ठार झोपेत होता.

त्यांनी त्याला हलवुन जागे करत म्हटलं,

“ सर उठा मध्यरात्र उलटून गेली.!” माधवला जाग येत नाही हे पाहिल्यावर पुन्हा हलवून हलवून जागे करत म्हटलं,

“ सर उठा उठा मध्यरात्र उलटून गेली,उठा!” असं दोन तीन वेळा जागवल्यावर तो डोळे चोळत उठला,

“ शकुंतला शकू.. ककाय झालं?”

“ अहो मी तुमची बायको नाही. अंजली अंजली!”माधवला थोडी जाग आली,

“ काय झालं? मला झोपू दे!”

“ घरात झोपा. बाहेर बिबट्या फेरी मारताना दिसला!” बाईंनी खोटं सांगितलं तेव्हा तो आळस देत उठून उभा राहिला व आपल्या पडवीत गेला. बाईनी कपाळावर हात मारत चटई व उशी उचलून पडवीत टाकून पसरली तेव्हा माधवला पूर्ण जाग आली. तो हसला. व पुढे होऊन बाईंचे हात हातात घेतले. त्याबरोबर बाईंच्या अंगावर भीतीने काटा उभा राहिला, त्यांना हात सोडवण्याचं सुचलं नाही. आगतिकपणे जणू संकटाला सामोरे जावं तसं डोळे मिटून उभ्या होत्या. इकडे माधवने आपला एक हात सोडवून बाईंचे हात थोपटत म्हटलं,

“ थॅन्क्स अंजली.. जा आता निवांत झोप!” असं म्हणत तो पुन्हा आडवा झाला. बाईंना हुंदका फुटला. त्या पळतच आपल्या खोलीत आल्या व अश्रूना वाट मोकळी करून दिली. मनात विचार आले,देवाने कसा घडवला ह्या माणसाला? किती सज्जन किती सौजन्यशील दयाळू कठोर तरी मनमिळावू प्रेमळ. इतकं जवळ येऊनही त्याने आपला तोल ढळू दिला नाही. त्याने नशेत काही भलता प्रकार केला असता तर मीच वेडी ठरले असते माझ्या मनात अचानक असे का विचार यावेत? मला यांच्या सहवासाची भूक लागली आहे

का? नवरा असा की त्याला माझी किंमत फक्त पगार मिळवणारी बायको इतकीच आहे. खरंच अशा माणसावर आयुष्य उधळून दिलं तरी कुणाचंही भलं होईल!" बाई डोळे पुसत कितीतरी वेळ स्वतःला समजावत बसल्या होत्या. ००

सकाळी उठल्यावर बाईंनी विचारलं,

"सर रात्री घेतली होती का?"

" थोडीशी घेतली होती. मी खोटं बोलत नाही. आमच्या खात्यात उडवाउडवीची उत्तरे द्यावी लागतात, मी घरी आल्यावर खरं बोलतो. खरं बोलायची सवय टिकून राहायला हवी नाही तर, काही दिवसांनी खरं हेच खोटं वाटत राहील!"

"तुम्ही खरं मराठीचे प्राध्यापक व्हायला हवे होते ठीक आहे ;पण नशेत सगळ्यांना गायक कसेआठवतात?"

" तो माझा छंद आहे असं समजा!"

दहा वाजता नीलम आली व आपल्या कामाला लागली. सहज तिला विचारलं,

" नीलम तुला वडे करता येतात?"

वडे म्हटल्यावर नीलम गांगरली,म्हणाली,

" कसले वडे ? बटाटे वडे?"

“ नाही गं आपले कोकणी कोंबडी वडे!”

“ मला चांगले जमत नाही,आई बनवते!”

“ झकास! पुढील रविवारी कोंबडी वडे!” माधव उद्गारला . ते ऐकून बाईंनी हसत म्हटलं,

“म्हणजे पुढच्या रविवारी चुकत्या शब्द सुरांचे पुन्हा संगीत संमेलन भरणार!”

“ हां हां हां “ माधव गडगडाटी हसला .

दुपारी वातावरण जरा बिघडलं. निरभ्र आकाशात एक पांढूरका ढग दिसून आला. बाई म्हणाल्या,

“ यंदा पावसाळा लवकर सुरू होतोय का?”

“ नको पावसाची आठवण काढू नकोस आपली शाळा बंद पडेल!”

“ सर पाऊस सुरू होईपर्यंत कोरोना जाईलसुद्धा!”

“ तुझ्या तोंडात साखर पडो किंवा श्रीखंड पडो!” माधव उद्गारला.

“ असं बोलायला बरं असतं. शिवाय कोरोनाचे थेंब पाण्याने लगेच विरघळून जातात,त्याचा फायदा होईल व कोरोना हद्दपार होईल!”

“ खरंच असं लवकर होईल का?”

“बघू!” दोघं विचारमग्न झाली होती तोच बातमी कळली की वाडीतील एका वृद्ध व्यक्तींला कोरोना झाला असून त्याला रत्नागिरीला घेऊन गेले आहेत. झालं त्याचं क्षणी वाडीतील घरांचे दरवाजे बंद झाले आणि शाळाही बंद पडली. हे दोघं निराश झाले. दुसऱ्या ते वृद्ध गृहस्थ गेले. ही बातमी ऐकून बाजार बंद पडला. ००

कोरोना लवकर जावा म्हणून जगभरातील सगळे शास्त्रक्ष रात्रीचा दिवस करत होते. कोणीतरी एक बातमी पसरवली या रोगांवर प्रतिबंधक म्हणून होमिओपॅथीच्या गोळया वापरून धैर्य वाढवा. या आजाराचा प्रतिबंध करायचा आसेल तर ह्या गोळया घ्याव्या. लगेच गोळया वाटत सुरू झालं. विभागातील राजकीय पक्षाचे लोक मोफत गोळया वाटत करू लागले. लोकांनी आवडीने गोळया घेणे सुरू केलं.

माधव मोबाईल हातात घेऊन कुणाला फोन करावा? या विचारात असताना सुयशचा फोन आला,

“ पप्पा काय करताय?”

“ बसलोय शांतपणे,आई कशी आहे?’

“ आताच ताईचं आणि तिचं भांडण झालं!” सुयश ने बातमी दिली.

“ कशावरून झालं भांडण?”

“ आईची कंबर दुखत होती म्हणून सकाळी पाणी भरायला ताईला सांगितलं. ती जरा कंटाळून उठली यावरून अगदी राडा झाला!” माधव ऐकून हसत होता,इतक्यात काय सांगतो रे पप्पाना? असा मधुराच्या प्रश्न कानावर पडला तोच सुयवने विषय बदलला. ,

“ पप्पा मी आता अभ्यासाला बसतोय ठेवतो!” म्हणत फोन ठेवला. बाई जवळून ऐकत होत्या. त्या हसत म्हणाल्या,

“विषय पालटण्यात हुशार दिसतो!”

“ अगदी बरोबर. बहुतेक तो मंत्री होईल!” माधव हसत म्हणाला यावर दोघं हसत सुटले. इतक्यात पुन्हा फोन. फोनवर शकुंतला,

“ बोल काय झालं?” माधवने विचारलं.

“ नाही लॉकडाऊन लवकर उठेल असं वाटत नाही तेव्हा तुम्ही काही तरी करून मुंबईत या किंवा आपल्या गावी जा. किती दिवस त्या बाईंना त्रास देणार?”

“ बरोबर आहे ;पण.. एक मिनिट .. मॅडम इकडे या बोला आमच्या कुटुंबाशी… असं म्हणताच बाईंनी मोबाईल हातात घेतला,

“ हां बोला बाई कशा आहात? मी ठीक आहे.. त्रास?कसला त्रास उलट एकट्या माणसाचा स्वयंपाक करणं त्रासाचं वाटतं… आणि सरांनी झाडू मारणे लादी कपडे वगैरेसाठी एक मुलगी ठेवली आहे तेव्हा मला काहीच त्रास नाही.

ती मुलगी जेवण सुद्धा करते... हो हो. बरं छठीक आहे काळजी करू नका!" असं म्हणत बाईंनी फोन ठेवला तेव्हा गालात हसत माधव म्हणाला,

"नेहमी खरे बोलावे!" हे सुभाषित शाळेच्या भिंतीवर लिहिले नसावे!"

" हंहंहंहंहं. अहो खऱ्याची दुनिया नाही म्हणतात ते काय उगीच!"

शांत निवांत बसणे ही सुद्धा एक प्रकारची शिक्षा असते याचा अनुभव दोघांना येत होता. त्या शांततेचा भंग करत बाई म्हणाल्या,

" सर तुम्हाला तुमच्या गावी जायचं असेल तर जा. माझा विचार करू नका. माझा नवरा व त्याचा स्वभाव विचारात घेतला तर बहुतेक मी निवृत्त होईपर्यंत एकटीच राहाणारे आहे!" बाईंच्या शब्दात वेदना जाणवत होती,पापण्यांची उघडझाप करता करता त्यांचे डोळे पाणावले. माधवला दया आली व म्हणाला,

"असं का वाटतं तुला?"

" का ? ह्या प्रश्नाचे उत्तर नाही देता येत बाईचं दुःख बाईच ओळखते!"

"कळलं उत्तर. 'दार नेम इज वुमन 'असा हा प्रकार असावा. मी कधींही बायको आणि मुलांना सोडून इतके दिवस घराबाहेर राहिलो नव्हतो. आताही मुंबईला जाऊ शकतो हे मागे म्हटलं होतं, तेच आता पुन्हा बोलतो. माझी आठ वर्षे बाकी आहेत ती पूर्ण होताच किंवा मध्येच व्हॉलिंटरी निवृत्ती घेईन. माझ्या मॉनिटरवर सतत कोटीं कोटींचे मिलियनचे आकडे खेळत असतात. या खात्यात आल्यापासून झोपेतही मला सामान्य स्वप्न पडत नाही, कुठे फिरायला गेलो आहे, मौज करतो आहे किंवा एखादी परी येऊन माझ्यावर जादू करून ढगांवर

बसवून फिरवत आहे, मित्र मंडळीबरोबर पिकनिकला फिरत आहे,असं स्वप्न पडत नाही!"

" परी म्हणजे कोण ती अंजली का?"

" ते महत्वाचं नाही.

" बरं मग तुम्ही बदली करून का घेतली नाही?"

" बदली होत होत या खात्यात आलो इथूनच माझी निवृत्ती होणार आहे; पण आताच कंटाळलो आहे म्हणून मी निसर्गाच्या सान्निध्यात तुझ्या हातचं चवदार जेवण खात दिवस काढत आहे. एक शिकवणी भेटली होती, चार पैसे भेटले असते तीही कोरोनाने घालवले आता तोंडाची चवच गेली.!"

"कळलं बरं का,आज कांदाभजी खावीशी वाटत आहे. करते!" असं म्हणत बाई घरात गेल्या. काही वेळाने कांदाभजी आणि पाणी घेऊन बाई बाहेर आल्या.

"कांदाभजी खाल्ल्यावर पाणी प्यायचं नसतं!"

" का,? पाणी का पिऊ नये!"

" कांदाभजीची चव शेवटपर्यंत जीभेवर रेंगाळत राहायला हवी!"

"हो का? मग आता सांगा माझ्या हातचे कांदाभजी आणि तुमच्या बायकोच्या हातचे ह्यात कोणाच्या हातचे खमंग असतात?"

"हा प्रश्न म्हणजे लग्नात बायकोसमोर मेहुणीने विचारावं मी सुंदर आहे की ताई? तसा आहे!"

“ हंहंहंहंहं एक नंबर चलाख आहात. जनतेचे प्रश्न कसे उडवून लावायचे हे बरोबर कळतं!” बाई हसत म्हणाल्या. ००

दुपारी पोलीस पाटील येऊन म्हणाला,

“ साहेब परवा एक पेशंट गेला त्याच्या प्रेताची विल्हेवाट पोलीसांनी केली. त्याचा मुलगा मुंबईत अडकलेला मुलगा आता त्याच्या कार्याला गावी येत आहे;पण येण्याचा पास मिळत नाही. तुम्ही काय मदत करु शकता?”

“ याबाबत तुम्हाला मी काहीच मदत करू शकत नाही. तुम्ही नाकाबंदीवर असलेल्या पोलीसांना सांगून बघा तेच मदत करू शकतात!”

माधवचा सल्ला पाटलाला पटला. तो निघून जाताच वाडीतील एक महिला बाईंना भेटायला आली व लांबूनच बाईंना म्हटलं,

“ बाईनु पोरीचा अभ्यास चांगला चालू झाला व्हता आता शिकवनी बंद झाली. तर काय करावं?”

माधवने लगेच डोकं चालवून म्हटलं,

“ ताई तुम्ही तुमच्या मुलीला ज्या अडचणी येत आहेत त्या मोबाईलवर लिहून पाठवायला सांगा, आम्ही समजावून देऊ!”

“ व्हय सायबानु ब्हाय सांगतो पन तसं काय लिवन पाठवता येतं? तरी पन तिला. लय उपकार झाले हो!”

“ ते तिला माहित आहे आणि अहो कसले उपकार? आम्हाला वेळ जात नव्हता आता सोय झाली. लगेच इतर मुलांना सांगा आम्ही ऑनलाईन शाळा चालवू!” हा सल्ला ऐकून बाईंना ऑनलाईनचा अर्थ कळलाच नाही; पण काही तरी सोय होत आहे याचा आनंद झाला. बाई म्हणाल्या,

“ घ्या आता ऑनलाईन वर्ग हाताला काम हवं होतं ना? भेटलं!”

“ हो आता चार पैसे भेटतील, दोन दिवसांनी रविवार आहे!”माधव बाईंकडे कटाक्ष टाकून म्हणाला, त्यांनी ओळखलं म्हणाल्या,

“ नको, तुम्ही बाजारात जायचं नाही.!”

“ बरं नाही जाणार ;पण आल्यापासून खाली मेन रोडवर फेरी मारून तरी येतो. रस्त्यावर काय काय चालू आहे एकदा बघून यायला हवं!” असं म्हणत तो उठला इतक्यात मुबाईहून फोन आला. शकुंतला फोनवर होती,

“ हं बोल…मी फोन करणारच होतो..!”

“ मग केला का नाही?” तिने चिडून म्हटलं .

“ राहू दे!” असं म्हणत तिने फोन कट केला. बाईंनी ओळखलं, म्हणाल्या,

“ सर तुमच्या मिसेसच्या मनात शंका निर्माण होत असावी किंवा तुमची आठवण येत असावी. माझाही नवरा फोन वर हेच करत असतो!”

“ खरंच अंजली एरवी नि:शंक माणसं एक स्त्री आणि एक पुरुष एकत्र आले, एकत्र फिरताना दिसले की त्यांच्याकडे संशयाने पाहात असतात. मुंबईचं राहुदे,ह्या गावातील लोकांना आपल्याबद्दल काय वाटत असेल असं तुला वाटतं?” माधवच्या प्रश्नावर बाईंनी मान खाली घालून म्हटलं,

“ सर तुम्ही हल्ली मला एकेरी नावाने हाक मारत असता याची चर्चा होतेय असं माझ्या कानावर आलं आहे!”

“ हे त्यांना कसं कळलं?”

“ ते महत्त्वाचे नाही!”

“असं आहे तर मला इथून निघायला हवं!” माधव विचार करत म्हणाला,

“ त्यापेक्षा पहिल्यासारखं मॅडम म्हणावं!”

“ याचा अर्थ मी इथून जावं असं तुला वाटत नाही!”

“ तुमच्या निघण्याची तयारी करा.!” असं म्हणत बाईंनी डोळे पुसले. नतर एक मिनीट थांबून म्हटलं,

“ तुमच्या जाण्याची मला भीती वाटत नाही कधीतरी जाणारच ;पण जाणार असाल तर मी आधी पाटलांच्या घरात एक पडवी रिकामी आहे, तिकडे राहायला गेल्यावर जा किंवा या घरचे काका काकू आल्यावर जा. इथे मी दिवसा राहिन पण रात्री एकटी राहणं कठीण आहे. तुम्ही इथे यायच्या आधी दहाबारा दिवस मी एका वयस्कर काकूंना रात्री सोबतीला घेत होते. या घरचे काका काकू लग्न समारंभ झाल्यावर येणार होते ते तिकडे मुंबईत अडकले. तुम्ही इथे राहायला आलात म्हणून त्या काकू येत नाहीत. तरी तुम्ही जाऊ शकता. माझं काय राहिन एकटी!”

“ हंहंहंहंहं म्हणजेच की मी इथून जाऊ नये!” असं म्हणत त्याने खाली फरशीवर बसून पाय पसरले. तोच पाटलांचा फोन आला,

“ माधव सर गावात बिबट्या पिसाळला आहे,दरवाजा बंद करा. आम्ही फॉरेस्टला कळवले आहे तरी काळजी घ्यावी” हा निरोप ऐकून. माधव उठून बसला. बाईनी विचारलं,

“ काय झालं? एकदम उठतात?”

“ पाटलांचा फोन होता गावात बिबट्या पिसाळला आहे!”

“ बाई…आता काय?”

“ पाठीमागचे दरवाजे बंद कर!”

“ तुम्ही करून या मला भीती वाटतेय!” माधव उठला व दोन्ही दरवाजे बंद करून आला. थोड्या वेळाने एक जाडजूड काठी हातात घेऊन अंगणात बसला. बाईनी म्हटलं,

“ सर आताशा तिन्हीसांजा होत आहेत रात्र सुरु झाली नाही. बरं तुम्ही हातात काठी घेऊन बिबट्याचा बंदोबस्त कराल असं वाटतं का?”

“ मी बिबट्याला घाबरत नाही हे दाखवण्यासाठी हाती काठी घेतली आहे,!”

“त्यापेक्षा तो दिसला की त्याला तुमचं आयडी कार्ड दाखवून पळवून लावा!”

“ हां हां हां. बघा कंटाळा आला की माणूस फालतू गोष्टींवर वेळ वाया घालवतो!”

“फालतू बरं काहीही बोला मला ऐकून घेणं भाग आहे!”

“ मॅडम चुकतात तुम्ही. विज्ञानाने की अभ्यासकाने कुणीतरी एकाने अभ्यास करून सिद्ध केले आहे की,दिवसभर रहाटगाडग्यात व्यस्त असणाऱ्यांनी काही वेळ आपला नित्यक्रम दृष्टीआड करून फालतू गप्पा गोष्टी करत बसावं!”

““काय म्हणता? हे खरं आहे?”बाईंचा विश्वास बसला नाही.

“ नक्कीच असणार. आपण फालतू गोष्टी बोलत असतो किंवा हास्यविनोद करत बसतो. ते हसणं त्या हसण्यातला मोकळेपणा आपल्या मेंदूला ऊर्जा पुरविण्याचे काम करतो त्यामुळे आपला मेंदू टवटवीत राहतो. फालतूपणातली एक आनंद असतो त्याची गोष्ट सांगतो...”

“ थांबा आपण रात्री बोलू आता मला स्वयंपाक करू दे!” माधवला मध्येच थांबवून बाई उठून घरात गेल्या.

रात्री जेवणानंतर गोष्ट राहून गेली. रात्री जेवण झाल्यानंतर माधव व बाई अंगणात बसून होते . इतक्यात गावातील चार सहा जण बॅटरीचा उजेड सगळीकडे टाकत आले व माधवला म्हणाले,

“ साहेब घरात जाऊन व दारे खिडक्या लावून बसा आम्ही रात्रभर जागरण करणार आहोत!”

“ कशाला जागरण?”

“ अहो तो काळ्या पिसाळला आहे, सरपंच अण्णांनी फारेस्ट खात्याला कळवलं आहे!”

“ मग जागरण कशाला करताय?”

“ अहो मानसं घाबरलीत तेवढा जरा आधार!” एक जण म्हणाला तेव्हा त्याचा सोबत्याने काहीतरी कानात सांगीतले ते ऐकून पहिला म्हणाला,

“ साहेब अंगावर आला तर गोळी घालून पळवला तर चालेल का?” ह्या प्रश्नावर माधव हसत म्हणाला,

“अहो गोळी घातल्यावर तो पळणार कसा? मरणारच ना तो!”

“ नाय पन जरा धाक दाखवला तर?”

“ कधी वाघ मारला आहे का?”

“ नाय हो तेवढी डेरींग नाय झाली!”

“ मग आता तुम्ही घाबरवण्यासाठी गोळी घातली तर तो घाबरून जाईल असं कशावरूनं? उलट रागाने तुमच्यावर झेप घेतली तर ?” ह्या प्रश्नावर सगळे गप्प उभे राहिले.

“ व्है रं वसंत खरंच उलट परकार झाला तर?”

“ हां हेच मी म्हणतोय. शिवाय चुकून गोळी लागलीच तर, म्हणजे पिसाळलेल्या वाघ किंवा सिंहावर बार टाकायला एल जी काडतूस लागतं हे माहीत आहे ना?”

“ व्है ते म्हायती हाय पन तुम्ही आम्हाला सांभाळून घ्या!”

“ माझी नोकरी जाईल असं झालं तर!”

“ अरे बापरे. मग नको रे आपन रातभर फिरत राहू. सकाली फारेस्टवाले येतीलच!”

“ बरोबर आहे चला आता गस्त घालत रहा!”

दोघेही आपापल्या घरात झोपी गेले. मध्यरात्री अंगणात काही तरी संशयास्पद गुरगुरणं कानावर पडताच भीने आधीच घाबरलेल्या बाईंनी आपल्या मोबाईलवर माधवला फोन केला. तो अर्धवट जागा झाला,

“कोण आहे? ही काय फोन करायची वेळ आहे का?” त्याने चिडून म्हटलं. तेव्हा,

“ मी अंजली बोलतेय जागे व्हा, बाहेर काही तरी चाहूल लागली आहे व घाण वासही सुटला आहे!” हे ऐकून माधव उठून बसला. लाईट चालू करून बाहेर पडवीत आला. पदवीचं दार बंद होतं. दार उघडावं काय? असा विचार करत असताना बाई आल्या. म्हणाल्या,

“ दार उघडू नका . इथून बघा!” असं म्हणत त्यांनी आपल्याकडील बॅटरी पुढे केली. एव्हाना गुरगुरणं बिबट्याचं आहे याचा अंदाज आला. त्यानी आधी नजर टाकली. अंधारात काही दिसणार नाही म्हणून पटकन बॅटरीचा झोत बाहेर आंब्याखाली टाकला तर एक बिबट्या आंब्याच्या फांदीवर बसलेल्या माकडाला घाबरवून टाकत हे एका क्षणात ओळखलं. ते पाहून बाईंनी किंकाळी

फोडली. तो बिबट्या बॅटरीचा उजेड पाडून एका झेपेत अंधारात गडप झाला. माधव म्हणाला,

“ काय तू पण, जरा धीटपणे उभी राहिली असतीस तर आपण व्हिडिओ काढला असता,!” यावर बाई थरथरत म्हणाल्या,

“ मला भीती वाटतेय आणि तुम्हाला व्हिडिओ आठवतोय. त्याने चिडून आपल्यावर उडी टाकली असती तर व्हिडिओ कोण काढणार होतं?तुम्ही का मी? आता माझ्या घरात बाहेरच्या बाजूला झोपा मी कीचनमध्ये झोपेन!” तिचं बोलणं ऐकून माधव तिच्याकडे बघतच राहिला. अखेर आपलं अंथरूण घेऊन बाईंच्या घरात आडवा झाला. आडवा झाला खरा;पण मनात विचार खळबळत राहिले.

बाईंची झोप उडाली. मध्येच उठून उभं राहावं पुन्हा झोपावं, मनात ना ना शंका येत होत्या. अखेर हळूच दार उघडून पाहिलं तर माधव शांतपणे झोपी गेला होता. आपल्या शंकेची बाईंना लाज वाटू लागली होती. ००

सकाळी कळलं की बिबट्याला फॉरेस्ट खात्याने सापळा लावून पकडले व मुंबईतील राणीच्या बागेत नेऊन सोडले. सगळया ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

लोकांची शेतीची कामे सुरू झाली. भाजावी झाल्या होत्या. गावात आलेले चाकरमानी एकवीस दिवसांवरून चौदा दिवस अलग राहीलेले मुक्त

होऊन शेतावर जाऊ लागले होते. एरवी शेतीसाठी येण्याची आवड असुनही येता येत नव्हते ते सगळे शेतावर हजर झाले. बाबट्याला विसरून गेले.

बाई विसरल्या नव्हत्या. सकाळी चहा पीत असताना बाईंना विचारलं,

“ तुम्ही कधी वाघ मारला होता?,

“माझ्या घरी बंदूक होती व आजही आहे ;पण मी कधीच शिकार केली नाही. वडील शिकारी होते. ते म्हणायचे ‘ शिकारीचा नाद चांगला नाही, म्हणून तू बंदूक हातातही घेऊ नकोस. मी वडीलांची आज्ञा पाळली.!”

“ मग तुम्हाला वाघाच्या तोंडाचा घाणेरडा वास येतो हे कसं ठाऊक,?”

“ मांस भक्षक सर्व प्रकारच्या प्राणी ससा,भेकर,हरण वगैरे प्राणी मारून खातात, खाऊन झाल्यावर ते पाणी जीभेने पितात त्यामुळे त्यांच्या तोंडात मांसाचा वास चिकटून राहतोच. हा वास वाघ आसपास असला तरी रानातील गुरे व गुराखी एका क्षणात ओळखून पळत सुटतात यांचे हे अनुभव आहेत!”
○○

त्या दुपारी वातावरण बिघडलं, तापमान वाढायला सुरुवात झाली होती, आकाशात भरभर काळे ढग जमा झाले. आज पाऊस पडणार असं वाटत असताना एकदम लख्खन वीज चमकली, दुसऱ्या क्षणी “ थाड “ असा

कडकडाटात झाला,बाई दचकल्या. फांदीवरील पाखरे फडफड करत दूर निघून गेली. बाईंनी हसत म्हटलं,

“ सर तुमची मित्र मंडळी उडून गेली. माधव ते दृश्य पाहून स्वप्नात हरवला होता. संध्याकाळी बातमी झळकली आणि पुण्यातील एका संस्थेने कोरोना प्रतिबंधक लस शोधून काढली. बातमी ऐकून सगळीकडे आनंदी वातावरण तयार झालं. पुढे काही दिवसांनी गावात अडकून पडलेल्या चाकरमानी लोकांना वैद्यकीय तपासणी करून दाखला काढून मुंबईत येण्याची परवानगी दिली. सगळे चाकरमानी खूष झाले,माधवही खूष झाला फक्त बाईंचा चेहरा पडला,माधव एकचित्त होऊन त्यांच्याकडे बघत राहिला. काहीतरी विचार करत त्याने आपल्या मित्राला विनायकला फोन लावून विचारलं तेव्हां तो बातमी खरी असून मी ही आईबाबांना चार पाच दिवसात गावी पाठवित आहे हे सांगितलं. त्याने बाईंना म्हटलं.

“अंजली माझा वनवास संपला. आता मला माझ्या घरी जावं लागणार आहे.!”

बाईंनी डोळे पुसत विचारले.

“कधी निघणार आहात?”

“ विनायक चे आईवडील गावी येणार आहेत ते आल्यावर मी निघेन!” माधव उत्तरला. बाई घरात वळून गेल्या. माधव पावसाच्या रिमझिम धारात गहिंवरलेल्या मनाला मुक्तपणे सोडून दिलं. ००

त्यांच रात्री अचानक पंखा चालू असतानाही गरमा वाढला,आज पाऊस कोसळणार असं वाटल्याने माधवने एकमेव बारी उघडून ठेवली. काही मिनिटात कौलांवर तडतड आवाज आला. “ आला वाटतं पाऊस” म्हणत माधव उठला लाईट चालू करून पडवीत बसला इतक्यात पुन्हा तडतडतड झाली. ये बाबा लवकर ये’ येताना थंडावा घेऊन ये’ तो एकटाच बोलत होता. तोच बाहेरून ओल्या मातीचा गंध उधळला. आ.. ह . माधवने तो अवर्णनीय मृद्गंध श्वासात भरून घेतला . पुन्हा मनाने आपला आनंद आ…ह,ची दाद देऊन व्यक्त केला.

“ इतके दिवस तू सुगंधा
कुठे असतोस लपून
पाऊस सुरू झाल्यावरच
तू का येतोस उधळत
आसमंतात उधळत
आधी का येत नाहीस….

बाईंची झोप उडाली होतीच . त्या उठून दारात आल्या. बघतात तर माधव एकटाच कविता बोलत आहे. त्यांनी म्हटलं.

“ सुगंधा हा शब्द पुल्लिंगी आहे की स्त्रीलींगी?”

“ शब्द कोणत्या संदर्भात आहे त्यावर अपेक्षित आहे. सुगंधा हे स्त्रीचं नाव असतं व फुल हा मला वाटतं स्त्रीलिंगी शब्द आहे;पण त्याचा सुगंध पुल्लिंगी आहे. बघा काय सुगंध आला ‘ या वाक्यात सुगंध आली म्हणत नाही तर

‘आला’ म्हणतो. तोच शब्द स्त्रियांसाठी वापरला तर ‘आली: म्हणतो!” माधवने स्पष्टीकरण केलं तेहा बाई म्हणाल्या,,

“तुम्ही सांस्कृतिक खात्यात असायला हवे होते!”

“ माझ्या नोकरीची सुरुवात सांस्कृतिक खात्यातून झाली आणि बदली होत होत या रुक्ष महसूल खात्यात झाली…”

.. आणि तुम्ही बिघडलात!” बाईंनी त्याचं वाक्य पूर्ण केलं तेव्हा दोघांत हशा पिकला.

“सर सांस्कृतिक खात्याचे काम काय असते?” बाईंनी विचारलं तेव्हा माधव म्हणाला,

“ आपल्या देशातील किंवा राज्यातील सांस्कृतिक वारशांचे जतन आणि संवर्धन करणे. वेडवेगळया कलांची जोपासना करणे. अधिवेशन काळात आमदारांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तयार मंत्री महोदयांना पुरवणे!”

“ नागपूर अधिवेशन काळात सहकारी, कारकून शिपाई वगैरे मंडळी सरकारच्या खर्चाने जीवाची चैन करतात असं मी ऐकलं आहे ते खरं असतं का?. बाईंनी हंसू लपवून विचारलं तेव्हा माधवच्यातील अधिकारी जागा झाला. म्हणाला,

“ ह्या प्रश्नाचं उत्तर मी राखीव ठेवत आहे…”

“.. म्हणजे राखीव जागा कधीच भरत नाहीत तसं ना?”

“ चला मी जरा फेरी मारून येतो.!” माधव उत्तर टाळत उठला. बाई म्हणाल्या,

“ नुसतीच फेरी मारून या नाहीतर…”

सल्ला ऐकून माधव हसत अंगणात फेऱ्या मारत राहिला. दहा वीस पावले चालल्यावर मनात वियोगाची सावली पसरत आहे याची जाणीव झाली. खूप चांगलं माणूस किंवा आपल्या गावातून मुंबईत जाताना आपलं मन घराच्या ओढीने मागे मागे रेंगाळत राहतं तसं त्याचं होत होतं. अंजली एक खूप सुंदर आणि सुस्वभावी, मनमिळावू जिच्या हातचं दोन महिने जेवण करून घरच्या अन्नाची आठवण करू दिली नाही अशी सुगरण मनाला मागे खेचत आहे असं वाटत होतं; तर आपली मुलं आणि बायको आपल्या येण्याची किती आतुरतेने वाट पाहत असतील याचीही कल्पना येत होती. . ००

संध्याकाळी अचानक ढग जमा होत होत गेले, आकाशात ढगांची दाटी वाढत गेली हवा बंद झाली माधव हसत म्हणाला,

“ पावसा तू तापलेल्या धरणीला शांत करण्यासाठी आला आहेस की माझी वाट अडवून धरायला आला आहेस?” जवळून बाई ऐकत होत्या त्या म्हणाल्या,

“ माझीही वाट अडवून धरणार असं वाटतं!”

“कशाला? आपण आपल्या वाटेने चालत राहायचं!”

संध्याकाळी ढगांचा गडगडाट झाला आणि पाऊस सुरू झाला. माधव व बाई पडवीत बसून झरझरणारा पाऊस आणि त्या पावसाने तृषार्त झालेल्या

मातीने तिच्या गर्भातील उसळलेल्या सुगंधाने माधव आणि अंजलीबाई सारख्या रसिकांना आनंद न झाला तरच नवल. माधव एकचित्त होऊन म्हणाला,

“ अंजली पावसाची कोण कोण वाट बघत असतात ठाऊक आहे तुला?”

“ सांगा तुम्ही मला ऐकायला आवडेल!”

“ हं यात पहिला मोर नंतर मी, झाडे वेली,पाने फुले,रानपाखरे,फुलपाखरे, लहान वासरे आणि वैशाख वणव्यात होरपळून गेलेली धरणी…!”

“ ह्यांच्यात मी बसत नाही का?”

“ हो तू आणि मी. पण तुमच्याकडे कोकणासारखा धुवांधार पाऊस पडतो का?” माधवच्या प्रश्नावर बाई हसत म्हणाल्या,

“इथे तुम्ही एका विषयात नापास झालात!”

“ कोणत्या?”

“सर पाऊस सगळीकडे पाऊसच असतो. तुमचा पाऊस वेगळा आमचा पाऊस वेगळा असं काही नसतं ना?”

“ हं…अगदी बरोबर. तुझ्याकडून नापास झालो याचा तुला इतका आनंद होत आहे तर आता कांदाभजी होऊन जाऊद्यात!”

“ तुम्हाला निमित्त बरोबर सापडतं!” बाई लाजत म्हणाल्या व उठून आपल्या घरात गेल्या.

अर्ध्या तासाने खमंग कांदाभजी खात असताना टीव्हीवर बातमी झळकली की,

“ यंदा कोरोनाने लोकांचे रोजगार बुडाले,हाती पैसा उरला नाही, शेतकरी घरात अडकून पडले ण मशागती झाल्या नाहीत ह्या सर्वांचा विचार करून केंद्र सरकारने सर्व शेतकऱ्यांना मोफत धान्य पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे!” ही बातमी ऐकून सगळे शेतकरी आनंदीत झाले. दुसऱ्या दिवशी पुन्हा नवीन संकट उभं राहिलं.

“ रत्नागिरी जिल्ह्याल कोरौना रुग्णांची संख्या वाढली असून रत्नागिरी जिल्ह्याला रेड अलर्ट जारी केला असून परत जिल्हा बंदी लागू करण्यात आली आहे. मुंबईतून गावी येणे व गावातून बाहेर पडण्यास बंदी घातली असून तूर्त आठवडी बाजार बंद करण्यात येत आहे!”

ही बातमी ऐकून ह्या दोघांनी निराशेने डोळे मिटून घेतले.

“ असंच चालू राहिलं तर बहुतेक आपल्याला शेतावर पेरणी,लावणी करावी लागेल. मला सवय आहे तू तुझं काय ते ठरव!” माधव अंजलीला चेष्टेने म्हणाला तेव्हा अंजली उदास हसली.

“ जरा चेष्टा केली त्यासाठी एवढं उदास कशाला व्हायला हवं?”

“ त्यासाठी नाही. माझ्या घरी जाण्याची मनापासून इच्छा नाही तरीही मुलगी डोळ्यासमोर येते!”

“ खरं आहे. मी जरी मजेत असल्याचा आव आणत असलो तरी मला माझी मुलं आठवतातच!”

माधव आणि अंजलीबाई पुन्हा एकदा आपापल्या कामात व्यस्त राहिल्या. एके दुपारी बातम्या सुरु असताना महत्त्वाची बातमी सुरू झाली.

“ जगभरात शास्त्रज्ञ कोरोना प्रतिबंधक लस शोधण्याचा प्रयत्न करत असताना आपल्या देशातील पुणे येथील सीरम इन्स्टीट्यूटने कोरोना लस शोधून काढली व चाचण्या घेऊन लवकरच लस टोचणे सुरू करण्यात येणार!” ही बातमी ऐकून संपूर्ण देशात आनंदाने वातावरण पसरले. माधव आणि अंजलीबाईंना आनंद झाला. आता आपण आता मुक्तपणे आपापल्या गावी जाणार हे नक्की झालं.

अखेर तो दिवस उजाडला. कोरोना लस मुंबई पासून गावागावात येऊन पोहोचली. शासनाने गावात अडकून पडलेयहल्या चाकरमान्याना गावाहून मुंबईत येण्याची परवानगी दिली अर्थात मेडिकल तपासणीत फीट असलेल्या लोकांनीच निघावे. माधवला आनंद झाला, बाईंच्या चेहेऱ्यावर दुराव्याची सावली पसरली.

त्याच दिवशी पोलीस पाटलाने कळवलं की साहेब “आधी हॉस्पिटलमध्ये जाऊन या, डॉ ने दाखला दिला तरच तुम्हाला मुंबईत जाण्याचा पास मिळेल!” हे ऐकून डोळ्यातील चांदणे का मावळले.

दुसऱ्या दिवशी माधव गाडगीळ प्राथमिक उपचार केंद्रात गेल्यावर डॉक्टरांनी विचारले,

“ साहेब कोणतं ऑपरेशन वगैरे झालं आहे का?” म

“ हो. हर्नियाचं ऑपरेशन झालं आहे!” माधवने खरं ते सांगितलं ते ऐकून डॉ ने नकार देत म्हटलं,

“ सर तुम्हाला कोरोनाप्रतिबंधक लसीचं इंजेक्शन देता येणार नाही!”

“ का?” माधव करवादून म्हणाला. तेव्हा डॉ म्हणाले,

“ साहेब आम्हाला सद्या सूचना दिल्या आहेत त्यांनाच इंजेक्शन देतो. शस्त्रक्रिया झालेल्या लोकांना हे इंजेक्शन सद्यातरी देवू नये असं कळवलं आहे तेव्हा तुम्ही जा घरी आणि रहा. तसं तुम्हाला कोणताच गंभीर आजार नाही. मला पण इथे कंटाळा आला आहे;पण कर्तव्य पार पाडत रहावे हेच योग्य नाही का,?”

अशाप्रकारे जिथे डॉक्टर हतबल झाला आहे तिथे आपलं काय? असा विचार करत तो पुन्हा टेंबे वाडीत आला. झाला प्रकार अंजलीने ऐकताच तिच्या डोळ्यातील मावळलेले चांदणे पुन्हा चमकत राहिले.

माधवला तिची चेष्टा करायची लहर आली त्याने खोट्या गंभीरपणे विचारले,

“ अंजली मला फिटनेस सर्टिफिकेट मिळू नये म्हणून कुठल्या देवाला नवस केला होता का?” हा प्रश्न ऐकून अंजली मान वळवून हसत राहिली. नंतर म्हणाली,

“अहो मी कशाला नवस करू? तुम्हाला पास मिळाला असता तर मलाही मिळाला असता व मी ही माझ्या गावी गेले नसते का,?”हे ऐकून माधव म्हणाला,

“ हं ह्या विषयावर एकदा विचार करायला हवा!”

“ नंतर करा आधी पाणी तापविण्यासाठी लाकडे फोडून ठेवा हां हां हां!”.

००

माधवला डॉ ने दाखला दिला नाही तरी कोणत्याही प्रकारचा ताप नाही या कारणामुळे व माधव शासकीय अधिकारी आहे म्हणून डॉ ने मुंबईत जायला परवानगी दिली. त्यानंतर काही दिवसांनी जिल्हा बंदी उठली. माधवने सुटकेचा निःश्वास टाकला. म्हणाला,

“अंजली सांगायला आवडत नाही तरी सांगतो मी मुंबईला निघणार आहे!”

“ बरं मावळतीची वेळ जवळ आली!”बाईंनी असं उत्तर दिलं की माधव थक्क झाला.

“किती काव्यमय उत्तर आहे व्वा!” त्याच्या मुखातून उद्गार निघाले. ते ऐकून त्यानी

खोटं खोटं हसत विचारलं,

“कधी निघत आहात?”

“ निघायला हवंच ;पण पाय उचलत नाहीत!” माधवचा उत्तर ऐकून बाईंचा जीव चरकला. तोच त्याने मोबाईल उचलला व एस फोन केला.

“ विनायक तुझे आईवडील गावी कधी येणार आहेत?”

“ तीन चार दिवसांनी पाठवत आहे,का रे?”

“ अरे आता आम्हाला मुंबईत येण्याची परवानगी मिळाली आहे म्हणून विचारलं बरं ओके!” हा फोन कोणाला केला होता ते बाईंनी ओळखलं. घरचे काका काकू रविवारी सकाळी येणार हे कळलं. माधवने त्याचं संध्याकाळी निघायचं निश्चित केलं.

“ अंजली मी शनिवारी सायंकाळी निघत आहे. रविवारी सकाळी ह्या घरचे मालक येत आहेत शनिवारी रात्री नीलम सोबत करेल. पोलीस पाटलांनी माझ्या तिकीटाचं रिझर्व्हेशन केलं आहे g! असं म्हणत त्याने एटीएम मधून काढून आणलेले दोन हजार रुपये काढून हातात धरले. बाईंनी हात मागे घेतला.

“ हे पैसे नीलमला दे!”माधवने म्हटलं. बाईनी ते ऐकलं न ऐकल्यासारखं केलं .

“ नाही घेणार मी!” त्या निक्षून म्हणाल्या. माधवने पैसे परत खिशात ठेवले.

“ रात्रीच्या जेवणासाठी चपाती भाजी बनवून देते. हॅाटेले उघडली नाहीत!” खाली मान घालून बाई म्हणाल्या. चार वाजता माधव तयार झाला. जडावल्या शब्दात लहानशी बॅग उचलली. तोच बाईंनी चपाती भाजीचा डबा भरून दिला. तो बॅगेत ठेवत असताना शिऱ्याची डीश भरून आणली व माधवला म्हटलं ‘घ्या ‘

“ आज मी एकट्याने का? नको मला!”

“आणते!” म्हणत आत जाऊन दुसरी डीश आणली,माधव अर्धा अर्धा चमचा भरून शिरा खात होता. हे पाहून.

“ किती वाजताची बस आहे?” बाईंनी विचारलं.

“ सहा वाजता!” . म्हणत त्याने थोडा थोडा करत शिरा संपवला. नेहमीप्रमाणे उरलेले कण बोटांनी उचलून जीभेवर ठेवले.

“ पाणी?”

“ नको. ही चव मला जपून ठेवायची आहे!”

म्हणत उठला. बॅाग उचलून पायात बूट घातले, उठून म्हणाला,

“ सुट्टीत कधीतरी मुंबईत येशील का?”

“ येशील ना? म्हणालात तर.. ”

“ का व ना ह्यांच्यात काय वेगळं आहे?”

“का? अक्षरात संशय व्यक्त होतो आणि ना? अक्षरात आपुलकी,माया आणि…”

“ आणि काय?”

“ आणि ओढ व्यक्त होते!”

“ व्वा! अंजली. खरंच तुला आदर्श शिक्षक म्हणून पुरस्कार मिळाला असंच समज!”

“ सर मला पुरस्कार नाही मिळाला तरी चालेल. शिवाय ओळखिने मिळालेला पुरस्कार काय कामाचा, त्यापेक्षा तुमच्या मनात माझी ओळख राहिली तर त्याचा आनंद अधिक असेल!” बाईंचे हे शब्द ऐकून माधव निरुत्तर झाला. व बाईंना डोळयात साठवत पाय उचलला.

हळूहळू चालत अंगणात आला. बाई डोळे पुसत उभ्या होत्या. माधवने एकदा मागे वळून पाहिलं व जड अंतःकरणाने येतो म्हटलं, तोच बाई एखाद्या झंझावाती वेगाने धावतच आल्या आणि माधवला मिठी मारत ढसाढसा रडू लागल्या. माधवच्या हातातील बॅग गळून खाली पडली. त्याचे डोळे पाणावले. शब्द घशात अडकले. शेवटी त्याने बाईंची मान वर उचलून त्यांचे डोळे पुसले. क्षणभर देहभान हसपलं. तोच बाईंनी खाली वाकून माधवच्या पायांवर मस्तक ठेवलं आणि अश्रुंना वाट मोकळी करून दिली. क्षणात दोघं सावरली. माधव म्हणाला,

" हाच तो मोहाचा क्षण. तू खूप सुंदर आहेस,तेवढीच सोशिक आहेस म्हणून मलाही तू खूप आवडतेस पण;स्वताला आवर मी ही स्वतःला आवरतो. नदीतून वाहून आलेल्या दोन ओंडके काही क्षणांसाठी एकत्र येतात व एकत्र वाहता वाहता दोन दिशेने वाहत जातात. तसे आपले दिवस होते असं समज. मी तुला फोन करीनच. लॉकडाऊन उठल्यानंतर सुट्टीत कधी मुंबईत आलीस तर मला फोन कर. माझी एक निर्मळ निरपेक्ष मैत्रीण म्हणून माझी बायको तुझं स्वागत करील. बघ तू कुठेही असलीस तरी आपल्या मैत्रीचा सुगंध माझ्या मनात सतत दरवळत राहील येतो. रिक्षा आली आहे.!"

तो रिक्षात बसला रिक्षा पुढे सरकली . माधवने मागे वळून बाय करताना अंजली डोळे पुसत उभी आहे हे दिसत होतं. रिक्षा चालत राहिली, त्याचं मन मागे मागे रेंगाळत अंजलीला डोळ्यात साठवत चालत होतं .

लॉकडाऊन भाग २

लॉकडाऊन उलटून वर्षभर कालावधी निघून गेला होता. काही कंपन्या बंद पडल्या त्या पुन्हा उघडल्याच नाहीत काही उघडल्या, सरकारी कर्मचारी नियमितपणे कामावर जाऊ लागले होते,शाळा सुरू झाल्या विशेष म्हणजे लोकांच्या मुखांवरील मास्क फेकून टाकले असल्याने सगळे मोकळा श्वास घेऊ लागले होते, पूर्वीसारख्या कट्टायावर गप्पांच्या मैफली सुरू झाल्या होत्या .

असंच एकदा रविवारची सुट्टी असल्याने माधव आणि त्याचे कुटुंबीय सकाळी चहा नाश्ता करून बसले होते इतक्यात माधवच्या मोबाईलची रिंग वाजली. फोन उचलला .

' बोला!'

' मी अंजली बोलतेय!'

' अंजली कोण अंजली ?'

' सर विसरलात का ? की मुद्दाम विसरून गेलात ?'

' मुद्दाम कसं विसरणार? ती काय वस्तू आहे आठवण झाली नाही विसरलो म्हणायला ?'

' बाबा कोण हो ?' कन्येचा प्रश्न.

' अगं त्यांची जुनी मैत्रीण अंजली!' आईने टोमणा मारत म्हटलं.

' अय्या! आई तुला माहित आहे ?'

' न असायला काय झालं. ? एकदा भेटली होती बिच्चारी.!' असं म्हणत मधुराची आई गालात हसली. ते पाहून माधव करवादून म्हणाला,

' अरे गप्प बसा ना, मी इकडे आठवतोय कोण अंजली आणि तुम्ही..!' माधवचे उद्गार ऐकून पलिकडील अंजली हसली . व म्हणाली,

' सर मी तुमची सख्खी शेजारीण. लॉकडाऊनमध्ये तुम्ही.. . '

' अरे तू ? आयला खरोखरच विसरून गेलो सॉरी सॉरी. बरं कशी आहेस तू ?तुझी मुलगी कशी आहे?''

' अजून तरी बरी आहे ?' अंजलीचा आवाज पडला.

' अजून तरी म्हणजे काय झालं ?'

' निकाल लागला. नवऱ्याने मला घटस्फोट दिला.!'

' हो का ? बरं झालं अभिनंदन सुटलीस तू!' माधवचे हे उद्गार ऐकून. शकुंतलाच्या लक्षात आलं की ही अंजली म्हणजे नक्कीच शाळा मास्तरीण. इकडे ही दोघं खूप वेळ बोलून फोन ठेवला. माधव एक दीर्घ निःश्वास टाकत म्हणाला,

' सुटली बिच्चारी!'

' म्हणजे काय हो?'

' अगं तिचा नवरा तिला हुंड्यासाठी छळ करत असे. तिला एक मुलगी आहे तिच्या पाठी मुलगा नाही म्हणून पैशाची मागणी करायचा पैसे दे नाही तर घटस्फोट घे म्हणत होता तो घटस्फोट झाला. आता ती मुंबईत येत आहे.

तिच्यासाठी मला काही तरी करावं लागणार आहे.!' असं म्हणत माधव आपल्या बायकोकडे सांकेतिक अर्थाने बघत राहिला.

' असं का बघता माझ्याकडे? तिला इथे घेऊन येणार आहात का ?''

' डोकं ठिकाणावर आहे का ? माधव चिडून म्हणाला, अगं लॉकडाऊन मध्ये माझा जेवणाचा डबा बंद झाला तेव्हा मला हिने जेवू खाऊ घातलं,मला हवा खायला पंखा दिला शिवाय छान स्वयंपाक करते पुरणपोळी इतक्या मस्त करते कि तर, तिने मला विनंती केली होती की नवऱ्याने घटस्फोट दिला तर मला मुंबईतील शाळेत बदली करून द्याल का.. . '

'.. . मग तुम्ही लगेच हो म्हणाला असाल! ‘बाई मनोमन चिडून म्हणाली.

' हो म्हणालो होतो आणि तिने खाऊ घातलेल्या अन्नाला जागून तिची मुंबईत बदली करून देणार आहे तेवढी माझी पत आहे कळलं ? आता बोल!' माधव एकदम उसळून बोलला. दुसऱ्या क्षणात घरातील वातावरण बदललं. बाई फणकाऱ्याने आपल्या नवऱ्याकडे रागाने बघत स्वयंपाक घरात निघून गेली. कन्या हा काय प्रकार आहे या विचाराने आपल्या बाबांकडे बघत बसली.

माधवने फोन ठेवला आणि विचार करू लागला,आता हे शब्दाला जागून अंजलीला मदत करताना शकुंतलाला समजून घेणं महत्त्वाचं आहे नाही तर तिच्या मनात उगाच संशय निर्माण होईल; पण कसं समजावून सांगणार? कुणाही परस्त्रीला मदत करताना त्या पुरुषाची पत्नी संशय घेणारच यात वादच नाही.

आता करावं तरी काय?’ माधव विचारात पडला. त्याची मस्करी करत कन्या मधुरा म्हणाली,

‘ पप्पा आज तुमच्या जेवणात करपलेली भाकरी असणार नक्की!’

असं म्हणत उठून घरात पळाली.

दोन दिवसांनी पुन्हा अंजलीचा फोन आला,

‘ सर काम होईल ना माझं ?’

‘ होईल पण एकदा घरी येऊन भेटून कागदपत्रे दाखव. समोरासमोर बसून बोलू.!’ माधव म्हणाला. यावर अंजली म्हणाली,

‘ कधी येऊ ते सांगा मी येईन!’. ००

‘ शकुंतला येत्या रविवारी ती अंजली येणार आहे मला भेटायला!’ माधवने आपल्या बायकोला म्हटलं,

‘ मग ? शिरा पोहे करू की पोहे?काय करू ?’

असं तिरकसपणे म्हणत शकुंतलाने हातातील एक डीश खाली टाकली. माधव हसला,

‘ अगं एवढी आदळआपट करायची गरज नाही,नुसता चहा दिला तरी चालेल!’

‘ तिला चालेल तुम्हाला चालेल का ?’

‘ चालेल तिच्यासाठी करशील ते चालेल मला!’ माधव शांतपणे म्हणाला तरी शकुंतला तिरकसपणे म्हणाली,

‘ हो ? एवढी आपुलकी?’ शकुंतलाचे हे उद्गार ऐकून माधव सावध झाला. ती चिडली आहे हे ओळखून

म्हटलं,

‘ नाही तर राहू दे. काहीच करू नकोस उशिरा आली तर नाश्ता वाया जाईल!’ तिरपी नजर आपल्या बायकोकडे बघत माधवनं म्हटलं यावर नुसताच ‘ हं ‘ असा उद्गार शकुंतलाच्या मुखातून निघाला.

अंजली आपल्या लेकीला घेऊन पत्ता शोधत शोधत बरोबर अकरा वाजता माधवच्या घरी येऊन हजर झाली. दारावर टकटक होताच मधुराने दरवाजा उघडला. बघते तर दारात एक देखणी बाई उभी. मधुराने विचारलं,

‘ कोण हवंय ?!

‘ माधव सर . तू मधुरा ना?’

‘ शकुंतला उठून घरात जाणार होती ती जागेवर उभी राहिली. अंजलीकडे बघत मनातल्या मनात चरफडत म्हणाली,

‘ हीच ती नटवी वाटतं. मेली हिरॉईन वाटते. म्हणून आपला नवरा हिच्यासाठी पागल झाला आहे. इकडे अंजली म्हणाली,

‘ मी अंजली!’

‘ या!’ मधुराला ओळख पटली म्हणून तिला घरात घेतलं. व बसा म्हणताच अंजली सोफ्यावर बसली. तोवर माधवराव बाहेर आले. अंजलीने उठून त्यांना वाकून नमस्कार केला.

‘ कशी आहेस? आणि ही तुझी मुलगी ना ?’

‘ हो.!’

‘ बरोबर आलीस. मुंबईत पत्ता शोधत बरोबर हव्या त्या घरी पोचणं कठीण असतं. बरं तुझं नाव काय बाळ ?’ माधवने अंजलीच्या लेकीला विचारलं यावर ती गोड हसून आपल्या आईला बिलगली. तिला आपल्याजवळ घेत मधुरा हसत म्हणाली,

‘ आठवत नाही? मी तुझं नाव ठेवलं तर चालेल? बरं तुझं नाव श्रावणी चालेल?

‘ माझं नाव चिन्मया आहे!’ छोटी मुलगी म्हणाली ते मधुरा तिला उचलून घेत म्हणाली,

‘ खूप छान नाव आहे कुणी ठेवलं ?!

‘ आईने!’ असं म्हणताना ती गोड हसली.

‘ मी तुला चिनू म्हणणार चालेल तुला?’

‘ आई तेच बोलते!”

‘ चल आत चॉकलेट देते!” या दोघी आतमध्ये जाताच माधवने आपल्या बायकोची ओळख करून दिली.

‘ अंजली ही माझी बायको शकुंतला

यावर शकुंतला कसनुसं हसली. अंजलीने हात जोडून नमस्कार केला व म्हटलं,

‘ ताई नमस्कार!’ तिने ताई म्हणताच शकुंतलाला राग आला . तरी खोटं हसत मनोमन म्हणाली . मेली ताई म्हणाली मला वहिनी म्हणायला जीभ जड झाली वाटतं. नंतर उघडपणे म्हटलं,

‘ बसा मी चहा ठेवते.!’

‘ आई काही तरी खायलापण कर!’ मधुरा निरागसपणे बाहेर येत म्हणाली ते ऐकून शकूने रागाने आपल्या लेकीकडे पाहिलं

‘ हिला चोंबडेपणा करायला कोणी सांगितलं?’ असं मनात पुटपुटली. तिच्या चेहेऱ्यावरील भाव पाहून अंजली सावधगिरीने म्हणाली,

‘ ताई नको चहा नाश्ता करून आलोय आम्ही!’

‘ आई तरी कर तू काही तरी नाही तर शिरा कर!’

‘ हं शिरा करते चांगलं ढीगभर मीठ टाकून!’ शकुंतलाचा तीळपापड झाल्याने ती मनातल्या मनात पेटत चालली होती. जवळ माधवराव बसलेले त्यांची गोची होत होती. अंजलीने लगेचच येण्याची घाई केली असं वाटू लागलं होतं.

शकुंतला नाईलाजाने सैंपाकघरात गेलीच. नंतर शिरा व चहापाणी झाल्यावर अंजलीने आपल्याकडची कागदपत्रे माधवच्या हाती दिली.

‘ अंजली मला एक सांग तुझा घटस्फोट इतक्या लवकर कसा झाला? त्यासाठी वकील करावा लागतो, नोटीस द्यावी लागते,सहा महिने एकत्र येता कामा नये, अशी बऱ्याच प्रकारच्या भानगडी असतात त्यातून तू कशी सुटलीस?” माधवची शंका बरोबर होती.

‘ सर तुमचा अनुभव आहे तेव्हा..!

‘ माझा अनुभव म्हणजे? मी वकील आहे क काय?’ माधवने हसत विचारलं.

‘ वकील नाही; पण तुम्ही शासकीय अधिकारी आहात आणि एकदा तुम्ही मला महत्वाचा सल्ला दिला होता ते आठवा!” अंजलीने आठवण करून दिली तेव्हा शकुंतलाच्या मनात संशय निर्माण झाला. म्हणजे ह्या दोघांचा काही डाव आहे का ? असं वाटत राहिलं.

‘ छे तेवढ्याने काही होत नाही!”

‘ अहो सासर श्रीमंत आहे मी फक्त बाहुली ठरले त्यात मला मुलगा नाही. ?

‘ पण हे कारण पुरेसं ठरत नाही!” दिवाकर मध्येच बोलला. त्यावर अंजली म्हणाली,

‘ त्यांनी आधी माझ्यावर दबाव टाकला होता की मी घटस्फोट द्यावा म्हणजे माझ्या नोकरीतून त्याला पैसे मिळावेत!”

‘ आता म्हणालीस ते श्रीमंत आहेत!”

‘ सर पैशासाठी लालची आहेत आणि दुकान दीराच्या नावावर आहे. नवऱ्याला नोकरी नाही म्हणून माझ्यावर दबाव टाकून बघत होते; पण तुम्ही सांगितल्याप्रमाणे माझ्या नकारावर ठाम राहिले होते!” अंजली म्हणाली.

‘ मग पुढे?’

‘ त्यांच्या नात्यात एक अविवाहित मुलगी आहे व तिचे वडील केळयाचे श्रीमंत व्यापारी आहेत. त्यानी ह्याला लग्नाची मागणी घातली. घटस्फोट झाल्याशिवाय हे लग्न होऊ शकत नाही म्हणून माघार घेतली व माझी वाट मोकळी झाली!”

‘ मग मुलीचं काय?” एवढा वेळ शांत असलेल्या शकुंतलाने विचारलं.

‘ मुलगी अज्ञान असल्याने तिचा सांभाळ आईचं करू शकते ही कायद्यातील अट असल्याने घटस्फोट मंजूर झाला आणि मी मोकळी झाले.

‘ तुझी माहेरची माणसं?’

‘ एकच भाऊ आहे तो मुंबईत राहतो.

आईवडील गावी असतात. मी इथेच स्थायिक होणार आहे पुन्हा त्या माणसाचं तोंड बघायचं नाही आणि मला खात्री आहे तुम्ही माझं काम करालच. तरी नाही जमलं पुन्हा आईवडिलांकडे निघून जाईन. आमची थोडी

शेतीवाडी आहे उपाशी राहणार नाही. मला शेतात राबायला आवडतं.!”

अंजलीने आपली पुढील योजना सांगितली ते ऐकून दिवाकरला तिची दया आली तो म्हणाला,

‘ माधव तू खरंच बाईंचं काम करून दे. आपण आपल्या आयुष्यात एकतरी काम असं करावं की कुणीतरी आपली आयुष्यभर आठवण काढली पाहिजे!” दिवाकर सहज बोलून गेला आणि शकुंतलाचा चेहरा आक्रसला. आता ह्यालाही तिची दया येऊ लागली. मेले पुरुष इथून तिथून सारखेच. जरा देखणी बाई दिसली की लागले गोंडा घोळायला. ती मनातल्या मनात बोलली. तेव्हा तिच्या चेहऱ्यावरील भाव माधवने ओळखून मुद्दामच म्हटलं,

‘ बघ शकुंतला अशा जिद्दीला पेटलेल्या बाईचं आयुष्य सुखी सुरक्षीत होत असेल तर मी मदत करावी की नाही!”

शकुंतला क्षणभर शांत राहिली. आपला नवरा मुद्दामच मला भडकवत आहे हे ओळखून म्हटलं,

‘ तुम्ही पाठीशी आहात ना? मग करा तिचं भलं. मला काय फरक पडणार आहे!” आपल्या बायकोचे शब्द वरवर चांगले आहेत पण मनात किती चीड आणि संताप भरून आहे याची जाणीव झाली. आपण आता सावधगिरी बाळगली पाहिजे असं मनोमन ठरवून टाकलं.

“ बराच वेळ कुणीच काही बोलत नाही हे पाहून अंजली म्हणाली

‘ सर कृपया लवकरच बघा म्हणजे मला कुठेतरी भाड्याने घर घेता येईल!’

‘ अं... बघतो होईल काम काळजी करू नकोस! ‘

‘ हो आणि मराठी वस्तीत घर असावे म्हणजे भीती नाही!’

‘भाड्याने घर ना ?

‘ हो!”

‘ पप्पा आपल्या समोरच्या टॉवर मध्ये एक घर भाड्याने देणे आहे!” मधुराने माहिती दिली. ते ऐकून शकुंतलाला संतापली म्हणाली,

‘ तुला काय कळतं गं घरातलं ? ‘

‘ अगं माझ्या मैत्रिणीच्या शेजारची खोली आहे व भाड्याने देणार आहेत म्हणून सुचवलं’ मधुरा उत्तरली.

हा सगळा रागरंग ओळखून माधव म्हणाला,

‘ ते आधी राहूदे. आधी बदली तर मिळूदे!’

‘ होय सर. मला घाई नाही!’ असं बोलून ती उठली. आपल्या येण्याने साहेबांच्या बायकोच्या मनात संशय निर्माण झाला आहे याची खात्री झाली. म्हणून माधवला येते म्हणून निघून गेली. मधुराने तिच्या लेकीला म्हटलं,

‘ तू ये पुन्हा आपण मस्त खेळू!’

‘ मी तुला काय म्हणू ?”

‘ मला ? तू ताई म्हटलं तरी चालेल!”

आपल्या लेकीने असं म्हटलं तेव्हा माधवने आपल्या कपाळावर हात टेकले. काय घडतंय हेच कळेना. तरी तो म्हणाला,

‘ शकुंतला तू पाहुण्या बाईशी असं तुटकपणे वागली हे बरोबर नाही!’

‘ पाहुणी असली तरी तिच्यापासून तुम्ही लांब रहा . गोड गोड बोलून तुमच्या गळ्यात पडली तर खबरदार!’

‘ अगं वेडे लागलंय का तुला? दोन महिने तिने मला जेवू खाऊ घातलं हे विसरलीस तू ? नायतर मी काय करून खाणार होतो ? रोज वरण भात? ती चूल पेटवता पेटवता माझ्या नाकातोंडात धूर जात होता. माझी ती अवस्था बघून तिने स्वतःहून मला भोजनाची व्यवस्था केली आणि तेव्हा तू तिच्यशी मोकळेपणाने बोलत होतीस आणि आता काय झालं?म्हणताना माधवचा पारा चढला. शकुंतला गप्पच सैंपाकघरात निघून गेली तेव्हा मधुराला आपली आई पप्पांवर का चिडली आहे याचा अंदाज येऊ लागला. अंजली खूप सुंदर असल्याने पप्पा तिच्या प्रेमात पडले असावेत असा संशय आईला येत आहे याची जाणीव मधुराला झाली. आपण उगाचच मध्ये बोललो यापुढे आपण गप्प बसायला हवं नाहीतर आईबाबांच्यात वितुष्ट येईल. कोण बरोबर आणि कोण चुकतंय हेच तिला कळेना. ००

एकदा सायंकाळी माधव हळू आवाजात बोलत असताना शकुंतला तिथं हजर झाली. दोन ती वाक्य ऐकून तिला संशय आला,

‘ कोणाशी बोलत आहात आणि इतकं हळू एवढं हळूहळू कधी बोलत नाहीत.!’ माधव हसला व मोठ्या आवाजात म्हणाला,

‘ अरे मी तुला एवढंच म्हणतोय की आपण त्या तिकडे नको इकडेच कुठेतरी बसू!’

‘ विषय फिरवला. सगळे पुरुष मेले तसलेच!’ तिचे उद्गार ऐकून माधव मोबाईल म्युट करून म्हणाला,

‘ मला काय म्हणालीस ?’

‘ नाही. स्वगत बोलले मी!’

‘ बरं तर ऐकून घे उद्या आपण ...,

‘ आपण नाही तुम्ही!’ शकुंतलाने पुढे ऐकू घेता विषय संपवला. हे पाहून माधव चिडला,

‘ अगं मी काय म्हणतोय ते ऐकून घ्यायच्या आधीच काय बरळतेस ?’

‘ हो. आता माझं बोलणं बरळणंच वाटणार!’ शकुंतला पुन्हा वाकड्यात शिरली.

‘ ठीक आहे मी बाहेर जात आहे चार पाच आठ दहा दिवसात परत येईन!’ माधव म्हणाला व कपडे बदलून तरातरा बाहेर पडत असताना मधुराने अडवलं,

‘ बाबा थांबा कुठं चाललात ? आणि आई तू पण कशाला त्रास देते बाबाना?’

‘ तू गप्प बस तुला काही कळत नाही!’ शकुंतला तिच्यावर ओरडली ते पाहून मधुराही चिडली.

‘ नाही कळत मग मी ही निघाले!’ असं म्हणत ती ही उठून बाहेर पडली, तेव्हा शकुंतला आ वासून तिच्याकडे बघत राहिली. ००

माधव खाली उतरून एका बीयर बारमध्ये बसला. आपल्या बायकोच्या मनात संशय निर्माण होत आहे याची जाणीव झाली. आपण तरी काय करणार? अंजलीला मी मदत करीन असा शब्द दिला होता. तिच्या हाताच्या अन्नाला जागून तिला मदत करणं हे आपलं कर्तव्य ठरतं.!' असं म्हणत तो एक सीप घेऊन थांबला. खारे काजू तोंडात घेऊन चावत असताना अंजलीने त्या शेवटच्या दिवशी मारलेली मिठी आठवली. केवळ आठवणींनी त्याच्या अंगावर मोहोर उमलला, मुखावर स्मित हास्य उमटलं. त्याला आठवलं आपण नशा केली तरी भानावर असायचो. एकदा रात्री तिने अंगावर चादर घालून निघून गेली होती. एकदा वाघाच्या भीतीने मला उठवून घरात घेऊन जाताना आपला तोल गेला तेव्हा तिने मिठीत घेऊन मला सावरलं होतं तेव्हा तिच्या ती इतकी गोड लाजली होती,तिच्या डोळ्यात वेगळेच भाव होते त्याक्षणी जर आपला तोल जातो तर काय झालं असतं तिचं? कदाचित ती काही बोलू शकली नसती. स्वत:ला समर्पित केलं असतं. मग माझं आणि तिचं काय झालं असतं? विचार भरकटत जातो होते व पुन्हा ती जवळ यायला हवी असं मन म्हणत असावं, काय करू मी मना सांग आता मी काय करु?

माधवच्या मनातील द्वंद्व दिवारने ओळखलं म्हाणाला,

' माधवा तू कितीही सभ्यतेचा बुरखा पांघरून असलास तरी तुझ्या मनात अंजलीची ती मिठी तुला वेड लावतेय. तिला विसरला असलास तरी हृदयात ती भरुन आहे, त्या क्षणाची ओढ तुला चैन पडू देणार नाही, तिच्या भेटीसाठी

तू आतूर झाला आहेस. मुग्ध सौंदर्य पाहून ऋषीमुनींना मोह आवरता आला नाही तिथं तू काय? हां हां हां.

माधव स्वप्नात हरवला होता.

“ सर अजून काही…!

‘ नको!’ म्हणत त्याने उरलेले खारे काजू हातात घेऊन कॅश काऊंटरवर आला व बिल पेड करताना आपल्या हातात काजू आहेत याचं भान झालं.

‘ अरे हे काजू हातात कसे आले ?’ स्वतःशीच पुटपुटला.

‘ राहुदेत सर काही हरकत नाही!’ कॅशर हसत म्हणाला व पुढे म्हटलं,

‘ सर काही प्लाब्लेम हाय का ?:

‘ प्रॉब्लेम? कसला ? अं…हो जरा एक समस्या उभी राहिली आहे.. जाऊदे मी करतो काही तरी सोय. इकडे कुठे कोणी रुम भाड्याने देणार आहे का ?’

‘ उद्या सांगेन. आपला एक मेंबर संध्याकाळी येईल तेव्हा विचारून सांगतो! तो इसम म्हणाला.

‘ मेंबर म्हणजे काय रे ?’

“ अहो सर ते आमचं कस्टमर. आम्ही सगळया कस्टमरना मेंबर म्हणतो ऐकायला बरं वाटतं!’ त्यांचे हे उत्तर ऐकून माधवला हसू आलं. म्हणाला,

‘ म्हणजे मी ही मेंबर!’ या वाक्यावर कॅशर खळकन हसला. ००

इतक्यात त्याचा मोबाईलची रिंग वाजली,

‘ हं काय बोल ?’

‘ बाबा कुठे आहात तुम्ही ?”

‘ कुठेतरी आहे मला आठवत नाही!’ माधव उत्तरला. ते ऐकून लेक चिडली.

‘ बाबा लवकर या आई कशीतरी करतेय!”

‘ काय करायचं ते करू दे मी नाय येणार!’ माधव धुंदीत बोलून गेला.

‘ बाबा! मधुरा किंचाळत उद्गारली. तिच्या सुरातील भीतीने माधव विचारात पडला. व सरळ घरी आला बघतो तर शकुंतला रडवेली होऊन सोफ्यावर बसली होती. माधव आपल्या लेकीवर चिडला,

‘ काय झालंय हिला ? आहे ना शांत बसलेली.

‘ तुम्हाला रागाने जाताना बघून ती घाबरली म्हणून मी खोटं बोलले. आता मी निघाले मैत्रीणिकडे तुमचं भांडण तुम्हीच मिटवा!’ असं बोलून ती तरातरा बाहेर पडून गेली.

माधवची नशा उतरली होती. त्याने कपडे बदलून स्वयंपाक घरात गेला, बघितलं तर स्वयंपाक केलेला नव्हता. त्याने स्वतःसाठी कॉफी बनवली.

‘ कॉफी दुधाची की बिनदुधाची? नशा उतरण्यासाठी काय करतात लोक? काकडी खातात पण कॉफी? विचार करत त्याने मित्राला दिवाकरला फोन केला,

‘ दिवाकर वाइनची नशा उतरण्यासाठी कॉफी प्यायला हरकत नाही ना ?”

‘ नशा उतरण्यासाठी? पण तू एवढी कधी घेतच नाहीस!’ पलिकडे दिवाकर म्हणाला.

‘ आज घेतली आहे आणि खूप घेतली आहे!” खूप वर जोर देत म्हणाला ते ऐकून दिवाकर म्हणाला,

‘ चालेल घे कॉफी, दोन कप बनव मी येतो दोन मिनिटात!”

‘ बरं ये!’ असं म्हणत मोबाईल बंद केला व गाण्याचा सूर लावला

‘ दिवस तुझे हे फुलायचे…आ.. आ,आ..

खरोखरच दोन मिनिटात दिवाकर घरी येऊन पोहोचला. बघतो तर माधव स्वयंपाक घरातील खिडकीजवळ उभ्या राहून दिवस तुझे हे.. बडबडत होता. तांबारलेले डोळे, विस्कटलेले केस पाहून दिवाकरने हसत विचारलं,

‘ काय रे इतकं टेंशन कसलं आलंय आज की गाणं गावंसं वाटतंय!’

‘ आज सगळं घर माझ्यावर रुसलं आहे!” माधव उद्गारला.

‘ म्हणजे नक्की कोण कोण?”

‘ माझी बायको,माझी लाडकी कन्या मधुरा आणि मुलगा .. कुठे गेला? आता आपल्या बेडरूममध्ये काहीतरी हळूहळू बोलत होता!’

‘ तो गेला बाहेर मला वाटेत भेटला तो.! दिवाकर म्हणाला

‘ गेला जावदे!’

‘ काय झालं एवढं टेन्शन घ्यायला ?”

‘ अरे मित्रा ती …कोण बरं ती, लॉकडाऊनमध्ये मला खाऊ पिऊ घालणारी नाव काय बरं तिचं??

‘ अंजली म्हणाला होतास एकदा!’

‘ बघ तुला पटकन आठवलं, मला नाही आठवलं तरी माझी घरवाली माझ्यावर संशय घेत आहे बोल आता मी काय करू?’

दिवाकर शहाणा होऊन म्हणाला,

‘ आधी आपण कॉफी घेऊ नंतर बोलू.!’

‘ कॉफी घेत घेत बोललो तर किंवा बोलत बोलत कॉफी घेतली तर बोलू ? काय वाटतं तुला ?

‘ हां हां हां हां

‘ तुला सगळी चेष्टा वाटतेय रे ; पण खरंच मी खूप ..

‘ कॉफी पिऊन बोलू!’ दोघांनी कॉफी पिऊन मग खाली ठेवले. दिवाकरने विचारलं,

‘ काय झालं काय एवढं?

‘ हां तर मी त्या हिला .. अंजलीला शब्द दिला होता..! माधव बोलू लागला होता तोच दिवाकर त्याला अडवून म्हटलं,

‘ शब्द ?

‘ म्हणजे शब्द दिला होता. तो पूर्ण करायला हवा की नाही?”

‘ बरं पुढे बोल!”

‘ .. हां तर तिचा परवा फोन आला होता की आता मला मुंबईतील शाळेत बदली मिळावी.!”

‘ मुंबईच्या शाळेत ? मुंबईत मराठी शाळा बंद पडत चालल्या आहेत त्यात तिला कुठं चिकटवणार तू ?; दिवाकरने शंका उपस्थित केली. त्यावर माधव म्हणाला,

‘ अजून सगळ्या शाळा बंद पडल्या नाहीत . त्यातील एखादा शाळा मिळवून देईन तिला ; पण प्रश्न तो नाही आहे…’

‘ मग कोणती अडचण आहे?! दिवाकरने विचारलं.

‘ प्रश्न हिने निर्माण केला आहे?’ शकुंतलाकडे बोट दाखवत म्हटलं.

‘ तिने कसा काय? आणि ती कशाला कुणाच्या आडवी येईल!’

‘ येतेय येतेय विचार तिला!’

‘ शकुंतला हा काय बोलतोय!’

‘ मी आडवी येत नाही. तिचा फोन आल्याबरोबर हे उतावीळ झाले. अहो तिला इकडे घर घेऊन द्यायला निघाले आहेत. उद्या लगेच घर नाही मिळालं तर माझ्या घरात आणतील!’ शकुंतला रागाने बोलली ते ऐकून दिवाकर हसला म्हणाला,

‘ अगं एवढी हिम्मत नाही त्याच्यात. ऑफिसमधे किती भानगडी होतात याने कधी काही केल्याचं आठवतं?’

‘ भावजी केली नाही पण करायला वेळ लागणार नाही. अहो किती कौतुक चाललेलं असायचं तिचं. तेव्हा दृष्टीआड सृष्टी म्हणून मी दुर्लक्ष केलं तर

आता तिच्यासाठी जीवाचं रान करतील!' शकुंतला बोलत होती आणि दिवाकर ऐकून घेत होता. सद्यस्थितीत हिला समजावून सांगणं कठीण आहे हे ओळखून त्याने विषयांतर करण्यासाठी विचारलं,

' माधव ती बाई खूप सुंदर वगैरे आहे का रे ?'

' हो आहे सुंदर आणि सुस्वभावीसुद्धा आहे!' माधव निरागसपणे सहज बोलून ते ऐकून शकुंतला पेटलीच.

' भावजी नुसती सुंदर नाही मेनका आहे मेनका!'

' हां तरीच ह्या ऋषीच्या हृदयात घुसून बसली आहे!" दिवाकरला वाटलं होतं आपण चेष्टा करत विषय बदलला तर वातावरण बदलेल ; पण झालं उलटच शकुंतला दिवाकरवर चिडली.

' झालं आता तुम्ही पण त्यांचीच बाजू घेतली. माझं मेलीचं कुणी ऐकूनच घेत नाही!" ती चिडून बोलली व उठून बेडरूममध्ये जावून बसली. इकडे माधवची पूर्ण उतरली होती व दिवाकर हतबल होऊन बसला होता. अखेरीस,

' माधव तुमचं भांडण तुम्हीच मिटवा मला त्यात पडायचं नाही मी निघालो!". ००

संध्याकाळी मधुरा आणि तिचा भाऊ ...यांनी पाहिलं तर आई वडील मूकपणे मोबाईलवर व्यस्त आहेत. स्वयंपाक घरात डोकावून पाहिलं तर स्वयंपाक तयार होता. मधुराने आईला विचारलं,

‘ आई तुम्ही जेवला नाहीत ?’

‘ मला मला भूक नाही!” तिची आई फणकाऱ्याने म्हणाली. दोघं शहाणे झाले. त्यांनी स्वतःसाठी ताटं भरून जेवण केलं व ताट वाटी धुवून ठेवली व सरळ झोपी गेली. ००

सकाळी शकुंतलाने चहा नाश्ता करून मुलांना म्हटलं,

‘ चहा पोहे करून ठेवले आहेत ज्यांना हवे त्यांनी खाऊन डीश धुवून ठेवा!’

‘ रोज तू डीश धुतेस आम्ही धुतल्या तर तुला आवडत नाही!” मधुराने मुद्दामच आपल्या आईला चिडवलं.

‘ आता आजपासून धुवा मी तुमची मोलकरीण नाही!’ आईच्या वाक्यावर मधुरा आपल्या वडिलांना ओरडून म्हणाली,

‘ बाबा तुमचं भांडण मिटवा आम्हाला त्रास होतोय!’

‘ मलाही होतोय पण मी काही बोललो का?” माधव मोबाइलवर चॅटिंग करता करता म्हणाला. ते ऐकून त्यांचा मोठा चिरंजीव आपल्या आईवर चिडला,

‘ ए आई तू उगाच पराचा कावळा करत आहेस. बाबा तसे नाहीत.!’

‘ मग त्यांना सांग ती नटवीला इथे आणायचं नाही!’

‘ बाबा ऐकलं का ?’ मधुरा हसत बोलली . ते ऐकून शकुंतला अधिकच चिडली,

‘ तुम्हाला मस्करी वाटतेय का ?’

‘ तसं नाही आई. एखाद्या अडले पडलेल्या बाईला मदत केली तर काय बिघडलं?’

‘ पण तिला ह्यांनी वचन द्यावंच का ?’

‘ शकुंतला मी वचन दिलेलं नाही फक्त शब्द दिला आहे!’ माधवने समजावण्याचा प्रयत्न केला.

‘ त्याचा अर्थ तोच होतो.!’

‘ अगं मी शब्द दिला आहे प्रत्यक्षात माझ्या ओळखीने तिचं काम होईल याची शाश्वती नाही कारण एज्युकेशन खाते वेगळे आहे मी प्रयत्न करणार आहे, नाही जमला तर ती आपल्या माहेरी जाणार आहे!’

‘ हे कधी ठरलं ?’ शकुंतलाचा विश्वास बसला नाही.

‘ अगं जेव्हा मी त्या गावातून निघून इकडे आलो तेव्हा असं म्हटलं होतं. बरं तिला घटस्फोट मिळाल्याचे आता परवा कळले . हवं तर तू तिच्याशी बोल!’

‘ नको मला नाही बोलायचं!”

‘ मग मलाही नाही रोखायचं. प्रत्येक वेळी तुझंच म्हणणं कसं ऐकून घेऊ मी.!”

‘ द्या तिला फोन लावून बघतेच आता!” शकुंतला चिडून बोलली तोच अंजलीचाच फोन आला. माधव म्हणाला,

‘ तिने केला आहे नीट बघ .. हं. हॅलो.. काय झालं ? कुठे बोरीवली.. च्या पुढे? तो विभाग जवळपास आदीवासी भागात आहे. ते जाऊदे आधी माझ्या बायकोशी बोल.

‘ द्या.. ताई बोला कशा आहात?.. मी? मी काय सांगू.. माझं फुटकं नशीब घेऊन वणवण भटकतेय…कुठल्यातरी लांबच्या शाळेत बदली मिळण्याची शक्यता आहे…ओळख सोडा वस्ती चांगली नाही असं माझे नातेवाईक म्हणतात

हो घटस्फोट सुखासुखी झाला नाही.. नवऱ्याला फक्त पैसा हवा.

मुलगा झाला नाही ह्यात माझा काही दोश आहे का? आणि हल्ली मुलीसुद्धा घर चालवतात, आईवडीलांचं पालन पोषण करतात.. तुमचे साहेब देवमाणूस आहेत हो. तीनेक महिने आम्ही एका घरात होतो पण एकही वावगा शब्द त्यांच्या मुखातून आला नाही…अहो एक गंमत सांगते.. ते पिऊन आले होते आणि रात्री अंगणात झोपले . मध्यरात्री जाग आली मला ते काही तरी गुणगुणत आहेत असं कानावर पडलं.. सांगितलं त्यानी ? खरंच गंमत झाली.. चांगली शाळा मिळाली तर बोलवेना माझ्या घरी.

ठरल्याप्रमाणे शकुंतलाचे मामा आले. सत्तरी पार केलेले मामा निवृत्ती घेऊन बारीक सारीक सामाजिक कार्यकर्तेम्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्याकडे पाहिल्यावर ते अगदीच लेचेपेचे नाहीत हे कळून येत होतं. दिवाकरने आधीही

त्यांना पाहिलं होतं; पण ह्या क्षणी त्यांना कसं पटवून द्यावे ते लक्षात येईना. तरीही शकुंतलास म्हटलं,

‘ शकुंतला खूप दिवसांनी मामा आले आहेत तर हा दिवस आम्ही एंज्जॉय करायचा ठरवला आहे,तुझी परवानगी आहे का ?’ दिवाकरने भीती भीत विचारलं . तेव्हा ती म्हणाली,

‘ मामांना मामीने शपथ घातली आहे त्यामुळे तो विषय बंद झाला आहे, तुम्हाला काय करायचं आहे ते करा मामांना आग्रह करायचा नाही!” तिने स्पष्टपणे सांगितलं आणिदिवाकरचा डाव फसला. नंतर माधव दिवाकरला म्हणाला.

‘ आता मीच काय करायचं ते करतो तू फक्त हो ला हो कर!”

‘ बरं.!’. ००

दुपारी टेबलावर ताटं वाढली. मामा,माधव दिवाकर बसले . मामा म्हणाले,

‘ शकू मुलांना बसव आमच्याबरोबर!

‘ नको आम्ही बसू नंतर!”

‘ बरं जावई बापू सुरुवात करुया?’

‘ हो!”

‘ चला . आज खूप दिवसांनी आपण एकत्र आलो आहोत सोबत दिवाकर साहेब आहेत हा ही चांगला योग आहे!” मामांनी असं म्हणताच माधवला ठसका लागला!”

‘ अरे अरे माधव काय झालं? पाणी पी पाणी पी हं थांब जरा श्वास घे .. बरं वाटतंय ?’

‘ हो. करा सुरुवात!’

यानंतर भोजन सुरू झालं. मामांनी दोन तीन वडे खाऊन झाल्यावर म्हटलं,

‘ माधवराव तुमची बदली होणार आहे का शकु म्हणत होती.!” या प्रश्नावर दिवाकरने माधवकडे सूचक नजरेने असं बघितलं की घाबरू नकोस मी आहे.

‘ हो मामासाहेब बदली होणार आहे पण अजून जीआर निघाला नाही!”

‘ बदली होत आहे की तुम्ही घेत आहात?’ मामांनी पहिला डाव टाकला. माधव सावध होऊन म्हणाला,

‘ मामा मी एक साधा अधिकारी आहे. क्लास वन अधिकारी नाही तेव्हा ते मला पुण्यात काय गडचिरोलीतही पाठवू शकतात!” माधव सहजपणे बोलून गेला तेव्हा दिवाकरने मनातल्या मनात माधवला शाबासकी देऊन टाकली. म्हटलं च्यायला माधवने काय डाव टाकला व्वा! आता बघू हा म्हातारा काय बोलतो .

अगदी तसंच झालं. मामाची वाचा बंद झाली आणिशकुंतला ऑ वासून बघतच राहिली. आपला नवरा आधी असं कधी बोलला नाही आणिआज अचानक?डाव उधळून लावला. इकडे इतका वेळ स्तब्ध असलेले मामा म्हणाले,

‘ नको नको गडचिरोली नको. ते नाव ही नको. माझ्या माहितीतील एका पोलिस अधिकाऱ्याला तिकडे पाठवला होता त्याचे असे हाल झाले का सांगता सोय नाही.!”

‘ खरं आहे ते. तिकडे पाठवलं की ती व्यक्ती कशी परत येईल याची खात्री नसते!’ दिवाकर मामाना दुजोरा देत म्हणाला

‘ बरं ऑफिसमध्ये काही घोटाळा वगैरे?’ मामांना खात्री नव्हती तरी म्हटलं,

‘ तसं असतं तर माझं नाव घोटाळेबाज म्हणून पेपरला बातमी आली असती!”

‘ हं नाही शकु म्हणत होती की तुमची पुण्याला बदली होत आहे!” मामांनी परत एकदा चालवून बघितलं.

‘ होय मीच बोललो होतो तिला. खरं पुण्यात बदलीसाठी मी विनंती करत आहे,शासन मला दूरच्या ठिकाणी पाठवू शकत. शकुची काळजी वाटते म्हणून मी प्रयत्न करतोय.! माधवने जवळजवळ आपली बाजू मजबूत केली. तेव्हा मामा म्हणाले,

‘ तुम्ही बदली नका घेऊ . काही तरी कारण सांगून बघा!”

‘ बघेन तसं प्रयत्न चालू आहे!’ माधव साळसूदपणे म्हणाला आणिप्रकरणावर पडदा पडला. शकुची कुचंबणा झाली,आपण ज्या विषयावर चर्चाकरायला मामांना बोलावलं होतं तो विषय जागीच थांबला.

भोजन झाल्यानंतर मामांनी थोडी विश्रांती घेतली व आपल्या घरी निघून गेले.

संध्याकाळी दिवाकर आणिमाधव ठरलेल्या जागी एकत्र आले. दिवाकर म्हणाला,

‘ माधव यार तू वकील व्हायला हवा होता रे. मामांना असा चकवा दिला की अंजली प्रकरण बोलायचं धाडस झालं नाही. खरंच ग्रेट आहेस तू. चल आता सगळा खर्चमाझा.

‘ ते जाऊदे मामा थंड पडले हे नक्की!”

‘ माधव तुला ते गडचिरोलीचं कसं काय सुचलं?’

‘ माझं दैव आयत्यावेळी धावून आलं. खरंच रे मी शकुंतलाला फसवू शकत नाही आणिअंजलीला दिलेला शब्द मोडू शकत नाही. अशी माझी द्विधा अवस्था झाली आहे!”

‘ पण मी म्हणतो .. कारण सांगून तिला थांबवू शकत नाहीस?’

‘ नाही आता मी निश्चय केला आहे, तिला बदली मिळवू ‘न देईन तेव्हाच स्वस्थ बसेन!” .

‘ या धांदलीत तुझा संसार विस्कटण्याचा धोका आहे!”

‘ नाही विस्कटणार मी एखाद्या बाईला शब्द दिला म्हणून तिला डोक्यावर बसवून घेणार नाही!”

‘ तू स्वतःला भगवान श्रीकृष्ण समजतोस का ? एकाच वेळी रुक्मिणी आणिराधेशी जवळीक.!”

‘ दिवाकर राधेचं प्रेम लोकांना कळलंच नाही. राधा ही कृष्णाची सखी अशी होती की तिने कधीच प्रणयाचं उल्लंघन केलं नाही असं अभ्यासक म्हणतात. ते प्रेम इतकं उत्कट होतं की बघ जगात कृष्ण रुक्मिणीपेक्षा राधा कृष्णाची मंदिरे जास्त आहेत. त्या प्रेमाची अशी महती आहे की जगभरातील लखो तरुण आपलं घरदार सोडून भारतात वेडे होऊन भारतीय वेशभूषा करून, गुळगुळीत डोक्यावर शेंडी ठेवून भजन गात नाचत असतात.!”

माधवचे हे भावपूर्णउद्गार ऐकून दिवाकर इतका प्रभावित झाला की, हातातील काजू दाणे हातातच राहिले. म्हणाला,

‘ माधव खरंच तू वाटतोस त्यापेक्षा हुशार आहेस!’ दिवाकर भारावून म्हणाला तेव्हा माधव हसत म्हणाला

‘ म्हणजे मी आधी बावळट वाटत होतो.!”

‘ हां हां हां हां हां ‘ आयला काय बोललास रे तुला खरंच मानायला पाहिजे.!”

‘ म्हणून तुला सांगतो राधा कृष्णाच्या प्रेमाची जगात कुणाशीही तुलना होऊ शकत नाही चला आता उठ! “

‘ धन्यवाद आता उठा महोदय.!’ ००

दोघे उठून उभे राहिले तोच माधवच्या फोनची रिंग वाजली पाहिलं तर फोनवर अंजली,

‘ कोण ? दिवाकरने विचारलं.

‘ हे बघ!’ असं म्हणत मोबाईलवरील नाव दाखवलं. ते पाहून दिवाकरला चेष्टा करायची लहर आली म्हणाला, हसत म्हटलं,

‘ बघ तुमचं प्रेम चिरंजीव आहे!’

दिवाकरने कपाळावर हात मारत फोन घेतला.

‘ हं बोल!’

‘ सर मुंबईत बदली मिळत नसेल तर परत मला गावी जायला आवडेल; पण कोकणात त्याही पेक्षा रत्नागिरीत चालेल. माझा आणिसासरचा संबंध तुटला असला तरी माहेर कसं तुटेल ? .. तुम्ही बोलत का नाहीस?”

‘ अगं ऐकतोय मी. मध्ये मध्ये बोलायचं नसतं. आणिहे बघ तू मुंबईत राहायचं ठरवलं आहे व मी ही तसाच प्रयत्न करत आहे मग गावी जाण्याचं का म्हणत आहेस? माधव किंचित चिडला.

‘ सर काय करू ? दोन्ही मार्गबंद कसे करु ? तुम्ही माझ्या पाठीशी आहात हे खरं असलं तरी मुंबई आणिग्रामीण भाग ह्याच्यात पगाराची थोडीफार तफावत असते.. ’

‘ तो विषय तुझा नाही मी तुला मुंबईत बदली मिळवून देणार म्हणजे देणारच हा माझा शब्द आहे!’बोलताना माधवचे शब्द तुटत होते ते पाहून अंजलीने बरोबर ओळखलं म्हणाली,

‘ सर आता तुम्ही थोडीशी…” तिला पुढे बोलायला धीर झाला नाही. माधव मात्र हसला म्हणाला,

‘ तू अगदी मनकवडी आहेस वेडी कुठली!’ माधवचे हे उद्गार ऐकून दिवाकर हसत म्हणाला,

‘ काय म्हणतात बाई ?’

‘ तिने मला घेतलीय का विचारलं!”

‘ घ्या मरा आता. आणितू अगदी असा घायाळ झालेला आणिम्हणे’ “ आमच्यात काही तसं नाही” हां हां हां हां. ”

‘ लाव अजून काडी लाव.. च्यायला मी कसल्या विवंचनेत आणितुला मस्करी सुचतेय!”

‘ भिऊ नकोस ती तुझ्या पाठीशी आहे!”

‘ तू स्वतःला समर्थस्वामी महाराज समजतोस का?

‘ मी काही अधिक बिघडू देणार नाही!”

“ म्हणजे तू ऐनवेळी पाठ दाखवून पळणार.!’ असं बोलत बोलत दोघे बाहेर पडले. ००

मे महिना सुरू झाला होता, मधुराने एकदा संध्याकाळी जेवण करता करता विचारलं,

‘ बाबा या वर्षीआपण गावी जाणार नाही?’

‘ अं…म्हणताना माधव कुचमला.

‘ काय झालं? अचानक थांबलात!”

‘ नाही जाऊन यायचं आहे पण माझी बदली..!”

‘ ती बदली होईल तेव्हा होईल आपण पंधरा दिवस जाऊया ना. मला जॉब लागला की जायला जमणार नाही!”

‘ तुला कुठे जॉब मिळतोय?’ माधवने विचारलं .

‘ मी एका ठिकाणी इंटरव्ह्यू दिला आहे!”

‘ मला का सांगितलं नाही? मी फोन लावला असता.!’

‘ आधी नको आधी माझ्या शिक्षणाचा उपयोग होतोय का बघते.!”

‘ चांगली गोष्ट आहे, आणितू रे ?”

‘ माझा जॉब नक्की आहे मी गावी येणार नाही!” चिरंजीव म्हणाला.

‘ इथे राहून तू खाणार काय?’

‘ आई आहे ती येत नाही!’ चिरंजीव म्हणाला. माधवने शकुंतलाकडे पाहिलं. ती नजर चुकवत होती. ती आपल्यावर नाराज आहे व तिची नाराजी कशी घालवायची हे माधवला कळत नव्हतं.

खूप वेळाने माधव म्हणाला,

‘ गाडी कोण चालवणार ?”

‘ मी,!” मधुरा भावाकडे बघत म्हणाली ते ऐकून तो चिडला,

‘ तू चालवणार? मुंबईत समोरून बस आली तर तुला घाम फुटतो!”

‘ मग तू आम्हाला सोडून ये!’ मधुरा हसत बोलली.

‘ ठरलं तर!”

‘ ठरलं गावी काका काकू आहेत काळजी नाही!” माधव आपल्या बायकोकडे बघत म्हणाला

ते ऐकून शकुंतला चिडचिडत म्हणाली,

‘ जा सगळ्यांनी मला काय इथे काय तिथे काय सगळं सारखंच!” शकुंतला जेवण आटोपून उठली तेव्हा चिरंजीव म्हणाला,

‘ बाबा तुमची बदली खरंच गडचिरोलीला होत आहे?’

आपल्या लेकाचा प्रश्न ऐकून माधव गंभीर चेहरा करून म्हणाला,

‘ ते नाही तर लातूर नक्की!” माधव जरा उंच आवाजात बोलला ते ऐकून शकुंतला आतून आपल्या मुलांना म्हणाली,

‘ त्यांना म्हणावं नका घेऊ बदली राहा इथेच, काय धिंगाणा घालायचा आहे तो इथेच घाला.!”

तिचा टोमणा ऐकून माधव हसला.

‘ बाबा हसता तुम्ही?’ कन्येचा प्रश्न.

‘ मग काय करणार? इतका वेळ समोर बसली होती तेव्हा बोलायचं!”

‘ आई इकडे येऊन बोल ना, मला कशाला मध्ये घेता?’ मधुरा वैतागून बोलली.

‘ लाडू राहूदे. विषय वाढवू नकोस मी काय ते बघतो. ००

ऑफिसमध्ये माधव आपल्या कामात व्यस्त असताना वरिष्ठ साहेबांनी बोलावलं म्हणून तो केबिनमध्ये गेला.

‘ नमस्कार सर!’

“ नमस्कार! हं तर तुम्हाला शिक्षण विभागात बदली हवी!’

‘ मिळाली तर बरं होईल, माझ्या नोकरीची सुरुवात त्याच विभागातून झाली होती!”

‘ बरं. माधवराव अडचण अशी आहे की अजून दोन जणांना त्याच विभागात बदली हवी!”

‘ सर मुख्य काम आहे ते तुम्हाला ठाऊक आहेच!”

‘ होय . काय आहे, आपण सगळे हुकुमाचे ताबेदार असतो. आमच्या वर वरिष्ठ त्यांच्या वर वरिष्ठ असं चक्र आहे त्यामुळे.. तुम्ही तसे कोणत्याही

प्रकरणात अडकलेले नाहीत याची मला माहिती आहे. तर मी काय म्हणतो तुम्ही सद्या याच खात्यात रहा त्या बाईंना मुंबईत शाळा हवी आहे ना ? तर ते होईल, त्याआधी कोणत्या शाळेत रिक्त जागा आहे याची माहिती मिळवा. म्हणजे इतर कुणावर हे काम संपवण्यापेक्षा स्वतः शोध घ्या.!”

‘ हे काम कठीण आहे सर, मुंबईत इतक्या शाळा आहेत त्यात काही बंद पडल्या आहेत काही शाळा दुसऱ्या शाळेत वर्ग. आल्या आहेत!’

‘ दुसरी गोष्ट अधिकाऱ्यांचे संबध हा एक वेगळाच असतो.!”

‘ बरं त्या बाई कोण आहेत?’ .

‘ सर आम्ही एकाच घरात अर्थात घराच्या दोन भागात तीनेक महिने राहिलो. मला जेवणाची गरज होती आणिबाईंना सोबतीची गरज होती. तुम्हाला अनुभव आहेच की शेजारी जरा आजारी पडला तर दुसरा शेजारी त्या घरात

जायला भीत असे, अशावेळी आम्ही कोण कुठल्या जातीचा याचा विचारच केला नाही बरं आडनावावरून जातीचा पत्ता लागत नाही,तुमची जात कोणती? असं विचारावं तर थेट पोलिस ठाणे.!"

' बरोबर आहे. माधवराव आता मी खरं बोलतो, माझ्या मेव्हण्याला पुण्यातून मुंबईत बदली हवी आहे तेव्हा काही महिने तुम्ही पुण्यात जा. तुमचं काम मी त्याच्याकडून करून घेईन.!'

हे ऐकून माधवला आनंद झाला.

' सर हे तर सोन्याहून पिवळं झालं!"

' हो पण ही बातमी फोडायची नाही माझ्या बायकोचा भाऊ म्हणजे नको त्या जागचं दुखणं. मी एवढा मोठा अधिकारी;पण घरी माझं काही चालत नाही!' साहेब प्रामाणिकपणे बोलले ते ऐकून माधव म्हणाला,

' सर हे सगळीकडे असतं कुणी कुणाला बोलत नाहीत इतकंच!'

' हो खरं आहे माधवराव!"

' सर शाळा उघडायला महिनाभर आहे त्यापूर्वीकरा!"

' करतो त्यापूर्वीसांगितलं ते करा. आणिहे बघा आपल्याला कुणाच्याही जातीला दोश द्यायचा नाही,जात पात हे माणसांनी आपापल्या सोयीनुसार घडवून आणले आहेत. सर्वप्राणी मात्र ईश्वर निर्मित आहेत हे मी चांगलं जाणतो ;पण शासनाने समाजाच्या विकासासाठी काही प्रवर्गतयार केले. ते केले नसते तर एक समाज कायम चिखल तुडवत राहिला असता आणिएक समाज त्यांना

राबवून घेत राहिला असता. लोक जातीपातीवरून मारामारी करतात हे सगळं निंदनीय आहे;पण आपलं ऐकतंय कोण?'.

आपल्या साहेबांच्या मुखातील हे बोल ऐकून माधव भारावून गेला. वरवर खडूस वाटणारा साहेब मनातून किती निर्मळ आहे याची प्रचिती आली. त्याने साहेबांना अक्षरशः हात जोडले. ००

माधवने दुसऱ्या दिवशी अंजलीला फोन केला,

' बोला सर!"

' ते सर वगैरे राहुदे मला तुझ्याशी बोलायचं आहे!" माधव म्हणाला.

' बोला!"

' फोन वर नको बाहेर कुठेतरी?"

' बाहेर? अंजलीने चमकून म्हटलं.

' अगं तसं बाहेर नाही

तू आता तुझ्या भावाकडे राहतेस ना ?'

' तो माझा सखा भाऊ नाही मामेभाऊ आहे.!"

' चालेल पत्ता पाठव रविवारी दुपारी येईन चालेल ?'

' चालेल!"

' त्याला संशय येणार नाही ना ?"

' नाही हो. चांगला आहे दादा सद्या मला त्याचाच आधार आहे!"

' ठीक आहे येतो!'. ००

ठरल्याप्रमाणे माधव पत्ता शोधत शोधत बोरिवलीला तिच्या घरी पोचला. सर्वांनी त्याचं हसतमुखाने स्वागत केलं. माधवने पिशवीतून एक मोठं कॅडबरी चॉकलेट चिनुच्या हातात दिलं ती एकदम खुश झाली .

नंतर चहापाणी झाल्यावर माधवने अंजलीला म्हटलं,

‘ तुझं काम होत आहे फक्त तू ओपन

मध्ये आहात की अनुसूचित जाती वगैरे? म्हणजे राग मानू नकोस,!”

‘ राग कशाला? आहे ते आहे. आम्ही माळी समाजात मोडतो!”

‘ म्हणजे अनुसूचित जाती ना ?”

“ हो! ‘

‘ तसा जातीचा दाखला आहे का ?’

‘ हो आहे दाखवू का ?’

‘ दाखव!’

तिने बॅगेत शोधाशोध करून दाखला दाखवला. माधवने त्याचा मोबाईलवर फोटो काढून ठेवला. व म्हटलं,

‘ सद्या मराठी शाळा बंद पडत आहेत तरी बाहेरगावी अजून आहेत. माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तशी सूचना केली होती आता काम होईल!’ माधव सुटकेचा निःश्वास टाकत म्हणाला .

‘ मग तुमची बदली होणार नाही?” अंजलीने विचारलं,

‘ बदली घेतल्यामुळेच हे काम होत आहे!”

‘ म्हणजे नक्की काय समजलं नाही!’ अंजलीला काहीच न समजल्यामुळे म्हटलं,

‘ ते महत्त्वाचं नाही. मी पुढचं बघतो,ते झालं की मी तुला दिलेला शब्द पुरा होईल!” माधवचे हे आश्र्वासित शब्द ऐकून अंजलीचे डोळे भरून आले. तिला तिच्या भावाने आणिवहिनीने समजावून शांत केले. माधव म्हणाला,

‘ मी निघतो!’

‘ साहेब आता जेवून जा. आज एकादशी आहे तरी तुमच्याकडे आज आम्ही पुरणपोळीचा बेत केला आहे!” भाऊ म्हणाला. ते ऐकून माधव हसला.

‘ पुरणपोळी म्हटल्यावर मला ते दिवस आठवले!’ हे वाक्य ऐकून अंजली खूष झाली . वहिनी विचारात पडली तेव्हा अंजलीने लॉकडाऊनमध्ये एकदा पुरणपोळीवर कसा ताव मारला होता हे सांगितलं तेव्हा सगळे हसत राहिले.

जेवायला खाली ताटं मांडली होती. अंजली म्हणाली,

‘ सर आमच्याकडे डायनिंग टेबल वगैरे नाही खाली बसून जेवण घेतो!”

‘ त्यात काय एवढं, आम्हीसुद्धा तेच करत होतो आता ती एक फॅशन झाली. असं म्हणत तो खाली बसला. बघतो तर ताटात पोळयांचा ढीग .

‘ अहो एवढ्या पोळया मी खाऊ शकत नाही!”

‘ तुम्हाला तूप लावलेल्या पोळया दुधातून आवडतात म्हणून असा बेत केला आहे!’ अंजली लाजत म्हणाली

‘ तरीही हे काय शेरभर दूध अरे बापरे. चार पोळया आणिग्लासभर दूध पुरे!”

‘ तरी घ्या हो चिनू पाचसहा सहज खाते!” अंजलीने चिनुचं कौतुक करत म्हटलं तेव्हा चिनू लाजली.

नंतर हव्या तेवढ्या पोळया घेतल्या. सगळयांनी खाली बसून पुरणपोळी खात गप्पा गोष्टी करत अंजलीचं काम झालं या विचाराने आनंद साजरा केला.
००

माधव निघणार तोच मधुराचा फोन आला. त्याने फोन कट करून सर्वांना बाय करून तिथून बाहेर पडला . व नंतर उलट फोन केला

‘ काय झालं?”

‘ बाबा जेवायला कधी येणार? आम्ही थांबलो आहोत!” मधुरा म्हणाली.

‘ तुम्ही जेवून घ्या. मी एका कामासाठी आलो आहे तिथे माझं जेवण झालं!” माधव म्हणाला.

‘ तुम्ही जेवलात ?”

‘ हो!”

‘ अगं आई ते जेवून येत आहेत!”

‘ आधी सांगायला काय झालं?’ शकुंतला चिडली ते शब्द माधवने ऐकून म्हटलं

‘ लाडू मला खूप भूक लागली होती आणिघरी यायला उशीर होईल म्हणून थोडं खाऊन घेतलं.! ‘ असं म्हणत असताना त्याने खोटीच ढेकर दिली. मधुराने त्याची चोरी बरोबर पकडली.

‘ बाबा एवढी मोठी ढेकर दिली आणिथोडं खाल्लं काय?,आता या घरी,आई करेल बरोबर हंहंहंहं “

‘ काय पोरगी आहे बरोबर पकडलं!’ असं म्हणत स्वतःशीच हसला. ००

एके दिवशी संध्याकाळी माधव ऑफिसमधून घरी आला आणिहाश्यहुश्य करत बसला होता. मधुराने पाहिलं व लगेच पाणी आणून टेबलावर ग्लास ठेवत म्हटलं,

‘ बाबा पाणी प्या आधी, बरं वाटत नाही का?”

‘ हं तसं काही नाही जरा थकवा आला आहे थोडी कॉफी करायला सांगू ?’

‘ तू कर तुझी आई माझ्याशी नीट बोलत नाही!’ माधव म्हणाल्याबरोबर आतमध्ये काहीतरी पडल्याचा आवाज आला. मधुरा आपल्या वडिलांना म्हणाली,

‘ बाबा आईने ऐकलं काहीतरी फुटलं वाटतं!’ असं म्हणत स्वतः खुसुखुसू हसली.

‘ हसू नकोस तुला पण शिक्षा होईल!’

‘ हं काय पडलं आई ?” असं म्हणत ती सैंपाकघरात गेली. रात्री जेवण वगैरे झाल्यावर माधव सगळ्यांना उद्देशून म्हणाला,

‘ येत्या एक तारखेपासून माझी मी पुण्याला बदली होत आहे व मी राहायला जात आहे!” असं जाहीर करून बेडरूममध्ये झोपायला गेला. ००

पंचवीस में रोजी माधव आपल्या केबिनमध्ये बसला होता तोच शिपाई आला,

‘ सर साहेबांनी बोलावलं आहे!’

‘ हो चल आलो!” असं म्हणत तो वरिष्ठ साहेबांच्या केबिनमध्ये जाऊन उभा राहिला

‘ गुड मॉर्निंग सर!”

‘ मॉर्निंग. बदलीचा जीआर निघाला तूमची पुण्यात रवानगी होत आहे आणिआपला नवीन अधिकारी इथे येत आहे, कोण ते तुम्हाला ठाऊक आहे. तर आता मला सांगा त्या बाई कोणत्या कॅटेगरीत मोडतात!

‘ अनुसूचित जमाती!’

‘ झालं काम समजा. दहीसर पूर्वेला एका शाळेत एक जागा आहे तिथे मराठीचे शिक्षक हवेत म्हणजे काम झालं. तरी तुम्ही माझ्या मेव्हण्याशी बोलून घ्या म्हणजे खात्री होईल!” साहेब म्हणाले ते ऐकून माधव खूष झाला. म्हणाला,

‘ सर तुम्ही बोललात आता मी कशाला बोलू ?”

‘ बोलून घ्या. त्यामुळे एक नवीन ओळख होते. आपल्यात ओळखिचं नातं निर्माण झालं की बरंच काही करता येतं.!” साहेबांनी समजावून सांगितलं तेव्हा माधवने फोन घेऊन बोलणं केलं.

‘ झालं मनासारखं?”

‘ होय सर खूप खूप धन्यवाद!’

‘ काही गरज नाही उलट माझ्या शब्दांना मान देऊन तुम्ही पुण्यात जायला तयार झालात या बद्दल मीच तुमचे आभार मानायला हवेत. ’ साहेब प्रांजळपणे म्हणाले.

‘ राहूदे सर आपणच एकमेकांना उपयोगी पडतो यात कसले आभार. असो सर मी आताच जाऊन शाळा शोधून काढतो.!”

‘ तुम्ही निघा मी इकडे बघतो!” अशी परवानगी मिळताच माधव बाहेर पडला.

एक जून उघडला शाळेत नवीन नवीन मुलांचं नाव दाखल करण्यास सुरुवात झाली. अंजलीला चिंता लागून राहिली की आता आपल्या लेकीला कुठे प्रवेश मिळणार. तिने माधवला फोन लावला,त्याने फोन घेऊन म्हटलं ‘ मी तिकडे येतोय ’ त्याचं हे उत्तर ऐकून अंजलने म्हटलं

‘ या मी वाट पाहाते!’

माधव तिथे पोचला. म्हणाला.

‘ चल आपल्याला शाळेची महिती काढायची आहे. दहीसर पूर्वेला एक मराठी शाळा आहे तिथे एक रीक्त जागा आहे. इकडे कोणी सांगू शकेल का ?”

तिने शेजारच्या लोकांना विचारलं तर त्या भागाची माहिती कोणी सांगेना. माधव म्हणाला,

‘ दहीसरला जाऊन रिक्षा करून गेलो तर रिक्षावाले सांगू शकतात!”

‘ माझ्या भावाला माहिती असू शकते पण आता तो कामावर आहे.!’

‘ ते राहूदे, आजच्या आज मला माहिती काढून आमच्या साहेबाना सांगायचं आहे, रिक्षा…!’

‘ बसा . कुठे जाणार?’

‘ दहीसर पूर्वेला एक मराठी शाळा आहे तिकडे घे!’

‘ साहेब मराठी शाळा बंद पडत आहेत आणितुम्ही कशाला जाता ?’

‘ ए बाबा असं म्हणत माधवने आपला आयडी दाखवलं. त्याबरोबर तो घाबरत म्हणाला

‘ साहेब दोन तीन शाळा आहेत तिकडे मी घेऊन जातो. साहेब शाळा बंद आहेत आता कशी तपासणी करणार?’

‘ ते सोड शाळा तरी भेटू दे.!”

दोन शाळा बघितल्या त्या नव्हत्या. शेवटी एक शाळा भेटली . सुरक्षा रक्षक होता त्याला आयडी दाखवताच तो घाबरून उठला.!”

‘ साहेब तुम्ही म्हणता ती हीच शाळा आहे!”

‘ इथे एका शिक्षकाची गरज आहे ना ?’

‘ होय वार्षिक परीक्षेचा रिझल्ट दिला तेव्हा इथले हेड गुरुजी बोलले होते!”

‘ मग हीच शाळा. बरं प्रवेश प्रक्रिया कधी सुरू होणार आहे?’

‘ ते मला नाही सांगता येणार? मी फक्त गार्डनला पाणी देतो आणिशाळा सांभाळतो.!”

‘ बरं ठिक आहे!”

‘ सर आपलं नाव ?

‘ मी नंतर येईन!”. असं म्हणत ते रिक्षात बसले. सिक्युरिटी गार्डविचार करत राहिला,कोण साहेब होता ? आणिकाय तपासणी करायला आला होता?’

माधव परत आपल्या ठिकाणी आला ‘ किती पैसे झाले?’

‘ पैसे??’ तो विचार करत होता की किती सांगावेत?’ माधवने ओळखून म्हटलं

‘ अरे काय होतात ते घे!’ असं म्हणत त्याने रीतसर पैसे घेतले व निघून गेला.

‘ अंजली आता तुझी काळजी मिटली.!’

‘ हो सर आता घरी चला चहा घेऊन निघा!”‘

दोघं घरी येताच अंजलीने माधवच्या पायावर डोकं ठेवलं. त्याक्षणी तिचे डोळे भरून आले.

‘ एवढं करायची गरज नव्हती. नशीबात काही गोष्टी बिघडतात तेव्हा काही गोष्टी घडत असतात ह्यालाच जीवन म्हणतात.!’ माधव म्हणाला.

तोवर तिच्या वहिनीने पाणी आणून दिलं. व तिने माधवचे आभार मानले.

म्हणाली,

‘ साहेब तुम्ही देवासारखे धावून आलात.!”

‘ माणसं देवासारखी कशी असतील. आपण आपलं असं म्हणतो.!”

‘ काय पण असुदे संकाटात सापडलेल्या माणसाला मदत करतात त्यांना देवमाणसं म्हणायची पद्धत आहे हो.!”

‘ बरं आता एका. अंजली खूप सुस्वभावी आहे म्हणून तिचा घास देवानेच राखून ठेवला होता असं समजा.!”

‘ खरंच आहे साहेब. तरी आमच्यासाठी तुम्ही देव आहात!”

‘ बरं तुमचं घर तसं लाहानच आहे. हिची शाळा सुरू झाली की तुमच्या जवळपास भाड्याने एखादं घर मिळवून द्या म्हणजे आपलं काम संपलं. तुमच्या सोबतीची तिला गरज आहे!”

‘ बघुया सध्यातरी ती आमच्याकडे राहील. माझ्या घरच्यांची हिच्यावर माया आहे!’ ती वहीनी सहज बोलून गेली . ००

माधव दुसऱ्या दिवशी ऑफिसला हजर झाला. वरिष्ठ अधिकारी हजर होताच त्यांना भेटून म्हणाला,

‘ सर ती शाळा सापडली. आता ही कागदपत्रे बघा आणितिच्या बदलीची व्यवस्था करा. तसेच माझ्या बदलीची ऑर्डर द्यावी. मी पुण्याला जायची तयारी करतो.!”

असं म्हणत माधवने साहेबांना हात जोडले. साहेब म्हणाले,

‘ माधव तुम्ही वर्षभर राहा नंतर मी तुम्हाला परत मुंबईला बदली देईन. पुणे काही फार लांब नाही व माझी शेवटची दोन वर्षेबाकी आहेत त्यापूर्वीतुम्हाला मुंबईत बदली मिळवून देण्याची जबाबदारी माझी आहे याची खात्री असुदे.!’

‘ सर आज मलाही आनंद होतोय, एका पीडीत महिलेला पुढील वाटचाल सुखाची होण्यासाठी माझ्यापेक्षा तुमचं सहकार्यमिळाले नाहीतर आपल्याकडे काय गोंधळ असतो त्यावर न बोललेलं बरं. सर मी उद्या सकाळी येऊन ऑर्डर हातात घेतो.!”

‘ या ठीक आहे!”

माधव तिथून घरी आला. दुपारीच आल्यामुळं मधुराने म्हटलं,

‘ बाबा लवकर घरी!”

‘ हो. माझी पुण्याला बदली झाली. मी उद्या सकाळी ऑर्डर घेऊन संध्याकाळी पुण्याला जाणार आहे!” त्याने आपल्या बदलीची जवळजवळ घोषणा केली. शकुंतला जवळ बसली होती तिच्या डोळ्यात टचकन पाणी तरारले. तर मधुरा रडवेली झाली.

‘ बाबा..!” हे. यापुढे तिला बोलवेना. उठून माधवला बिलगुन डोळे पुसत राहिली. बराच वेळ कुणीच बोलत नव्हतं. इतक्यात चिरंजीव हजर झाला. समोरचं दृश्य पाहून दचकला. आईचे डोळे भरून आलेत बहीण वडिलांना

बिलगुन रडत आहे हे पाहून तो मटकन समोरच्या खुर्चीवर बसला. माधवने ओळखलं तो घाबरला आहे. म्हणून हसत म्हणाला,

‘ अरे घाबरू नकोस माझी पुण्याला बदली झाली म्हणून लाडू रडतेय.!’ आपल्या वडिलांच्या मुखातील हे उद्गार ऐकून चिरंजीव सुटकेचा निःश्वास टाकत म्हणाला,

‘ असं होय मी काय घाबरलो होतो. ह्या रडूडाईनं घाबरवलं मला. येडी, बदली झाली यात काय रडायचं; उलट आपली आता मजा झाली. शुक्रवारी सायंकाळी बाबांकडे जायचं आणिसोमवारी सकाळी किंवा संध्याकाळी पुन्हा मुंबईला यायचं हाय काय त्यात!” चिरंजीव मधुराच्या पाठीवर थापटी घालून म्हणाला. ती चिडली. म्हणाली,

‘ बाबा तिकडे एकटेच जात आहेत त्यांची खाण्यापिण्याची व्यवस्था कोण करणार?”

‘ आई करणार आणिदुसरं कोण करणार?” तो हात उडवत बिनदिक्कतपणे म्हणाला.

‘ आणिइकडे आपण दोघेच?’

‘ मग त्यात काय? मी लवकरच जॉबला जॉईंट होणार आहे, तुला काही कामधंदा नाहीच. अभ्यास आणिम्हणजे पुढे काही शिकायचा विचार करणार नसशील तर घरी बसून काय करणार? स्वयंपाक पाणी करायला शिकायला नको? नवऱ्याने विचारलं,

‘ मुलीला स्वयंपाक करता येतो का ?’ या प्रश्नावर आम्ही हो म्हणू शकतो . हो की नाही बाबा!” चिरंजीवाचे हे बोल ऐकून माधवला हसू आवरेना,मधुराही हसली आणिशकुंतला डोळे पुसत किंचितशी सहलीच. मधुराला राहवेना ती उत्साहित होऊन म्हणाली,

‘ बाबा मी पण येणार!’

‘ आपण सगळेच जाणार आहोत!” शकुंतलाने आपला रुसवा सोडत म्हटलं.

‘ सगळे कशाला?’ चिरंजीव कुरकुरला.

‘ त्यांची सगळी व्यवस्था लावून काही दिवस राहून येऊ. राहण्याची व्यवस्था कुणी करायची ?’

‘ आपल्या बायकोकडे बघत माधव म्हणाला,

‘ शासकीय निवासस्थानी राहायचं . तेथील अधिकारी मुंबईत बदलीवर येत आहेत म्हणजे ते परवा आलेच आहेत. त्या घराची स्वच्छता सुरू आहे,आज होईल बहुतेक म्हणून उद्या संध्याकाळी निघायचं. तिकडे बेड,टेबल खुर्चीपंखा वगैरे सगळं आहे आपण फक्त बेडशीट, अंथरूण पांघरूण,कपडे वगैरे घेऊन जायचं आहे!” माधवने बदलीसाठी केलेली रदबदलीचा उल्लेख चाणाक्षपणे टाळला.

‘ बाबा आपण तिकडे गेल्यावर मस्त फिरुया. मला पुरंदर किल्ला,सिंहगड किल्ला आणिबरंच काही बघायचं आहे!’ मधुरा म्हणाली तेव्हा तिचा भाऊ तिला चिडवत म्हणाला

‘ छे पुण्यात फार काही बघण्यासारखं नाही फक्त पर्वती आणिशनिवार वाडा एवढंच आहे!”

‘ चालेल ते बघायलाही मला आवडेल!’ आपली मुलं पुण्यात यायला उत्सुक आहेत हे पाहून माधवला आनंद झाला त्यापेक्षा शकुंतलाने यायची तयारी दाखवली याचं कौतुक वाटलं.

संध्याकाळी दिवाकरची भेट झाली, हॉटेलमध्ये चहा पीत बसले असताना दिवाकरने विचारलं.

‘ तू निघालास मग त्या बाईच्या बदलीचं काय होणार?’

‘ त्याची व्यवस्था झाली. अगदी योगासने झाली!’ माधव म्हणाला,

‘ म्हणजे कसं काय?’

‘ आमच्या वरिष्ठांच्या मेव्हण्याला मुंबईत बदली हवी होती. बायकोचा भाऊ म्हणजे म्हणालात ना अवघड जागेचं दुखणं ‘ तसं साहेबांचं झालं होतं,त्यांनी मला म्हटलं तुम्ही पुण्याला जा तुमचं काम होईल. ‘ अशाप्रकारे घडलेलं सगळं सांगितलं ते ऐकून दिवाकर म्हणाला,

‘ तुझं नशीब थोर आहे बाबा. एकाच दगडात दोन पक्षी.!’

‘ म्हणजे तुला नक्की काय म्हणायचं आहे?”

‘ हे बघ तू बाईला दिलेला शब्द खरा होतोय आणिबदलीमुळे प्रमोशन ही होतंय!”

‘ हो बरोबर आहे!”

‘ आणिडबल प्रमोशन ?’

‘ आता हे काय नवीन?’ माधवने म्हटलं.

‘ बाईंचं काम झालं त्याचं क्रेडिट तुला भेटेन आणिवर तुमची मैत्री अबाधित राहीली.!” दिवाकर डोळा मारत म्हणाला तेव्हा माधव दिङमूढ झाला.

‘ काय रे असा गप्प बसलास ?; दिवाकरने त्याची अवस्था पाहून विचारलं.

‘ अरे हे माझ्या मनातही आलं नव्हतं!’

‘ पण तुझ्या बायकोच्या मनात येऊ शकतं!’

‘ कसं काय? ‘

‘ मास्तरीण बाईंची बदली तू करून दिली हे केव्हा ना केव्हा शकुंतलाला कळेल. म्हणजे तिच्यासाठी तू हे केलं हे सिद्ध होणारच.!”

‘ याचा अंदाज मला आहे. कारण माझी एक वर्षासाठी बदली होत आहे. ते झाल्यानंतर मी मुंबईत येईन. शिवाय आठवड्यातून नाही पण पंधरा दिवसांनी इकडे येऊन जाईन कुटुंब सोडून या पूर्वीएकदा सहा महिन्यांसाठी गेलो होतो तेव्हा तरूण होतो. आता आपल्याला सर्वांची सोबत लागते.!”

‘ तू पुण्याला गेलास तरी शकुंतलाच्या मनातील संशय जाणार नाही,थोडा कमी होईल इतकंच.!”

दिवाकरचे उद्गार ऐकून माधव हसत म्हणाला,ते ‘ त्याची कल्पना मला आहे आणि तिने मला आधीच म्हटलं होतं. ‘ पुणं काय दोन अडीच तासांचा

प्रवास कधी पण येऊन जाल “ याचा अर्थ मी कुठेही असलो तरी तिच्या संपर्कात असेच.!”

‘ माधव पाहिलं? बायकांचे तर्कआपल्यापेक्षा किती प्रगत असतात.!”

‘ हंहंहंहंहं म्हणून पुरुष बायकांना घाबरतात!” माधव कबुली दिली.

‘ म्हणजे तू घाबरला आहेस!”

‘ थोडासा!” हां हां हां हां.

‘ आता माझं ऐक. शकुंतलाचा राग पूर्णनिवळला असेल तर सगळं व्यवस्थित होईल आणिसमजा.. ,

असं म्हणतात की कौरव पांडव युद्ध समाप्ती झाल्यानंतर भगवान श्रीकृष्णाने पांडवांचे पुन्हा स्थापना करून आपल्या द्वारकेला निघून गेला. ही गोष्ट राधेला कळली. म्हणून ती आपल्या सख्याला म्हणजे श्रीकृष्णाला भेटायला गेली. कृष्ण भेटीसाठी आतुर झालेली राधा थेट कृष्णाच्या दालनात गेली. तिधे कृष्ण ज्या मंचकावर किंवा आसनावर म्हणूया ती कृष्णाच्या शेजारी बसली. व आपल्या सख्याच्या पुनर्भेटीच्या आनंदाने ती देहभान विसरून कृष्णाकडे बघत राहिली. इतक्यात तिथे रुक्मिणी हजर झाली. तिंने ह्या दोघांना पाहिलं आणिती संतापली व रागाने बाहेर पडून दिंडीरवनात जाऊन रुसून बसली.

श्रीकृष्ण भानावर आला. रुक्मिणीचा रुसवा काढण्यासाठी काही दिवसांनी तिला शोधत शोधत आपल्या गोकुळातील सवंगड्याना घेऊन आला सोबत राधा ही दिंडीरवनात आली. सगळं गोकूळ गोपाळपुरला उतरले. काही दिवस

राहिले. भवगान श्रीकृष्णाने आपल्या सवंगड्याना घेऊन गायी गुरे राखली, सगळयांच्या गोरगरीब सवंगड्यांच्या भाकऱ्या मोडून त्याचा कालवा म्हणजे ‘ काला केला ‘ आणिवाटून वाटून खाल्ला. नंतर रुक्मिणीला शोधायला निघाला. तिच्या शोधात असताना वाटेवर पुंडलिक भेटला. आई वडिलांच्या सेवेत सगळ्या जगाला विसरून गेलेला हा आपला भक्त आहे तरी कसा म्हणून त्यांच्या दारात उभा राहून म्हणाला,

‘ पुंडलिका मी आलोय.. ”

‘.. . पुढचं सगळं माहीत आहे!’ माधव त्याला अडवत म्हणाला. तेव्हा दिवाकर म्हणाला,

‘ पुढचं ऐकावंच लागेल . तर,कृष्ण पुंडलिकाने टाकलेल्या विटेकर उभा राहिला व तिथेच अडकून पडला.

खरं म्हणजे अनेक अभ्यासक म्हणतात की रुक्मिणी रुसून आली वगैरे हे सर्वभगवंताचे नाटक होते. खरा प्रकार असा होता की दिंडीरवनात म्हणजे पंढरपूरात जगाला विसरून आई वडिलांची सेवा करणाऱ्या भक्त पुंडलिकाला जगासमोर आणून अमरपदी पोचवण्यासाठी तो आला होता. आईवडीलांची हीच ईश्वर सेवा आहे हे लोकांना पटवून देण्यासाठी भगवान श्रीकृष्ण पंढरपूरला आले आणिपुंडलिकासाठी विटेकर उभे राहिले. विटेकर अटळपणे उभा राहिला म्हणून तो विठ्ठल झाला.

अशा तऱ्हेने रुक्मिणीचा रुसवा काढण्यासाठी गेलेला आपला सखा श्रीकृष्ण गेला तरी कुठे म्हणून त्याला शोधत चंद्रभागेच्या काठाकडून शोधता

शोधता तिला हे दृश्य दिसलं. तिचे डोळे पाणावले. भगवान श्रीकृष्ण इथे अडकून पडला रुक्मिणी आपल्या जागी रुसून बसलेली आहे तिचा रुसवा गेलाच नाही,आता मी गोकुळात जाऊन काय करू ? असा विचार करून भगवान् श्रीकृष्ण अर्थात पांडुरंगाच्या पाठी जाऊन उभी राहिली. भक्त मंडळी असं म्हणतात की ती राधा अदृश्य रुपाने आजही पांडुरंगाच्या पाठी वास करत आहे. आपल्यासायख्या सामान्य लोकांना ती दिसत नाही.! '

एवढी कथा सांगून दिवाकर थांबला. त्याला दोन्ही हात जोडून माधव म्हणाला,

' महाराज आता या कथेचा सिद्धांत काय समजावा तेवढं सांगून भैरवी घ्या म्हणजे मी सुटलो.!"

दिवाकर स्तब्ध होऊन माधवला गंभीरपणे म्हणाला,

' माधव तू कितीही हात उडवलेस तरी तुझ्या मनातील राधा तुझी पाठ सोडणार नाही. हे लक्षात ठेव. यानंतर खरोखरच माधव आपल्या विचारचक्रात अडकून गेला. ००

पुण्याला निघण्यापूर्वीमाधव अंजलीला भेटायला निघाला.

' आता कुठे निघालात ?' मधुराने विचारलं,

' दिवाकरचा निरोप घेऊन येतो!" असं म्हणत तो बाहेर पडला. दिवाकरचं नाव सांगितलं;पण निघाला होता अंजलीचा निरोप घ्यायला. खाली उतरून रस्त्यावर आला. विचार करु लागला,तिला भेटायची काय गरज आहे? सगळं

काही तिला समजावून सांगितलं आहे आता भेटून काय वेगळं सांगणार ? तरीही निघालो आहोत. तिच्या सौंदर्याचा मोह आवरला होता तरी तो मोह का जागृत होत आहे? मन आवरत नाही का ? हा माझा दोश आहे की माझ्या मनाचा ? मन आणिमी वेगवेगळे आहोत का ? ओढ मनाला लागली आहे की .. नको जाऊया. ' असं म्हणत तो तिथंच थबकला,पाठी वळून पाहिलं क्षणभर मन सैरभैर झालं आणिपुन्हा पाय उचलले. आपल्या मनावर आपला ताबा नाही. मन ओढाळ गुरू म्हणतात तेच खरं.

अंजलीच्या घरी पोचला. तिने हसत त्याचं स्वागत केलं. तिच्या वहिनीने दिलेली कॉफी पिऊन कप टी पॉयवर ठेवून अंजली म्हटलं,

' अंजली तुझ्या शाळेचं काम झालं आहे तिथेच तुझ्या लेकीला भरती कर. मी उद्या पुण्याला जात आहे. माझी बदली झाली हे तुला सांगितलं होतं. तर आता तुला गरज लागली तर मला फोन कर . तुझा भाऊ आणिवहिनी तुझ्या सोबतीला आहेत काळजी करण्याचं कारण नाही. आता तू स्वतंत्र आहेस. आता तुझे स्वप्न पूर्णहोईल. आता तुझे

दिवस खऱ्या अर्थाने फुलायचे ' सुरू झाले असं समज आणितुझे निर्णय तूच घ्यायचे. मुंबईत स्वतःचे निर्णय स्वतःला घ्यावे लागतात. वहिनी तुम्हाला मी काही सांगू शकत नाही आणिमाझा तो अधिकारही नाही.. चला मी निघतो!" असं म्हणत तो उठला व निरोप घेऊन बाहेर पडला. एकदाच मागे वळून पाहिलं. अंजली डोळे पुसत उभी होती. हे दृश्य पाहून आपण काहीतरी हरवून जात आहोत असं माधवला वाटू लागलं त्याने पुन्हा पाठी वळून पाहिलं नाही. ००

घरी पोचल्याबरोबर शकुंतलाने म्हटलं,

‘ भावजींकडून यायला एवढा उशीर?’ हा प्रश्न त्याला अपेक्षित होताच. तो शर्टची बटणं काढत म्हणाला,

‘ घराची साफसफाई झाली की नाही हे सगळं विचारून घेतलं. शिवाय ऑफिसमध्ये काही फायली होत्या त्या निपटून आलो. नवीन अधिकारी अशा फायली न उघडता कुठेतरी टाकून ठेवतात ते होऊ नये म्हणून त्यांचा ताबा हेड क्लार्ककडे दिला.!’

असं म्हणत असताना आपण एवढं सफाईदार खोटं कसं बोललो? याचा विचार करू लागला. ००

निघताना माधवने सगळी तयारी करून गाडीत सामान भरलं व शेजारी, दिवाकर वगैरे मित्रांचा निरोप घेतला. गाडीत बसून गाडी चालू केली.

पुण्यात आल्यानंतर शासकीय रुम ताब्यात घेतली. शासकीय घर म्हणजे जसं रूक्ष असतं तसंच होतं फक्त वन रूम किचन असल्यामुळे एका कुटुंबाला राहाण्याच्या सोयीचं होतं

··· पेठेत चांगल्या वस्तीत होत. समोर प्रशस्त आवार आणिआवारात ऐसपैस पसरलेला एक जूनाट वटवृक्ष होता. त्याच्यावर पाखरे किलबिल करत होती. दोन मजली इमारतीत दोन दोन खोल्या होत्या. माधवच्या शेजारी एक कन्नड कुटुंब होतं. मधुराला हा नवीन परीसर खूप आवडला. मुख्य रस्त्यावर

गर्दीहोती विशेष म्हणजे पुण्यातील रिक्षा मुंबईप्रमाणे साईडचा विचार करत नाही त्या कुठूनही कशाही चालतात हे पाहिलं आणितिच्या मुखावर स्मित झळकलं.

दोन दिवस म्हणता म्हणता एक आठवडा झाला. शकुंतला मुंबईत जाण्याची घाई करत नव्हती पण चिरंजीव म्हणाला,

‘ आई मला केव्हाही कॉल येईल!”

‘ थांब रे कॉल येऊदे तेव्हा जाऊ!” मधुरा त्याला टाळत म्हणाली. तिला अजून काही दिवस राहायचं होतं. शनिवार वाडा आणिपर्वती पाहिली तरी बरीच ठिकाणं आहेत हे कळलं होतं. शकुंतला गप्पच होती.

‘ आई काय ते ठरव नाही तर मी आणिमधुरा जातो तू इकडे राहा!” चिरंजीवाने आपलं मत सांगितलं तेव्हा सगळे तयार झाले. दुसऱ्या दिवशी मधुरा म्हणाली,

‘ बाबा मी अधुनमधून मधून येईन. तुमच्या जेवणात काय लागतं ते आईने खानावळवाल्या मावशीला सांगितलं आहे आणिरोज फोन करा!”

जे शकुंतलाने सांगायचं ते मधुरा सांगत होती . शकुंतला माधवला पहिल्यांदाच दूर सोडत असल्यामुळे मनातून ती कष्टी झाली होती मुखातून शब्द उमटत नव्हते. ००

माधवने आपल्या कामाचा चार्जघेतला. मुंबईतून आलेला अधिकारी म्हटला की स्थानिक कर्मचारी जरा वचकून असतात. कोण कसा असेल?

फटकळ स्वभावाचा असेल की मनमिळावू हे कळायला काही दिवस लागतात हे माधव जाणून होता.

एके संध्याकाळी अंजलीने फोन केला,

‘ बोल कशी आहे? का फोन केला?” माधवने विचारले ते उत्तर ऐकून अंजलीला ग:हिवरून आलं. तो अस्पष्ट आवाज माधवने ओळखून म्हटलं,

‘ काही त्रास होतोय का ?’

‘ तेवढ्यासाठीच फोन करावा का ?’ तिने उलट म्हटलं. माधव गोंधळला,

‘ म्हणजे? नीट सांग!’

‘ अहो सहजच खुशालीसाठी फोन केला नवीन ठिकाणी कसं काय चाललंय हे विचारायचं होतं.!”

‘ अरे माझ्या लक्षात नाही आलं गं. नाही म्हटलं तरी मला इथे एकटं एकटं वाटू लागलंय. वय वाढलं की आपल्याला सोबतीची गरज लागते.!’

‘ सर ताईंना सोबतीला घ्या! ‘

‘ सद्या तरी नको शिवाय मुलांना जेवण कोण करून चालणार?’

‘ ते ही बरोबर आहे. बरं पुण्यातील जेवण आवडतं का ?’

‘ कोकणी बाई खानावळ चालवते म्हणून घरच्या सारखं नाही ; पण ठीक आहे. एक बरं झालं शुद्ध पुणेरी भाषा ऐकायला मिळते.!’

‘ आमची खान्देशी भाषा तुम्हाला नक्कीच आवडेल!’ अंजली आपल्या मातृभाषेचं कौतुक करत म्हणाली. तेव्हा माधव पटकन म्हणाला,

‘ हो का ? मग मी एक वर्षांनी जळगावला बदली मागून घेईन!’ माधवचे हे बोल ऐकून अंजली म्हणाली,

‘ नको नको तिकडं नको तुम्ही मुंबईत परत या!”

‘ कशाला? फिरूदे महाराष्ट्र मला. वेगवेडळ्या प्रांतातील

ग्रामीण बोलीभाषेची ओळख होईल.!”

माधवने परत गंमतीने म्हटलं तेव्हा ती निक्षून म्हणाली,

‘ नाही तुम्ही मुंबईतच यायला हवं!’

तिचा हा आग्रह पाहून ‘ तुझ्या मनात अंजली कायम राहणार आहे ‘ हे शब्द दिवाकरचे शब्द आठवले आणिएक अनामिक भीतीची लहर अंगभर धावून गेली. चेहेऱ्यावर चिंता पसरली. ००

चौदा जून रोजी दुपारी माधवला अंजलीचा फोन आला,

‘ हां बोल काय झालं?”

‘ आजपासून मी शाळेत रुजू झाले आणिचिनूचंही ॲडमिशन झालं!” अत्यंत उल्हासीत सुरात तिने बातमी दिली. ती बातमी ऐकून माधव म्हणाला,

‘ आनंद झाला. माझ्या शब्दातून मी मुक्त झालो.!”

‘ सर असं नाही बोलायचं!’ अंजलीने कळवळून म्हटलं तेव्हा माधव सावधपणे म्हणाला,

‘ आता नको बिझी आहे संध्याकाळी घरी गेल्यावर फोन करेन ठेव आता!”

‘ सर एक मिनिट. मुंबईत कधी येणार? मी पेढे घेऊन येईन.!

‘ ते नंतर बालतो आता मला मिटिंगला जायचं आहे!’ असं म्हणत त्याने फोन कट केला. त्याचिखात्री झाली की ही घरी पेढे घेऊन आली तर एकवेळ चालेल; पण तिच्या घरी जाणे नको!’

संध्याकाळी मधुराचा फोन आला

‘ बाबा उद्या येताय ना ?”

‘ नाही पुढच्या शनिवारी सलग तीन दिवस सुट्टी आहे तेव्हा येईन!’ माधव म्हणाला,

‘ बाबा या ना आम्हाला आठवण येते!’ मधुराने आळवणी करत म्हटलं.

‘ येऊदे तरी नाही जमणार. इथे मला काही इलेक्ट्रिकचं काम करायचं आहे!’

‘ बरं पण पुढच्या शनिवारी नक्की. की मी उद्या तिकडे येऊ?”

‘ नको गं मला काम करू दे आता!”

‘ ऊं…. ;’ ००

पंधरा दिवसांनी माधव परत मुंबईला आला त्याच दिवशी संध्याकाळी अंजली आपल्या लेकीला घेऊन हजर झाली.

‘ सर नमस्कार! ‘

‘ बस बस. झालं ना काम? ‘ माधलने उगाचच विचारलं.

‘ हो!’ अंजली प्रश्नाचा अर्थन कळल्याने माधलकडे बघतच राहिली.

‘ कुणीतरी नवीन अधिकारी आला आहे!” माधव जवळ बसलेल्या शकुंतलाकडे बघत म्हणाला. तेव्हा अंजली सावधगिरीने म्हणाली,

‘ म्हणजे तुम्ही नाही काम केलं?’

‘ मी नाही केलं मी त्याचवेळी पुण्याला गेलो नाही का ? पण मी तेथील खात्यात तसं विनंती पत्र लिहून ठेवलं होतं!’ आपण सगळंच खोटं बोललोय असं शकुंतलाला वाटू नये म्हणून बोलत होता.

‘ ते राहुदे . हे पेढे घ्या. ताई तुम्ही पण घ्या. मधुरा कुठे गेली?’ तिने आसपास नजर टाकत म्हटलं.

‘ मैत्रीणीकडे गेली असावी!’ असं म्हणत ती आत गेली व थोड्या वेळाने चहा घेऊन आली. चहा पिता पिता ती म्हणाली,

‘ सर चिनुचंही एडमिशन झालं!”

‘ हो का ? व्वा! चिनू बेटा कशी आहे शाळा आवडते ना ?’

‘ हो!’ म्हणत ती लाजली. थोडावेळ इकडचं तिकडचं बोलून झाल्यावर अंजली म्हणाली,

‘ निघते सर नवीन घर भाड्याने शोधत आहे!”

‘ बरं आता जेवूनच जा!’ माधव उगाचच बोलून गेला.

‘ नको नंतर येईन! असं म्हणत बाहेर पडली. शकुंतला गप्प होती. ००

दुसऱ्या सकाळी माधवने तिला फोन करून सगळं समजावून सांगितलं. तेव्हा ती म्हणाली,

‘ सर जाण्यापूर्वीएकदाच भेटून गेलात मला आनंद होईल. तुमच्या आवडीच्या पुरणपोळीचा बेत आखला आहे!’ तिच्या शब्दात आर्जवे होतं. माधव कबूल झाला.

माधव दुपारीच तिच्या घरी गेला. अंजलीने खरोखरच खरोखरच दूध आणितूप लावलेल्या पुरणपोळया केल्या होत्या.

तो खाली बसला जवळ चिनू बसली होती. अंजलीची वहिनी जेवण वाढू लागली. माधवच्य ताटात पोळयांचा ढीग ठेवला. ते पाहून माधव हसत म्हणाला,

‘ वहिनी इतक्या पोळया खाल्ल्या तर मला धरून उठवावं लागेल!” त्याचे हे मिश्किल वाक्य ऐकून चिनू लाजून हसत होती, तिच्याकडे पाहून अंजली व

वहिनी हसू लागल्या. माधवने तीन चार पोळया घेऊन डीश चिनुकडे सरकवली. तिने दोन उचलल्या.

‘ व्वा! असं खाणं हवं. बेटा माझ्या वाट्याच्या खा आणिभरपूर अभ्यास कर!”

भोजन आटोपून माधव उठून खाली उतरून येत असताना अंजली पाठून अर्ध्याजिन्यावर आली. तिला तिथेच थांबवून तो म्हणाला,

‘ सांभाळून रहा!’ असं म्हणताना त्याला आपण काहीतरी सोडून जात आहोत असं वाटत असताना अंजली झेपावली आणिमाधवला बिलगुन ढसाढसा रडू लागली. माधव गोंधळला. काय करावं तेच त्याला सुचेना. घशात हुंदका दाटून आला. त्याने तिच्या पाठीवर हात ठेवून जवळ ओढून घेतलं नकळतपणे तिच्या गालावर ओठ टेकवले.

निघताना म्हटलं,

‘ आवर स्वतःला. आपल्या दोघांची अवस्था तशीच झाली आहे. आपल्या दोघांना प्रपंच आहे याचं भान तू विसरु नकोस. तुझ्या मनातील भाव मी जपून ठेवेन. वाटलं होतं तू मला विसरून जावं; पण तुला किंवा मलाही जमेल असं वाटत नाही. आपण यापूर्वीमित्र होतो यापुढे तसंच राहू. येईन अधुनमधून जमेल तसं. जास्त अपेक्षा करू नकोस. चिनूला भरपूर शिकुदे. मी मदत करण्याचा प्रयत्न करेन. जा पाठी येतो .

‘ कधीतरी या राधेकडे येणार ना सर ? अंजलीने डोळयात प्राण आणून विचारल. ”

‘ बघतो!’’ असं म्हणत तो खाली उतरून चालत राहिला अंजली भरल्या डोळयांनी त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत राहिली. तिच्यातील राधा माधवच्या पाठून चालत राहिली.

०००

बबन धनावडे

8879095647

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे अठरावे वर्ष आहे.

श्री बबनराव धनावडे यांचे हे ई साहित्यवरचे पहिले पुस्तक आहे.

बबन धनावडे हे छापखान्यात काम केलेले माणूस. पण त्यांचा पिंड लेखकाचा आहे. इतरांची पुस्तके करता करता त्यांनी स्वतः लेखन सुरू केले आणि अपंगत्वावर मात करून आपली लेखणी चालती ठेवली. त्यांनी आजवर अनेक पुस्तके लिहीली आहेत.

बबन धनावडे यांच्यासारखे काही थोडे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), **डॉ. नितीन मोरे (६१ पुस्तके)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (३), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (२३), मधू शिरगांवकर (८), **अशोक कोठारे (१०००० पानी महाभारत)**, **श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ)**, मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), **डॉ. वृषाली जोशी- जागतिक वाङ्मय अनुवाद (६१ पुस्तके)**, डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४०), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका

बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१५), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), **श्याम कुलकर्णी -मूळ वाल्मिकी रामायण(३०)**, किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (८), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, **डॉ. सरोज सहस्रबुद्धे- वैद्यक विज्ञान(१६),** अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम(११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखानीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक(३), श्रीराम काळे (८), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी(४), रामकृष्ण बाक्रे(३), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत(२), अशोक बेंडखळे(५), सुहास साने, सुवर्णा लेले, **प्राचार्य शशिकांत कर्डेकर**(१४ भूगोल विज्ञान विषयक), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), दिगंबर सलगर(४), कैलास बडगुजर, **श्रीपाद काळे- समग्र ऋग्वेद(१०)**, वैभव पाटील, चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक(२), प्रमोद नाईकवाडे, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, मनोहर सुरवाडे(३), श्रेणिक सारडे (६), दिलिप ठाकूर, धनंजय कुलकर्णी, मिलिंद चौधरी, जोसेफ तुस्कानो, सुभाष धारणकर, सचिन कुल्ली(३), विश्वनाथ मानकर, अर्चना सहस्रबुद्धे, बबन धनावडे असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'ई'यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव Whatsapp करा)